





# संवाद

अन्नपूर्णा परिवाराचे त्रैमासिक

मार्च २०१९

# जागतिक महिला दिन


















शबरीमला प्रवेशासाठी - स्त्री-पुरुष समानतेसाठी - सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी तरुणींची एकजूट


















# अनुक्रमणिका


* संपादकीय — *सुरेश धोपेश्वरकर*
* आजच्या स्त्रीच्या नजरेतून समाज... — *उल्का महाजन*
* नोबेल स्वीकारताना केलेले भाषण — *नादिया मुराद*
* जोडीदाराची विवेकी निवड आणि मानसिक आरोग्य —*डॉ. हमीद दाभोलकर*
* शॉपलिफ्टर्स : गुन्हेगारीमुळे जोडलेल्या कुटुंबाची गोष्ट — *मीना कर्णिक*
* माहुलचा लढा माणूस म्हणून जगण्यासाठी — *मेधा पाटकर*
* संतांनी समतेचा विचार मांडून धार्मिक दहशतवादाला व असहिष्णुतेला विरोध केला — *ह. भ. प. शामसुंदर सोन्नर महाराज*
* सरकारचे डोके... — *विद्या बाळ*
* सन्मानाने जगण्याचा हक्क प्रस्थापित करतांना..... — *मनिषा गुप्ते*
* नात्यातील सुरेल संवादासाठी जोडीदाराची विवेकी निवड — *आरती महेंद्र नाईक*
* अन्नपूर्णा परिवार वार्तापत्र — *अंजली पाटील*
* अंमली पदार्थांचा वापर, तस्करी : देशाच्या विकासाला खीळ — *डॉ. अजित मगदूम*
* महिलांचे कैवारी — *दिक्षा गोरे*
* माझे मनोगत — *सारिका आनंद कांबळे*
* वाद आणि चर्चा (कविता) — *अनुसया ओहोळ*
* विज्ञान परिषदेतील 'छद्म' विज्ञान — *अमोल दिघे*



**संपादकीय मंडळ**

- **डॉ. मेधा पुरव-सामंत**
- **कॉ. सुरेश धोपेश्वरकर**
- **वृषाली मगदूम**
- **अंजली पाटील**
- **बाळासाहेब पिसाळ**

**पत्ता :** अन्नपूर्णा परिवार, सेक्टर १९ ई प्लॉट नं १८, कोपरी गाव, वाशी, नवी मुंबई.

**फोन :** ०२२-२७८४५६१७


## संपादकीय

# आंतरराष्ट्रीय महिला दिन विशेषांक

पुलवामा या काश्मीर मधील शहरांत केंद्रिय राखीव सुरक्षा दलाच्या ४० जवानाची जैश अे महमद या पाकिस्तान स्थित दहशतवादी संघटनेने ७५ ट्रक्सच्या काफिल्यात घुसून जी निघृण हत्या केली त्याचा आम्ही अन्नपूर्णा परिवारातर्फे जाहीर निषेध करीत आहोत. या मृत जवानांना संवाद तर्फे आणि अन्नपूर्णा परिवारातर्फे विनम्र श्रद्धांजली.

पुलवामाच्या नृशंस हत्याकाडांच्या निषेध करीत असताना देशांत काश्मीरी जनतेविरुद्ध सुडाची भावना निर्माण करण्याचे प्रयत्न हाणून पाडले पाहिजेत. तसेच काश्मीर प्रश्नाला हिंदु मुस्लीम वादाच्या चष्म्यातुन सुद्धा पहाणे चुकीचे आहे. पाकच्या चिथावणीखोर कृत्याचा निषेध करत असतानाच देशांतर्गत धार्मिक सलोखा ठेवण्याविषयी अन्नपूर्णा परिवारातील सर्व सभासदानी वस्ती पातळीवर जागरूक आणि क्रियाशील रहावे अशी ''संवाद''तर्फे नम्रविनंती आहे.

''संवाद''चा अंक आंतरराष्ट्रीय महिला दिन विशेषांक म्हणून प्रसिद्ध करताना आम्हाला आनंद होत आहे.

महिलाचा कुटुंब आणि समाज जीवनातील सहभाग वाढविणे, त्यासाठी महिलांना जागरूक करणे, त्यांच्या अधिकाराची, हक्कांची, माहिती त्याच्या पर्यंत पोहचविणे आणि त्याची अंमलबजावणी होईल यासाठी त्याना संघटित करणे हे अन्नपूर्णा परिवाराचे धोरण आहे.

युरोपमध्ये २० व्या शतकाच्या पहिल्या दशकांत आंतरराष्ट्रीय महिला दिनाची कल्पना रोझा लक्झेंमबर्ग यांनी मांडली. युद्धाला विरोध आणि आर्थिक सामाजिक विषमतेचे निर्मूलन या दोन विचाराच्या कोनशीलेवर जगांतील पहिला आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला.

१९७५ साली युनो, या संयुक्त राष्ट्राच्या व्यासपीठावरून ''आंतरराष्ट्रीय महिला वर्षाची'' घोषणा करण्यात आली. १९८५ साली या आंतरराष्ट्रीय महिला वर्षा नंतर जगात महिलांची काय प्रगती झाली याचा आढावा घेण्यात आला.

भारतात १९७५ साला पासुन आंतरराष्ट्रीय महिला दिन सातत्याने साजरा केला जातो. महिला दिन हा संघर्ष दिन आहे. महिलांवर अन्याय अत्याचार करणाऱ्या प्रचलीत समाजातील गैरसमजूती विरुद्ध संघर्षाचा दिवस पुरुषाच्या नजरेतुन जग उभारण्याऐवजी स्त्री-पुरुष याच्या संवादातुन, सहकार्यातुन सहमतीतून नवे मानवतावादी जग उभारणे हा आंतरराष्ट्रीय महिला दिनांचा उद्देश आहे.

राज्यकर्ते, धनदांडगे, समाजातील आणि कुटुंबातील सत्ताधीश या दिवसाला उत्सवाचे स्वरूप देण्याचा प्रयत्न करीत आहेत. महिलावरील अन्याय अत्याचार याचा विचार न करिता त्यांनी तो एक इव्हेन्ट - उपक्रम म्हणून साजरा करावा असा प्रयत्न विशेषत: गेल्या पाच दहा वर्षात केला जात आहे. बाजारावर आधारलेल्या अर्थव्यवस्थेत सर्व काही बाजारासाठी या धोरणानुसार मॉल, दागिन्यांची कपड्यांची दुकाने महिला दिना निमित्त विशेष सवलत देऊन सेल लावत आहेत आणि महिलांना वस्तू खरेदित गुतंवत आहेत. मोठ मोठी कार्पोरेटस्, आस्थापने उच्चपदावरील महिलांचे सत्कार सोहाळे घडवत आहेत. या दोन्ही उपक्रमात महिलांनी व्यक्ती म्हणून विचार करावा समुदाय म्हणून आणि विशेषत: समाजातील शोषित विभाग म्हणून स्वत:कडे पाहू नये असे धोरण असते. टी. व्ही. तील महिला विषयक बातम्या आणि सिरियल्स सुद्धा याच भूमिकेतून आयोजित केल्या जातात.

आंतरराष्ट्रीय महिला दिन महिलावरील अन्याय अत्याचाऱ्यांना जबाबदार असणाऱ्या विषमतावादी समाजातील धोरणाविरुद्ध लढा पुकारण्याचा निर्धार करण्याचा दिन याचा विसर पडणार नाही, अशी 'संवाद'च्या वाचकांनी आणि अन्नपूर्णा परिवारातील सभासदांनी काळजी घेतली पहिजे.

'संवाद'च्या अंकाची रचना सुद्धा हेच सूत्र ध्यानात ठेवून केली आहे.

उल्का महाजन याचा आजच्या स्त्रीच्या नजरेतून समाज हा या अंकातील आंतरराष्ट्रीय महिला दिनाचा विशेष लेख आहे.

धर्मांध शक्तीच्या हातात देश गेला तर काय घडते याची माहिती देणारे 'नादिया मुराद'चे नोबेल पारितोषिक स्विकारतानाचे भाषण अवश्य वाचा.

जोडीदाराची विवेकी निवड आणि मानसिक आरोग्य हा डॉ. हमीद दाभोळकराचा लेख अन्नपूर्णा परिवारातील युवक युवतीना आणि त्याच्या पालकांना मार्गदर्शक म्हणून उपयोगी पडेल अशी अपेक्षा आहे.

मीना कर्णिक यांचा ''शॉप लिफ्टर्स'' या आपल्याकडे ज्याला ''उचल्या'' म्हणून ओळखतात त्या वरील जपानी सिनेमाची माहिती देतो.

''माहुलचा लढा माणूस म्हणून जगण्यासाठी'' हा मेधा पाटकर यांचा लेख या अंकात प्रसिद्ध करीत आहोत. कारण अन्नपूर्णा परिवारातील बहुसंख्य सभासदांना घराचा प्रश्न भेडसावत आहे. परवडेल अशा किमतीत घरे मिळविण्यासाठी बिल्डर्स धार्जिण्यासारखी सरकारी धोरणा विरुद्ध व्यापक एकजूट उभारून लढे उभारण्याचा संदेश हा लेख देत आहे.

संताची शिकवण अंगी बाणवा आणि धार्मिक दहशतवादाला व असहिष्णूतेला विरोध करा ह्या ह.भ.प. शामसुंदर सोन्नर महाराज याच्या लेखातील विचार अत्यंत महत्त्वाचा आहे.

''सरकारचे डोके'' हा विद्या बाळ याचा लेख प्रचलीत परिस्थितीचा नव्यानें पुर्नविचार करा असा संदेश देणारा आहे.

महिलाच्या आरोग्यासाठी झटणाऱ्या मनीषा गुप्ते यांचा लेख 'मासूम' या त्यांनी चालविलेल्या संघटनेची माहिती देणारा आहे.

लग्नासाठी जोडीदाराची विवेकी निवड कशी करावयाची याची माहिती देणारा आरती नाईक यांचा लेख छापला आहे.

महिलांसाठी डॉ. आंबेडकरांनी हिंदु कोड बिलासाठी कसा संघर्ष केला याची माहिती दिक्षा गोरे यांनी दिली आहे.

अंमली पदार्थाचा वापर, तस्करी, देशाच्या विकासाला कशी खीळ घालतात याची माहिती देणारा डॉ. अजित मगदूम यांचा लेख या अंकात छापला आहे.

''अन्नपूर्णा परिवार'' हा महिला सक्षमीकरणासाठी जागतिक आणि देशांत चाललेल्या लढ्याचा घटक आहे. सभासदाकडून ठेवी गोळा करून त्या कर्जाऊ रक्कम देऊन त्यांना स्वबळावर उभे करणे - सक्षम करणे येवढ्या पुरते अन्नपूर्णा परिवारांचे कार्य मर्यादित नाही. तर हे व्यवहार आपण एका व्यापक सामाजिक संदर्भात करीत आहोत आणि आपले वैयक्तीक आयुष्य ज्या प्रमाणे अन्नपूर्णा परिवारामुळे बदलले तसेच समाजाचे परिवर्तन आपल्याला साधावयाचे आहे.

❒

# आजच्या स्त्रीच्या नजरेतून समाज...

■ **उल्का महाजन**

मध्ययुगातील सरंजामी, विषम समाजव्यवस्थेपासून आपण खूप अंतर चालून मानवी संस्कृतीच्या वाटेवर पुढे आलो आहोत. बाई-पुरुषांमधील विषमतेवर आधारित अनेक गैरसमज दूर करण्यात मानवी समाजाला यश आले आहे. तरीही अजून खूप मोठी वाट चालायची आहे.

आजही स्त्री ही जन्मत नाही ती घडवली जाते या सिद्धांताला सर्वसामान्य समाजात मान्यता मिळालेली नाही.

बाईने, मुलीने कसे वागावे, याबाबत वेगवेगळ्या प्रदेशांतील समाजाच्या आपापल्या धारणा आहेत. त्या समानतेवर आधारित नाहीत. समाज जे गुणविशेष स्त्रीमधे गृहित धरतो, त्यापैकी फारच थोडे निसर्गत: स्त्रीमध्ये असलेले गुण आहेत. बाकी बहुतांश हे जबरदस्तीने रुजवलेले असतात. त्यातही बाईला स्वत:कडे पुरुषांच्या नजरेतून पाहायला शिकवले जाते.

बाईने कपडे, दागिने कसे घालावेत, बोलावे कसे, मोठ्यांशी, विशेषत: सासरच्या माणसांशी कसे वागावे, नवऱ्याशी कसे वागावे, सार्वजनिक ठिकाणी कोणती बंधने पाळावीत, पुरुष बॉसशी कसे वागावे, पुरुष सहकाऱ्यांबरोबर किती अंतर बाळगावे, कुटुंबात स्वत:च्या इच्छा-आकांक्षांना, आवडीनिवडीला मुरड कशी घालावी, आधी इतरांच्या गरजा भागवण्यात कशी धन्यता मानावी, मातृत्व, त्याग, बलिदान इत्यादी धडे कसे अंगी बाणवावेत अशी प्रचंड मोठी यादी तिच्या बाईपणाशी जोडलेली आहे. त्याची रुजवणूक पिढ्यान्‌पिढ्या करण्यासाठी सणवार, व्रतवैकल्ये, उपासतापास, रूढी, रीतिरिवाज यात तिला आणि समाजाला अडकवले आहे. हे सर्व नैसर्गिकरीत्या तिच्यात आलेले नाही तर ते वर्षानुवर्षे, पिढ्यान्‌पिढ्या तिच्यात रुजवण्यात आले आहे. आज सर्वसाधारण बाई या रूढीमधून घडलेल्या नजरेनेच स्वत:कडे पाहते. हीच घडवलेली समज तिला सांगत असते की ती पुरुषांपेक्षा दुबळी आहे, कमी बुद्धीची आहे, तिची जागा चुलीशीच आहे. शक्यतोवर तिने उंबरठा ओलांडू नये. तिच्यासाठी पुरुषांनी आखलेल्या अनेक लक्ष्मणरेषा आहेत.

वास्तविक पाहता इतिहासच नव्हे तर पुराणकाळापासून पराक्रमी, बुद्धिमान स्त्रियांच्या कहाण्या आपण ऐकत आलो आहोत. पण त्यामुळे सामान्य स्त्रीला या घडवलेल्या गैरसमजातून समाजाने बाहेर पडू दिलेले नाही. पितृसत्ता समाजाच्या प्रत्येक अंगावर स्वार आहे.

संपत्तीचे दैवत लक्ष्मी, विद्येचे / बुद्धिमत्तेचे दैवत सरस्वती, ताकदीचे दैवत दुर्गा, काली, अंबा न्यायाचे दैवत पण स्त्री-रुपीच म्हणजे न्यायदेवता. ही सर्व दैवते स्त्री रूपात आहेत पण सामान्य स्त्री मात्र संपत्तीवरील हक्क, शिकण्याची संधी, स्वत:च्या ताकदीची जाणीव व उपयोग आणि न्याय यापासून वंचित आहे. यांतील विरोधाभास लक्षातही येऊ नये इतके तिला गुंगवून ठेवण्यात आले आहे. किंबहुना या विषम समाजव्यवस्थेची राखणदार तिलाच बनवण्यात आले आहे.

'माझ्या हातात माझे भविष्य' ही जाणीवच तिच्या कडून हिरावून घेण्यात आली आहे. स्वत:च्या जगण्यावरच तिला हक्क नाही. म्हणून चमत्कारावर स्त्रियांचा खूप चटकन विश्वास बसतो. आपले प्रश्न सोडवण्याची ताकद स्वत: कडे नाहीच, ती ताकद, ती जादूची कांडी दुसरीकडे आहे या आशेवर तिला झुलवत ठेवले गेले आहे.

त्यातून विस्थापन ही भारतीय स्त्रीच्या आयुष्याशी जोडलेली अपरिहार्य घटना आहे. लग्नानंतर स्वत:ची मूळ जागा, गाव, नाव, घर एवढेच नाही तर स्वत:ची ओळख पण सोडून तिला जावे

लागते. आजच्या आधुनिक काळात वेगवेगळ्या सत्तीच्या विस्थापनाबद्दल आपण बोलतो पण हे सर्व बायांच्या वाट्याला येणारे सत्तीचे विस्थापन त्याला संस्कृतीच्या, संस्कारांच्या, रीतिरिवाजांच्या नावाखाली उदात्त रूप देऊन दडवण्यात आले आहे. त्यामागचे दु:ख, बसणारे धक्के यावर रिवाजांचा मुलामा चढवण्यात आला आहे.

समाजात जातींची जशी उतरंड आहे तशी बायांमध्ये पण एक उतरंड आहे. सधवा म्हणजे जिचा नवरा जिवंत आहे व जिला मुलगा आहे ती सर्वात वरच्या पायरीवर, जिचा नवरा हयात आहे पण तिला मुलीच आहेत ती दुसऱ्या पायरीवर , जिचा नवरा हयात आहे पण तिला मूलबाळ नाही ती तिसऱ्या पायरीवर व विधवा, कुमारिका, परित्यक्ता या सर्व चौथ्या पायरीवर. म्हणजेच बाईच्या आयुष्यात पुरुष असण्यावर तिचा मान , स्वाभिमान अवलंबून आहे. जिच्या आयुष्यात नवरा, मुलगा यारूपाने पुरुष नाही तिला समाजात मान नाही, ही स्थिती आजच्या आधुनिक काळात पण मोठ्या प्रमाणात तशीच आहे.

आजच्या स्त्रीने या परंपरेने तिला दिलेल्या भ्रामक मानपान व दुबळेपणाच्या भावनेतून मुक्त होण्याची गरज आहे. त्यासाठी तिला माणूस म्हणून स्वत:कडे पहाता यायला हवे. पितृसत्ताक समाजाने दिलेल्या नजरेतून स्वत:ला मुक्त करता यायला हवे. ती खरी बाईची स्वत:ची समर्थ ओळख असेल. ती एकेकटीला तिच्या तिच्यापुरती मिळणं शक्य नाही, त्यासाठी संघटना हवी, चळवळ हवी. समाजाच्या प्रचलित रूढींचा सामना करायचा तर तिला साथ देणारा भगिनीभाव आसपास हवा. तो आपोआप उभा राहणार नाही. तो उभा करावा लागेल.

आजच्या आधुनिक स्त्रीला त्यासाठी आणखी मेहनत करावी लागणार आहे, खूप वाट चालावी लागणार आहे. पण आता तिच्या गाठीला इतिहासातील लढ्यातून मिळवलेले अनेक विजय आहेत, आपण समतेच्या लढ्यात जिंकू शकतो हा त्यातून मिळालेला आत्मविश्वास आहे. आता त्याच्या जोरावर बायांना पुढची वाट चालायची आहे.

आज स्त्रिया मोठ्या प्रमाणात शिकत आहेत. आपल्या पायावर उभ्या आहेत. घर सांभाळायचे की नोकरी करायची हे द्वंद्व पूर्णपणे नसले तरी मोठ्या प्रमाणावर संपले आहे . स्त्रिया स्वावलंबी होत आहेत. पण आता तिच्याकडून सुपरवुमन बनण्याच्या अपेक्षा केल्या जातात. घर तिनेच सांभाळायचे, पैसेही कमवायचे, कामाच्या ठिकाणी ताण सोसायचे, सासूसासऱ्यांना सांभाळायचे, त्यांची मर्जी राखायची, मुलांचे संगोपन करायचे , बाजारहाट सांभाळायचा, आल्या गेलेल्यांचे आदरातिथ्य करायचे, सणवार सांभाळायचे आणि नम्र राहायचे, उलटून बोलायचे नाही. हे असे सगळे मापात सांभाळणे अर्थातच कोणालाही शक्य नाही. पण हे माप तोल ढासळले तर त्याचे खापरही बाईच्या माथ्यावर. यांतील बदलांचा, त्यातील ओढाताणीचा त्रास स्त्रीपुरुष दोघांच्याही वाट्याला येतो पण जास्त कुतरओढ बाईची आहे.

समाजबदलाच्या स्थित्यंतराच्या काळात अशा खूप ताणतणावांना स्त्रियांना सामोरे जावे लागत आहे, लागणार आहे. सतत तोल सांभाळणे जमेलच असे नाही, त्यातून त्रागा, संताप होत राहणार. पण हे चुकवता येणार नाही, त्याला सामोरे जायचे मार्ग - थोडी उसंत मिळवता आली, थोडे तटस्थपणे पाहता आले तर मिळवता येतील. वाचन पुस्तके , पेपर यांचे तसेच परिस्थितीचेदेखील करायला हवे. त्यातून स्वत:च्या जगण्याकडे पाहण्याची दृष्टी मिळू शकते. आजच्या सोशल मीडियाच्या वा टीव्हीवरून चालणाऱ्या सीरियल्सच्या फार आहारी न जाता अन्य मार्ग चोखाळायला हवेत.

मुळात आधुनिक स्त्रीची नजर मिळवायला हवी. त्या स्त्रीच्या नजरेतून जगाकडे बघता यायला हवे व संपूर्ण समाजाची नजर ही आधुनिक स्त्रीची नजर बनायला हवी. आधुनिकता म्हणजे समानता, म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन, म्हणजे सारासार विचार व विवेकबुद्धी म्हणजे चिकित्सक वृत्ती.

आधुनिक 'स्त्री'चीच का तर इथे मी पितृसत्ताक जोखडापासून मुक्त या अर्थी स्त्रीची नजर म्हणते आहे. तिच्याकडे उपजत असणाऱ्या निर्मितीक्षमतेसह, नवे घडवण्याची ताकद असलेले टिकवण्याची ताकद घेत असणारी नजर जी पुरुषांनाही प्रयत्नाने मिळू शकेल.

पण आज ही खरीखुरी नजर मिळवण्यात मोठी बाधा ठरू शकते ती म्हणजे बाजारवादाची. आज सारे काही बाजाराच्या साठी व बाजारू नजरेतून अवतीभवती उभे केलं जातंय. त्यातून वाट काढायची गरज आहे. बाजाराच्या व भांडवली जगाच्या आधारे उभी असणारी प्रसारमाध्यमे स्त्रीची वेगळी प्रतिमा व वेगळे आदर्श उभे करत आहेत. सतत चोवीस तास चालणाऱ्या सीरियल्स बाईला पुन्हा एका प्रतिगामी चौकटीत बसवू पाहात आहेत, जिथे संयुक्त कुटुंब, त्यात सर्वांची मर्जी काहीही करून सांभाळणारी नखशिखांत दिवसभर नटलेली पत्नी/ सून ही आदर्श आहे. विवाहबाह्य संबंध, सततचे गॉसिपिंग हा त्या विषयांचा अविभाज्य भाग आहे. आजच्या कष्टकरी वा नोकरदार स्त्री समोरील खरीखुरी आव्हाने हा त्या सीरियल्सचा विषय क्वचितच असतो.

भारतातील पन्नास टक्के स्त्रिया ही जागतिक सौंदर्यप्रसाधनांच्या बाजारपेठेसमोरील मोठी ग्राहक पेठ आहे. त्यामुळे विश्वसुंदऱ्यांच्या स्पर्धांमधून, जाहिरातींमधून या प्रसाधनांचे आकर्षण तयार केले जाते. चुकीच्या सौंदर्याच्या कल्पना रुजवल्या जातात ज्यांचा प्रभाव सर्वसामान्य तरुणी व स्त्रियांवर पडत असतो. चुकीची व बाजारवादी, उपभोगवादी मूल्यव्यवस्था त्याद्वारे उभी केली जाते. सुंदर दिसणे तेही या प्रसाधनांच्या आधारे हेच एकमेव कर्तव्य व आव्हान असल्याचे चित्र सतत समोर उभे केले जाते.

त्या तुलनेत खरे सौंदर्य कशात आहे. प्रश्न सोडवण्यातील खरी बुद्धिमत्ता वैचारिक व शारीरिक ताकद, संपन्नता तयार करणे या गोष्टी मागे पडत आहेत. या माध्यमांच्या आधारे एक विचारविश्व उभे केले जाते ज्याद्वारे भ्रामक मुद्दे पुढे आणले जातात आणि खरे जगण्याचे प्रश्न मागे टाकले जातात या वास्तवाकडे तिचे लक्ष वेधण्याची आवश्यकता आहे.

अलंकार,सौंदर्य प्रसाधने ही स्त्रीच्या अस्तित्वाची पूर्वअट ठरत असेल तर ती बंधने ठरतात. ते खऱ्या स्वेच्छेने व निवडीचा अधिकार पूर्ण माहितीसह स्त्रीच्या हाती ठेवून व्हावे, ही अपेक्षा ठेवायला हवी.

आजूबाजूला घडणाऱ्या अनेक आर्थिक /राजकीय घडामोडी, त्यांचा नीट अर्थ लावणे त्यातून आधुनिक व समतावादी विचारांच्या आधारे वाट काढणे हे आजच्या स्त्रीला तेव्हाच जमेल जेव्हा ती पुरुषप्रधान व बाजारवादी नजरेतून मुक्त होईल व स्त्रीची मूलभूत नवे शोधणारी, सर्जक, निर्मितीक्षम स्वतंत्र नजर परत मिळवेल. या नजरेतून जगाकडे तिने बघायला हवे आणि जगानेही यासाठी बाईच्या नजरेतून जगाकडे पाहायला हवे.

आजचे Metoo कॅम्पेन काहीतरी मूलभूत बदल मागत आहे, पुरुषांच्या नजरेत आणि वर्तनात. समानतापूर्ण सन्मानाच्या वर्तनाची अपेक्षा करत आहे.

कथुआमध्ये लहान बालिकेवर घडलेला अत्याचार समाजाची, राजकारणाची एक विकृत बाजू समोर आणतो आहे या प्रसंगामध्ये फक्त आपली, आपल्या कुटुंबाच्याच सुरक्षेची काळजी निव्वळ करून चालणार नाही तर यांत भूमिका घ्यायला हवी. अत्याचारग्रस्त महिलेच्या बाजूने उभे राहायला हवे. हे भान हा या स्त्रीच्या जागृत नजरेचा, जाणिवेचा भाग व्हायला हवा.

शबरीमाला मंदिरात जाण्याची बाब ही फक्त धार्मिक अंगांनी नाही तर संविधानातील मूल्यांच्या आधारे तपासता यायला हवी. ती आधुनिक नजर आहे, त्यामध्ये विज्ञानवादी दृष्टिकोन आहे. मुख्य म्हणजे या सर्व मुद्द्यांवर व्यक्त व्हायला हवे. बोलकं व्हायला हवे त्याद्वारेच गार्गी,मैत्रेयी, पंडिता रमाबाई, महात्मा फुले, सावित्रीबाई यांनी आणि अनेकांनी खुली केलेली आधुनिकतेची वाट रुंदावत जाईल.

❐

# माझी प्रगती



मी ईथ पर्यंतच्या शिक्षणाचा
प्रवास मी केला. तो केवळ सावित्री
बाई, फुले यांच्या मुळेच आणि
माझ्या कडून समाजाला कशी मदत
करता येईल याची जाणीव मी ठेवीत.
शेणा, दगडाचा मारा झेलून,
स्त्रियांच्या शिक्षणाची आणि सार्वजनिक
सत्यधर्म पुढे नेण्याची अवघड वाट
प्रशस्त झाली. या वाटे वरून चालताना
सावित्रीबाईची ज्या काळात स्त्री
शिकली नरधर्म वाटेल असा उपक्रम केला
जात असताना त्याच काळात
एका स्त्रीने शिक्षण घेऊन
स्त्रियांच्या उद्धारासाठी
उंबरठा ओलांडणे ही साधी आणि
सोपी गोष्ट नव्हती तरीही समाजाचा
रोष पत्करून क्रांतिबा ज्योतिराव
फुलेंच्या साथीने त्यांनी पुण्यात मुलीसाठी
पहिला शाळा सुरू केली प्रसंगी
दगड, शेण, चिखलांना फुल समजून
त्याचा माराही सहन केला आणि त्याच
फुलांनी स्त्री जीवन सुगंधी करत
भारतात पहिल्या
भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका व
मुख्याध्यापिका होण्याच्या मान मिळावा
बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापन करून
अनेक पीडित स्त्रियाच छत्र
झाल्या न्हाव्यांच्या संप घडवून
केशवपन सारखा कुप्रथांना रोखण्याचा
धाडसी पाऊल त्यांनी उचललं
यांच्या कार्याची सर आज माझ्या किंवा
आपल्या कार्याला नक्कीच येऊ शकणार नाही
पण तरीही सावित्रीच्या लेकी म्हणून
आपण आपल्या आईच्या कार्यातून प्रेरणा घेऊन
समाजाचं काही अशी ऋण
फेडण्याचा नक्कीच प्रयत्न करू
शकतो. चला तर मग नवा समाज
घडवण्यासाठी जुन्या रुढी परंपरेमधून
बाहेर पडु या आणि दर वर्षी ३ जानेवारीचा
दिवस सावित्री बाई उत्सव
म्हणून साजरा करू या.
''आम्ही सावित्रीच्या लेकी
आम्ही ज्योतिबाच्या लेकी
नका समजू आम्हाला दासी
आम्ही कर्तृत्वाच्या राशी''

**मॉली मेमन**
पुणे ब्रॅच नं. १०

❐

# नोबेल स्वीकारताना केलेले भाषण

■ नादिया मुराद

*हे पारितोषिक मला दिले याबद्दल मी तुमची आभारी आहे. पण असे असले तरीही आमची प्रतिष्ठा आता फक्त न्याय मिळण्याने आणि संबंधित गुन्हेगारांवर खटले चालवण्यानेच परत येऊ शकते हे लक्षात ठेवले पाहिजे. केवळ याझिदी आहेत म्हणून मारल्या गेलेल्या आमच्या प्रिय व्यक्तींची जागा घेऊ शकेल असा कुठलाही पुरस्कार अस्तित्वात नाही. आमची माणसे आणि आमचा मित्रपरिवार यांचे दैनंदिन आयुष्य जर नॉर्मल व्हायचे असेल तर न्याय आणि शिल्लक समूहाचे संरक्षण एवढाच पर्याय उरतो. आपण सध्या मानवी हक्कांच्या वैश्विक जाहीरनाम्याचा ७० वा वर्धापन दिन (१० डिसेंबर) साजरा करत आहोत. वांशिक हत्याकांडे रोखणे आणि संबंधित गुन्हेगारांविरुद्ध खटले चालवणे असाच त्याचा उद्देश आहे. माझ्या समुदायाबाबत तर गेल्या चार वर्षांपासून वांशिक हत्या घडवली जात आहे. त्यांना रोखण्याचा वा थांबवण्याचा काहीच प्रयत्न आंतरराष्ट्रीय समुदायाने केलेला नाही.*

राजघराण्याचे सदस्य, इथे उपस्थित असलेले विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ, नोबेल समितीचे सर्व सभासद आणि सभ्य स्त्री-पुरुषहो, सादर प्रणाम.

हा सन्मान दिल्याबद्दल मी नोबेल समितीची आभारी आहे. लैंगिक हिंसाचाराच्या बळी ठरलेल्या स्त्रियांसाठी अथकपणे कार्यरत असणारे व त्या स्त्रियांना आवाज मिळवून देणारे माझे डॉक्टर मित्र डेनिस मुक्केगे यांच्याबरोबर हा पुरस्कार मला जाहीर होणे हा मी माझा सन्मान समजते. माझे आणि सगळ्या याझिदी समूहाचे आयुष्य वांशिक हत्याकांडाच्या वेडापायी कसे संपूर्णपणे बदलून गेले आणि इराकचाच अविभाज्य घटक असणाऱ्या याझिदी समूहाला समूळ नष्ट करण्याचा आयसिसने कसा प्रयत्न केला आणि त्यासाठी स्त्रियांना कसे कैद केले, पुरुषांच्या कशा हत्या केल्या, धार्मिकस्थळे आणि प्रार्थनास्थळे कशी उद्ध्वस्त केली गेली, याविषयीचे हृग्दत: मी इथे मांडणार आहे.

माझ्यासाठी आजचा दिवस विशेष महत्त्वाचा आहे. ज्या दिवशी चांगल्याने वाईटावर विजय मिळवला, मानवतेने दहशतवादाला हरवले असा आजचा दिवस आहे. आज पीडित स्त्रिया व लहान मुलांनी त्यांच्यावर अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांवर विजय मिळवलेला आहे. ही एका नव्या युगाची सुरूवात ठरेल अशी मला आशा आहे. जिथे शांततेला प्राधान्य असेल; जिथे स्त्रिया, लहान मुले व अल्पसंख्याक समूह यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध आणि विशेषत: लैंगिक हिंसाचाराच्या बळी असणाऱ्या महिलांच्या संरक्षणासाठी संपूर्ण जग एकत्र येऊन नवा मार्ग उभा करायला सुरवात करेल असे हे युग असेल.

माझे लहानपण एखाद्या खेडुत मुलीप्रमाणे सिंजर प्रदेशाच्या दक्षिणेला असणाऱ्या कोचो या गावी गेले. माझ्या गावात असताना मला नोबेल शांतता पुरस्काराविषयी काहीही माहिती नव्हती. आपल्याच जगात रोज घडणारा जिवघेणा संघर्ष आणि हत्या यांच्याविषयीही मी अनभिज्ञ होते. माणसे एकमेकांविरुद्ध इतकी घृणास्पद दुष्कृत्य करू शकतात याची मी तेव्हा कल्पनाही केली नव्हती. एका लहान

मुलीप्रमाणे उच्च माध्यमिक शिक्षण घेणे व आपल्याच गावात स्वत:चे सौंदर्यप्रसाधनगृह (ब्युटी पार्लर) काढायचे आणि सिंजर इथे आपल्या परिवारासोबत राहायचे, हे माझे तेव्हाचे स्वप्न होते. पण तेच नंतर एक दु:स्वप्न ठरले. आयुष्यात अनपेक्षित गोष्टी घडल्या. आम्ही वांशिक हत्याकांडाचे बळी ठरलो. त्यात माझी आई, माझे सहा भाऊ आणि माझ्या भावाची मुले अशा सगळ्यांना मी गमावले. त्या वांशिक हत्याकांडामुळे प्रत्येक याझिदी कुटुंबाची अशीच वा प्रसंगी याहून भयानक शोकांतिका झाली. एका रात्रीत आमचे जग आमच्या आकलनाच्या पलीकडे बदलले. आज प्रत्येक याझिदी कुटुंब एकमेकांपासून हरवलेल्या आपल्या कुटुंबीयांना शोधत आहे. एका शांतताप्रिय समुदायाचे आज केवळ अवशेष शिल्लक राहिले आहेत. शांततेच्या मार्गाने जाणारा आणि सहिष्णुतेची संस्कृती सांगणारा एक समूह एक निरर्थक युद्धासाठीचे इंधन ठरला आहे.

श्रद्धा आणि धर्म यांचे नाव घेत झालेल्या वांशिक हत्याकांडाची अनेक उदाहरणे आपण इतिहासात अनुभवलेली आहेत. याचाच परिणाम म्हणून आज तुर्कस्तानमध्ये याझिदी समूहाचे खूपच कमी लोक उरले आहेत. एके काळी सीरियामध्ये सुमारे ऐंशी हजार याझिदी राहात होते. आता त्यांची संख्या पाच हजारांपर्यंत आली आहे. इराकमध्येही याझिदींची साधारण अशीच परिस्थिती आहे. त्यांच्या संख्येत लक्षणीय घसरण होतच आहे. याझिदी समूहाचा ‘समूळ विनाश’ हे आयसिसचे ध्येय जर पूर्ण होऊ द्यायचे नसेल, तर याझिदी समूहाला आवश्यक ते संरक्षण देणे हा एकच पर्याय राहतो. इराक आणि सीरियामधल्या इतर अल्पसंख्याकांचीदेखील हीच परिस्थिती आहे. फक्त इराक आणि कुर्दिस्तानच नाही तर सगळा आंतरराष्ट्रीय समुदायसुद्धा आयसिसपासून आमचे संरक्षण करण्यात आणि आमचे वांशिक हत्याकांड रोखण्यात पूर्णपणे अपयशी ठरलेला आहे. एका संपूर्ण समूहाचे अस्तित्व नष्ट होत असताना उर्वरित जगाने फक्त बघ्याची भूमिका स्वीकारलेली आहे. त्यामुळेच आज आमची घरे, आमची कुटुंबे, आमच्या परंपरा, आमची माणसे, आमची स्वप्ने सगळे सगळे उद्‌ध्वस्त करून टाकण्यात आले आहे.

वांशिक हत्याकांडानंतर आमच्याविषयी फक्त स्थानिकच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तंरावरदेखील सहानुभूती दाखवण्यात आली. अनेक देशांनी तर या कत्तलींना ‘वांशिक हत्याकांड’ असेही संबोधले. मात्र असे असले तरीही यापैकी कशानेही आमचे वांशिक हत्याकांड काही थांबले नाहीच. याझिदी समूहाचे अस्तित्वच पूर्णपणे संपुष्टात येण्याचे सावट आजही आमच्या मनावर घोंघावत आहे. आयसिसने कैदेत ठेवलेल्या याझिदी लोकांच्या परिस्थितीत अजून काहीही फरक पडलेला नाही. ते अजून आयसिसच्या छावणीतून बाहेर पडू शकलेले नाहीत. आयसिसने उद्‌ध्वस्त केलेल्या कशाचीही पुनर्बांधणी अजून झालेली नाही. ही वांशिक हत्याकांडे घडवून आणणाऱ्या गुन्हेगारांना अजून शिक्षा व्हायची आहे. मला आता आणखी सहानुभूती नको आहे. उलट त्या सहानुभूतीच्या भावनेचे रूपांतर आता क्रियाशीलतेत करायचे आहे.

आयसिसने घडवलेल्या वांशिक हत्याकांडाचे जे शिकार ठरले आहेत त्या लोकांना मदत करण्याविषयी जर आंतरराष्ट्रीय समुदाय गांभीर्याने विचार करत असेल, याझिदी समूहाच्या लोकांनी विस्थापित छावण्या सोडून त्यांच्या गावी परत जावे असे जर आपल्याला वाटत असेल, आणि त्यांच्यात पुन्हा जगण्याची हिंमत जागवायला हवी असे वाटत असेल, तर आंतरराष्ट्रीय समुदायाने त्यांना संयुक्त राष्ट्रसंघाच्या देखरेखीखाली आंतरराष्ट्रीय दर्जाचे संरक्षण दिले पाहिजे. इतर दहशतवादी संघटनांकडून पुन्हा आमचे वांशिक हत्याकांड घडवले जाणार नाही याची खात्री, अशा आंतरराष्ट्रीय संरक्षणाच्या तरतुदीशिवाय देता येणार नाही. आंतरराष्ट्रीय समुदायाने एकत्र येऊन वांशिक हत्याकांडाला बळी पडलेल्या व्यक्तींना आश्रय आणि विस्थापनाच्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. सर्व इराकी नागरिकांसाठी आजचा दिवस महत्त्वाचा आहे. मी नोबेल शांतता पुरस्कार मिळवणारी पहिली इराकी नागरिक आहे यामुळे नव्हे. तर आम्ही आयसिस या दहशतवादी संघटनेच्या तावडीतून आमच्या इराकची सुटका आजच्या दिवशी केली होती. त्यामुळेच आम्ही आजचा दिवस ‘विजय दिवस’ म्हणून साजरा करतो. या लढ्यात उत्तरेच्या टोकापासून दक्षिणेच्या टोकापर्यंतचे सर्व इराकी नागरिक एकत्र झाले होते. एका अतिशय कट्टर अशा दहशतवादी संघटनेविरुद्ध संपूर्ण जगाच्या वतीने ते एक विशाल युद्ध लढले.

हे ऐक्यच आम्हाला ताकद देते. आयसिसच्या गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी आणि आयसिसने इराकच्या अधिकाधिक भूप्रदेशावर नियंत्रण मिळवले तेव्हा ज्यांनी ज्यांनी आयसिसचे स्वागत केले, त्यांना मदत केली आणि त्यांच्यात सामील झाले अशा अंतर्गत शक्तींवरदेखील खटले चालवण्यासाठी आपण एकत्र प्रयत्न केले पाहिजेत. आयसिसच्या पराभवानंतर आता इराकमध्ये दहशतवाद आणि धार्मिक कट्टरतावादाला तसूभरही जागा असता कामा नये. देशाच्या बांधणीसाठी आपण देशाच्या सैन्यात भरती झाले पाहिजे. सर्व इराकी नागरिकांच्या जीवनात सुरक्षा, स्थैर्य आणि समृद्धी प्रस्थापित करण्यासाठी आपण एकत्र योगदान दिले पाहिजे. २०१४ मध्ये आयसिससारख्या दहशतवादी संघटनेने आणि त्यांच्या विचारांनी भारावून गेलेल्या नागरिकांनी, इराकचा अविभाज्य घटक असणाऱ्या

याझिदी समूहाचे अस्तित्व संपवण्याच्या उद्देशाने कसा हल्ला केला होता हे आपण कायम लक्षात ठेवले पाहिजे. याझिदींच्या श्रद्धा आणि परंपरा वेगळ्या आहेत, त्यांचा एकेमकांच्या हत्या करण्यावर विश्‍वास नाही किंवा लोकांना कैदेत ठेवण्यावर वा त्यांना गुलाम करण्यावरही विश्‍वास नाही एवढ्या क्षुल्लक कारणासाठी हे वांशिक हत्याकांड घडवून आणण्यात आले होते.

एकविसाव्या शतकात, जागतिकीकरण आणि मानवी हक्क याविषयी सर्वत्र जाणीव जागृती झालेली असतानाच्या काळात, साडेसहा हजारांहून अधिक याझिदी मुले व स्त्रिया कैद झाल्या. गुलामाप्रमाणे त्यांची खरेदीविक्री झाली व त्यांच्यावर शारीरिक आणि मानसिक अत्याचार करण्यात आले. २०१४ पासून चालू असलेल्या प्रयत्नानंतरही आयसिसच्या तावडीत अजूनही असलेल्या तीन हजारांहून अधिक मुले व स्त्रिया यांचा काहीही शोध अद्याप लागू शकलेला नाही. आयसिसकडून तरुण मुली विकल्या जातात, विकत घेतल्या जातात, कैदेत ठेवल्या जातात आणि त्यांच्यावर रोज बलात्कार होतात. आणि असे असूनही १९५ देशांच्या नेत्यांची सद्सद्विवेकबुद्धी या पीडित स्त्रियांच्या सुटकेसाठी अजूनही कशी जागृत होत नाही, ही माझ्या कल्पनेच्या बाहेरची गोष्ट आहे. त्या स्त्रियांच्याऐवजी जर एखादी तेलाची खाण असती, शस्त्रास्त्रांनी भरलेले एखादे जहाज असते किंवा एखादा महत्त्वाचा व्यापारी करार असता तर काय झाले असते? त्यांना वाचवण्याच्या प्रयत्नात या देशांनी काहीही कमतरता ठेवली नसती.

मी आता रोजच अशा शोकंतिका ऐकते. जगभरात हजारो-लाखो स्त्रिया व मुले कैद होतात, हिंसेचे बळी ठरतात. मला रोज सीरिया, इराक आणि येमेनमधून लहान मुलांच्या किंकाळ्या ऐकू येतात. आफ्रिका खंडात आणि अशा इतर अनेक देशांमध्ये रोजच हजारो स्त्रिया व मुले यांच्या होणाऱ्या हत्या हे युद्धाचे कारण बनत आहे. त्या पीडितांना कोणी मदतही करत नाही किंवा गुन्हेगारांना जाबही विचारत नाही. गेली चार वर्षे मी माझी, माझ्या जमातीची आणि इतर असुरक्षित जमातींची कथा सांगत जगभर फिरते आहे आणि अजूनही मला न्याय मिळालेला नाही. याझिदी आणि इतरही स्त्रियांवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांवर अद्याप खटले चालावयाचे आहेत.

जर हा न्याय झाला नाही तर आमच्या बाबतीत आणि इतर असुरक्षित समूहांच्याबाबतीत अशा वांशिक हत्या पुन: पुन्हा होत राहतील. इराकच्या विविध समूहांमध्ये शांतता आणि सहकार्य प्रस्थापित करायचे असेल तर पीडित घटकांना न्याय मिळवून देणे हा त्यावरचा एकमेव मार्ग आहे. स्त्रियांना कैदेत ठेवणे आणि बलात्कार करणे अशा घटना पुन: पुन्हा घडू नयेत असे आपल्याला वाटत असेल, तर लैंगिक अत्याचार हे स्त्रियांच्या विरोधात हत्यार म्हणून वापरणाऱ्यांना योग्य ती शिक्षा केली पाहिजे.

हे पारितोषिक मला दिले याबद्दल मी तुमची आभारी आहे. पण असे असले तरीही आमची प्रतिष्ठा आता फक्त न्याय मिळण्याने आणि संबंधित गुन्हेगारांवर खटले चालवण्यानेच परत येऊ शकते हे लक्षात ठेवले पाहिजे. केवळ याझिदी आहेत म्हणून मारल्या गेलेल्या आमच्या प्रिय व्यक्तींची जागा घेऊ शकेल असा कुठलाही पुरस्कार अस्तित्वात नाही. आमची माणसे आणि आमचा मित्रपरिवार यांचे दैनंदिन आयुष्य जर नॉर्मल व्हायचे असेल तर न्याय आणि शिल्लक समूहाचे संरक्षण एवढाच पर्याय उरतो. आपण सध्या मानवी हक्कांच्या वैश्‍विक जाहीरनाम्याच्या ७०वा वर्धापन दिन (१० डिसेंबर) साजरा करत आहोत. वांशिक हत्याकांडे रोखणे आणि संबंधित गुन्हेगारांविरुद्ध खटले चालवणे असाच त्याचा उद्देश आहे. माझ्या समुदायाबाबतीत तर गेल्या चार वर्षांपासून वांशिक हत्या घडवली जात आहे. त्यांना रोखण्याचा वा थांबवण्याचा काहीच प्रयत्न आंतरराष्ट्रीय समुदायाने केलेला नाही. हे गुन्हे केलेल्या गुन्हेगारांना न्यायासनासमोर आणण्याचेदेखील काम त्यांनी केलेले नाही. आंतरराष्ट्रीय समुदायाच्यादेखत अनेक सुरक्षित समूह जातीयवाद, वंशद्वेष यांचे बळी ठरले आणि स्वत:ची ओळख गमावून बसले.

याझिदी आणि अशा जमातींचे संरक्षण करणे, विशेषत: जिथे वाद आहेत आणि जिथे जागतिक युद्ध लढली जातात अशा ठिकाणी मानवधिकारांचे रक्षण करणे, अल्पसंख्याक समूहांना सुरक्षित ठेवणे, स्त्रिया व लहान मुलांचे अधिकार जपणे ही आंतरराष्ट्रीय समुदायाची आणि आंतरराष्ट्रीय संस्थांची जबाबदारी आहे. या वर्षीच्या नोव्हेंबर महिन्यात पॅरिसमध्ये झालेल्या शांतता परिषदेत सहभागी होण्याचे भाग्य मला लाभले. या परिषदेमध्ये पहिले महायुद्ध संपल्याची शंभरी साजरी करण्यात आली. पण पहिले महायुद्ध संपल्यापासून वांशिक हत्या आणि युद्धे झाली नाहीत का? युद्धाचे बळी, विशेषकरून देशांतर्गत युद्धांनी असंख्य बळी घेतले आहेत. जग या युद्धांविषयी सहानुभूती दाखवते आणि अशा दंगलींची वंशहत्या म्हणून दखल पण घेते. तरीही अशा युद्धांना व त्यांच्या पुनरावृत्तीला रोखण्यात जग कमी पडले आहे, हे सत्य आहे. जगात अनेक वाद-विवाद आणि समस्या आहेत हे खरे आहे. पण तरीही शोषितांना मदत करण्यासाठी अनेक जण पुढे येतात आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठीही बरेच प्रयत्न केले जातात हेही खरेच आहे.

बाडेने ऊर्तबर्ग आणि मिस्टर क्रेस्चमन आणि त्यांचे सहकारी यांच्या पुढाकाराशिवाय मी आयसिसच्या गुन्ह्यांचा पाढा वाचण्याचे आणि याझिदी समूहाच्या वाट्याला आलेल्या भोगांचे सत्य सांगण्याचे

स्वातंत्र्य उपभोगूच शकले नसते. माझे असे मत आहे की, जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत सर्व पीडितांना सुरक्षित आयुष्य जगण्याचा अधिकार आहे. सहनशीलता, संयम आणि शांतता यावर विश्वास ठेवणारा सुसंस्कृत समाज घडवण्यामध्ये शिक्षणाचा मोठा वाटा असतो. त्यामुळे आपण मनाची पाटी कोरी असणाऱ्या लहान मुलांमध्ये अधिकाधिक गुंतवणूक केली पाहिजे. द्वेष आणि सांप्रदायिकतेला खतपाणी न घालता, शिक्षणाद्वारे सहनशीलता आणि सहकार्यभावना शिकवता येऊ शकते. स्त्रियांच्या सहभागामुळे अनेक समस्या सोडवणे सोपे होते. समाजामध्ये चिरंतन शांतता प्रस्थापित करण्यामध्येदेखील त्यांचा सहभाग असला पाहिजे. समाजात मूलभूत बदल घडवण्यासाठी स्त्रियांनी आवाज उठवणे आणि त्यात सक्रियपणे सहभागी होणे आवश्यक आहे.

याझिदी समूहाच्या नागरिकांची शक्ती आणि त्यांचा संयम यासाठी मला त्यांचा अभिमान आहे. माझ्या समूहाला अनेक वेळा हिंसेचे लक्ष्य बनवण्यात आले, अनेक वेळा त्याच्या अस्तित्वाचा प्रश्न उभा करण्यात आला, तरीही आम्ही सातत्याने आमच्या अस्तित्वाच्या अधिकारासाठी झगडत राहिलो आहोत. याझिदी हे शांतता आणि सहनशीलतेला मूर्त स्वरूप देतात असे मला वाटते. एक उदाहरण म्हणून जगाने त्यांच्याकडे पाहिले पाहिजे. ज्यांनी अगदी सुरूवातीपासून माझी बाजू घेतली आणि माझा संदेश इतरांपर्यंत पोचवण्याचे काम केले, त्या सर्वांचे आणि विशेषत: माझ्या सोबत दिवसरात्र असलेल्या माझ्या टीमच्या सदस्यांचे, मी आभारी मानते.

या हत्याकांडाची वंशहत्या म्हणून दखल घेणाऱ्या आणि असुरक्षित समूहांना साह्य करणाऱ्या सर्व देशांच्या शासनांचे आभार मानते. याझिदी वांशिक हत्याकांडाच्या पीडितांना आश्रय देऊ केला यासाठी कॅनडा आणि ऑस्ट्रेलियाचे आभार मानते. माणुसकीला धरून आमच्या उद्देशांना दिलेल्या पाठिंब्याबद्दल फ्रान्स आणि अध्यक्ष माक्रोन यांची आभारी आहे. इराकमधील निर्वासितांना मागची चार वर्षे सतत मदत करणाऱ्या इराकी कुर्दिस्तानच्या लोकांचीदेखील मी ऋणी आहे. इराकच्या पुनर्निर्मितीसाठी परिषद आयोजित करणाऱ्या कुवेतचे एमिर आणि नॉर्वेचे शासन यांचेसुद्धा आभार मानते. ज्यांनी ही वंशहत्या आयसिसनेच केली हे साऱ्या जगाला पटवून देण्यासाठी व आयसिसला शिक्षा व्हावी यासाठी खूप प्रयत्न केले ती माझी मैत्रीण अमाल क्लुनी आणि तिची टीम यांची मी आभारी आहे. विस्थापितांना अमर्यादित साह्य करणाऱ्या ग्रीसचीदेखील मी ऋणी आहे.

आपण सगळे अन्याय आणि जुलूम यांच्याविरुद्ध एकत्र येऊ या. शांततेसाठी, हिंसाचारविरुद्ध स्वातंत्र्यासाठी, गुलामीविरुद्ध, वंशवादाविरुद्ध - एकतेसाठी आणि सर्वांच्या मानवधिकारांसाठी आपण सगळे एकत्रितपणे आवाज उठवू या. स्त्रिया व बालकांच्या शोषणाविरुद्ध, त्यांना सभ्य आणि स्वावलंबी आयुष्य मिळवून देण्यासाठी; गुन्हेगारांना शिक्षा न देता सोडून देण्याविरुद्ध, त्यांना त्यांच्या कृत्यांसाठी जबाबदार धरण्यासाठी आणि न्याय मिळवण्यासाठी आपण एकत्र आवाज उठवू या. तुम्ही दाखवलेल्या अगत्याबद्दल आणि मन:पूर्वक लक्ष देऊन माझे भाषण ऐकून घेतल्याबद्दल मी आपली आभारी आहे. आपल्या सर्वांचे आयुष्य चिरंतन टिकणाऱ्या शांततेत व्यतीत होवो.

**(अनुवाद : मृद्‌गंधा दीक्षित- मोबा. ७६२०५४७४०९)**
**(नादिया मुराद या २५ वर्षी इराकी तरुणीला २०१८ या वर्षीचे नोबेल शांतता पारितोषिक १० डिसेंबर २०१८ रोजी नॉर्वेची राजधानी ओस्लो येथे प्रदान केले गेले, त्यावेळी केलेले हे भाषण.)**

**(साप्ताहिक साधना ५ जानेवारी २०१९ रोजी वरून साभार...)**

❐

## गुलामांना जन्म देणारा आज्ञाधारकपणा

आज्ञाधारकपणा हा गुण खरा. परंतु बुद्धी गहाण ठेवून चालणारा आज्ञाधारकपणा गुलामांना जन्म देतो. गुलामांना प्रश्न विचारण्याची मुभा नसते. त्यांना कोणीकोणी थट्टेने किंवा कदाचित मनापासूनही असेल, पण संशयात्मा म्हणायचे. गीतेतल्या 'संशयात्मा विनश्यति' ह्या धाकामुळे आपण शंका घेणे हेच पाप मानून प्रगतीच्या वाटा थांबवल्या आहेत. ... प्रश्न हा संशयाशिवाय संभवतच नाही. माणूस निरुत्तर झाला तर बिघडत नाही, पण निष्प्रश्न झाला की संपलाच. माणसाची प्रगती त्याच्यापुढे सतत प्रश्न उभे राहण्यातून घडली आहे. अनुभवाची आंधळी स्वीकृती हे मैंदपणाचे लक्षण आहे. किटलीवरचे वाफेचे झाकण उडाल्यावर हे कुठल्या रेट्याने उडाले असेल हा प्रश्न मानवी इतिहासात बाष्पयुगाला जन्म देऊन प्रगतीच्या हजार वाटा दाखवून गेला.

**पु. ल. देशपांडे,** संदर्भ- गुण गाईन आवडी पृष्ठ ९, # adinama # आदिनामा

# जोडीदाराची विवेकी निवड आणि मानसिक आरोग्य

■ डॉ. हमीद दाभोलकर

साधारण दोन वर्षांच्या पूर्वीची गोष्ट आहे. अंनिसच्या एका ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा मला फोन आला. त्यांनी मला विचारलेला प्रश्न यापूर्वी कुणीच विचारला नव्हता. तो प्रश्न असा होता की, 'माझ्या मुलीचा पहिला घटस्फोट झालेला आहे आणि त्या सगळ्या प्रक्रियेमधून जाताना आम्हाला खूप मन:स्ताप झाला. आता माझी मुलगी परत लग्न करण्याचा विचार करीत आहे. तर नवरा आणि बायको यांचा स्वभाव तपासून त्यांचे जुळू शकेल का नाही, हे सांगणारी एखादी शास्त्रीय चाचणी असेल तर तुम्ही मला सांगू शकाल का?'

चिकित्सक बुद्धीने विचार करता त्यांचा प्रश्न एकदम थेट आणि रास्त होता. अडचणीची गोष्ट अशी की, आज तरी मानसशास्त्राकडे अशी कोणतीही चाचणी सहज उपलब्ध नाही. आजचे मानसशास्त्र अजून इतके प्रगत झाले नाही की ज्यामध्ये अशा स्वरूपाची चाचणी करता येईल आणि योग्य जोडीदार शोधता येईल. जोपर्यंत अशी चाचणी कोणी शोधून काढू शकत नाही, तोपर्यंत तरी हा विषय आपल्याला समजून घेण्याशिवाय पर्याय नाही.

मानसिक आरोग्य आणि जोडीदाराची विवेकी निवड हा विषय समजून घेताना स्वाभाविकच पहिला आणि सगळ्यात महत्त्वाचा भाग येतो, तो मानसिक आजारांचा. त्यामध्येदेखील सगळ्यात वरचा क्रमांक लागतो तो व्यसनाचा. आपल्या जोडीदाराची निवड करताना त्याला अथवा तिला कोणतेही व्यसन नाही. याची खात्री करून घेणे हे लग्नाच्या आधी एचआयव्ही चाचणी करण्याइतकेच किंवा त्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. आपल्या समाजातील व्यसनांचे प्रमाण पाहता व्यसन हे जोडीदाराच्या माध्यमातून आपल्या आयुष्यात प्रवेश करू शकण्याची खूप मोठी शक्यता असते आणि एकदा का व्यसनाने संसारात चोरपावलाने प्रवेश केला की, सुखी संसाराची स्वप्ने धूळधाण व्हायला फार वेळ लागत नाही. व्यसनाने संसार उद्‌ध्वस्त झालेली अनेक जोडपी आपण आपल्या आजूबाजूला पाहत असतो. त्या पार्श्वभूमीवर याविषयी भूमिका घेणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्या होऊ घातलेल्या जोडीदाराला तो किंवा ती कुठलेही व्यसन करते का हा प्रश्न कोणताही आडपडदा न ठेवता आपल्याला विचारता आला पाहिजे. हा प्रश्न विचारण्यात केलेली कुचराई ही पुढे अनेक त्रासांचे कारण ठरू शकते.

तीव्र मानसिक आजार हा जोडीदाराच्या निवडीच्या मधील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा ठरू शकतो. व्यसनाच्या तुलनेने तीव्र मानसिक आजारांचे समाजातील प्रमाण हे खूपच कमी असले तरी त्याच्या आयुष्यावर होणारा परिणाम खोलवर असतो. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे तीव्र मानसिक आजार हे सहसा १६ ते २५ या वयोगटात सुरू होतात. जोडीदाराची निवडदेखील बऱ्याच वेळा याच कालखंडात केली जाते. त्यामुळे त्या बाबतीत खास काळजी

घेणे आवश्यक असते. जर आपल्याला असा आजार असेल तर आपल्या भावी जोडीदाराला त्याविषयी माहिती देणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक वेळा मानसिक आजाराविषयी कळले तर लग्न जमायला अडचण येईल म्हणून अशा आजाराच्या विषयीची माहिती लपवली जाते. त्यामधून प्रश्न सुटण्याच्या ऐवजी वाढतात. विश्वासघातावर सुरू झालेले नाते पुढे टिकायला आणि फुलायला असंख्य अडचणी येतात. तीच बाब फिट्सच्या आजाराची. तीव्र मानसिक आजार आणि फिट्सचा आजार फार काळ लपून राहू शकत नाही आणि लग्नाच्या नंतर ते उघड झाले, तर त्या मधून दोन्ही कुटुंबाच्या साठी ताणाची परिस्थिती निर्माण होऊ शकते. ती टाळण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे लग्नाच्या आधी आपल्या संभाव्य जोडीदाराला त्या विषयी माहिती देणे. अशा स्वरूपाचे आजार असलेल्या व्यक्तींना देखील चांगला जोडीदार मिळू शकतो. पण त्यामध्ये जर पारदर्शीपणा आणि आजाराचा स्वीकार असेल तर असे नाते दीर्घकाळ टिकू शकते. जॉन न्याश या जगप्रसिद्ध शास्त्रज्ञाला स्किझोफ्रेनिया हा आजार असल्याची कल्पना असूनदेखील त्याच्या मैत्रिणीने त्याच्याशी विवाह केला आणि अतिशय समर्थपणे तो विवाह पेलूनदेखील नेला.

लग्नाच्या आधी चालू असलेल्या औषधांचा भावी संततीवर काही परिणाम तर होणार नाही ना?, या विषयीदेखील अनेक शंका लोकांच्या मनात असतात. मानसिक आजारांच्या बाबतीत तरी असे परिणाम सहसा दिसून येत नाहीत. पण गरोदरपणात मुलीला औषधे चालू असतील, तर त्याचा परिणाम जन्मणाऱ्या बाळाच्या वर होण्याची शक्यता असते. म्हणून त्याविषयी तज्ज्ञांशी बोलून निर्णय घेणे आवश्यक असते.

बाकीच्या मानसिक आजारांप्रमाणे स्वभावदोष हीदेखील जोडीदाराच्या निवडीमधील एक मोठी अडचण ठरू शकते. प्रत्येक व्यक्तीच्या स्वभावात काहीतरी उणे-अधिक असते. पण जर एखाद्या व्यक्तीला अनेक नात्यांच्या मध्ये जुळवून घेण्यात अडचण येत असेल, तर त्या व्यक्तीला स्वभावदोष असण्याची शक्यता असते. अशा स्वभावदोष असलेल्या जोडीदाराशी जुळवून घेण्यासाठी अधिक प्रयत्न करावे लागतात. स्वभावाचा कल आणि स्वभावदोष हे सहवासातूनच समजून येऊ शकतात म्हणून एकमेकांचे स्वभाव समजण्यासाठी जोडीदाराची निवड करू इच्छिणाऱ्या तरुण-तरुणींनी एकमेकांच्या स्वभावातील गुण-दोषांचा अंदाज घ्यायला शिकणेदेखील महत्त्वाचे आहे.

या सगळ्यांच्या बरोबरीने लैंगिकतेविषयी असलेले गैरसमज हेदेखील अनेक वेळा जोडीदाराची निवड न जुळून येण्याचे कारण ठरू शकतात. लैंगिकतेविषयी आपल्या समाजात अजिबात मोकळेपणाने बोलले जात नाही. त्या पार्श्वभूमीवर प्रत्येक व्यक्तीने याविषयी आपले समज-गैरसमज तज्ज्ञांशी बोलून समजून घेणे आवश्यक आहे. जोडीदाराची निवड करणे हे मूलत: मानसिक पातळीवर घडणारी प्रक्रिया आहे. आपण स्वत:चे; तसेच दुसऱ्याचे मानसिक आरोग्य आणि कल याविषयी सजग राहायला शिकलो तर त्यामधून जोडीदार निवडीमधील अनेक अडचणी आपण टाळू शकू, असा विश्वास वाटतो. मानसमित्र आणि मानसमैत्रिणी जोडीदाराच्या विवेकी निवडीच्या प्रक्रियेमध्ये खूप महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात. त्याची सुरुवात अगदी प्रेम आणि आकर्षण यांच्या मधील फरक समजून घेणे आणि आपल्या मित्र-मैत्रिणींशी त्याविषयी बोलणे यांपासून सुरू होऊ शकते. प्रेमात पडलेल्या मुला-मुलींना आई-वडिलांचा किंवा नातेवाईकांचा सल्ला हा बहुतांश वेळा पटत नाही. अशा वेळी मानसमित्र किंवा मैत्रीण त्यांना अधिक चांगले समजून घेऊ शकतात. आपल्या संभाव्य जोडीदाराच्या मधील स्वभावदोष किंवा आणखी कोणत्याही दोषाच्या विषयीदेखील सल्ला-मसलत करण्यासाठी देखील मानसमित्र/मैत्रीण मदत करू शकते. अंनिस आणि 'विवेक वाहिनी'चे अनेक तरुण कार्यकर्ते ही भूमिका आपल्या मित्र-मैत्रिणींसाठी खुबीने निभावताना आपल्याला दिसतात. युवा मानसमित्र आणि मैत्रिणीसाठी जोडीदाराची विवेकी निवड आणि मानसमैत्री यांची सांधेजोड करणे महत्त्वाची गोष्ट आहे.

कुटुंबातील हिंसाचार किंवा प्रेमातील अपयशातून आत्महत्या करणे असे अनेक पातळ्यांवरचे मानसिक प्रश्न हे जोडीदाराच्या विवेकी निवडीशी जवळून संबंधित आहेत म्हणून युवा मानसमित्र/मैत्रिणीने जोडीदाराची विवेकी निवड आणि मानसिक आरोग्य याविषयी सजग राहिले पाहिजे.

**– hamid.dabholkar@gmail.com**

**(अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र फेब्रुवारी २०१९ मधून साभार...)**

❒

# शॉपलिफ्टर्स : गुन्हेगारीमुळे जोडलेल्या कुटुंबाची गोष्ट

■ **मीना कर्णिक**

*कोरिडा असंही म्हणतात की, मूल जन्माला घातलं म्हणजे तुम्ही पालक बनत नाही, हे सत्य मला खूप लवकर लक्षात आलं होतं. कुटुंब म्हणजे काय, या प्रश्नाचं उत्तरं शोधण्याची माझी धडपड माझ्या सिनेमांमधून व्यक्त होते. 'शॉपलिफ्टर्स'मधलं कुटुंब एकत्र आहे ते काही त्यांचं रक्ताचं नातं आहे म्हणून नाही किंवा ते जो वेळ एकमेकांबरोबर घालवतात त्यामुळेही नाही. जपानमध्ये २०११ मध्ये झालेल्या भूकंपानंतर कुटुंबाला बॉण्ड फार महत्त्वाचा आहे, असा एक सूर जपानमध्ये ऐकू येऊ लागला होता. मी ते ऐकून अस्वस्थ होत होतो. त्यातूनच गुन्हेगारीच्या माध्यमातून जोडल्या गेलेल्या कुटुंबाविषयी काही तरी भाष्य करावं, असं माझ्या मनात आलं. जपानमध्ये पारंपरिक कुटुंबव्यवस्था आता अस्तित्वातच नाही. अर्थात, आदर्श कुटुंब कसं असावं यावरचा मी काही तज्ज्ञ नाही, पण त्याबाबतचे प्रश्न मात्र मी नक्कीच उपस्थित करू शकतो.*

हिरोकाझू कोरिडांचा 'शॉपलिफ्टर्स' हा नवा सिनेमा जपानमध्ये सुपरहिट झालाय. कान चित्रपट महोत्सवामध्ये या सिनेमाने सर्वोत्कृष्ट सिनेमाचं पारितोषिक पटकावलंय. 'कुटुंब'या आपल्या आवडत्या विषयावर कोरिडांचा हा आणखी एक सिनेमा, पुन्हा एकदा अस्वस्थ करणारा.

कुटुंब म्हणजे काय - चार माणसांचं एकत्र राहणं? नाती म्हणजे काय - फक्त रक्ताची नाती? पालक होणं म्हणजे काय - केवळ मुलांना जन्माला घालणं?

दिग्दर्शक हिरोकाझू कोरिडा यांचे बहुतेक सिनेमे हे कुटुंबव्यवस्थेविषयी असे अनेक प्रश्न निर्माण करणारे असतात. केंद्रस्थानी जपानमधील परिस्थिती असली, तर आपल्यातला प्रत्येक जण या सिनेमांशी नातं सांगू शकेल इतके ते वैश्विक असतात. 'लाईक फादर लाईक सन', 'अवर लिट्ल सिस्टर' किंवा त्याही आधीचे 'स्टिल वॉकिंग' किंवा 'नोबडी नोज' यासारखे सिनेमे ही काही उदाहरणं. या वर्षी इफ्फीमध्ये बघितलेला त्यांचा 'शॉपलिफ्टर्स'ही त्याला अपवाद नाही. कान चित्रपट महोत्सवामध्ये या सिनेमाला मानाचा पाम अ दोअर हा पुरस्कार मिळालाय आणि जपानमध्ये त्याने विक्रमी व्यवसाय केलाय. पण ही झाली सिनेमाबाह्य माहिती काय आहे 'शॉपलिफ्टर्स' ची गोष्ट?

नावावरून लक्षात येतं की - दुकांनामधून, म्हणजेच मोठमोठ्या मॉल्समधून वस्तू उचलणाऱ्या कुटुंबाची कहाणी कोरिडांनी सांगायला घेतलीये.

एक अतिशय गरीब कुटुंब. घरात एक आजी आहे. (किरीन किकी या जपानमधल्या नामवंत अभिनेत्रीने ही भूमिका केलीये. त्यांची ही शेवटची भूमिका. २०१८ च्या सप्टेंबर महिन्यात त्यांचं निधन झालं.) ओसामू शिबाटा आणि त्याची बायको नोबुयो आहेत. त्यांचा अकरा-बारा वर्षांचा मुलगा शोता आहे. आजीची नात अकी आहे. कुठल्याशा खुराड्यात त्यांचा संसार मांडलाय. धड उत्पन्न नाही, पण प्रत्येक जण कुठे ना कुठे काम करून जमेल तसे पैसे मिळवण्याच्या प्रयत्नात आहे. आजीचं पेन्शन हा उत्पन्नाचा मुख्य

स्रोत, आजीला तरुणपणी तिच्या नवऱ्याने सोडून दिलंय. आज तो हयात नसला, तरी त्याचं दुसरं कुटुंब चांगलं सुखवस्तू आहे. या सावत्र मुलाच्या मनात आजीच्या परिस्थितीविषयी एक अपराधीपण आहे. आजीने त्याला जाणीवपूर्वक खतपाणी घातलंय. त्यामुळे महिन्या-दोन महिन्यांतून एकदा ती आपल्या सावत्र मुलाला भेट देते आणि तो आपली श्रीमंतीची लाज वाटून तिला पैसे देत राहतो. नोबुयो एका हॉटेलमध्ये साफसफाईचं काम करतेय. धुवायला टाकलेल्या कपड्यांमधून काही मिळालं, तर ते स्वाभाविकपणे आपल्या खिशात टाकतेय. तर, अकी पोर्नोग्राफिक पीप शोसाठी काम करून पैसे कमावतेय. ओसामूने आपल्या मुलाला मॉल्समधून छोट्या-मोठ्या वस्तू चोरण्याचं प्रशिक्षण दिलंय. कधी खायच्या वस्तू, कधी शॅम्पूसारखी रोजच्या वापरातली उत्पादनं... जे शक्य होईल ते सगळं शोता सराईतपणे चोरू लागलाय. या वस्तूंच्या विक्रीतून थोडीफार कमाई होतेय.

एक दिवस रात्री मुलाबरोबर घरी परत येताना ओसामूला एक पाच-सहा वर्षांची मुलगी सापडते. अंगावर जखमांचे व्रण असलेली भेदरलेली युरी. ओसामू तिला आपल्याकडचा खाऊ देऊ करतो. ती बकाबका तो खाऊन टाकते. तिला रस्त्यावर कसं सोडून देणार, म्हणून ओसामू युरीला आपल्या खुराड्यात घेऊन येतो. सकाळ झाली की तिला तिच्या घरी परत न्यायचं, असं संपूर्ण कुटुंबाचं मत पडतं. नोबुयोच्या कुशीत लहानशी युरी शांत झोपून जाते.

दुसऱ्या दिवशी ओसामू आणि नोबुयो तिला घेऊन तिचं घर शोधतात, पण तिथे चाललेलं नवरा-बायकोचं भांडण ऐकून युरीला परत आपल्याकडे घेऊन येतात. युरीही या नव्या घरात रमते. शोताच्या मागे-मागे फिरू लागते. शोताप्रमाणेच मॉलमधून वस्तू उचलू लागते.

शिबाटा कुटुंबाचा युरी एक भाग बनून जाते खरी, पण तिचे खरे आई-वडील पोलिसांकडे जातात. युरीचा शोध सुरू होतो आणि शिबाटा कुटुंब पकडलं जातं. त्यातून अनेक गोष्टी बाहेर येतात. प्रत्यक्षात कुटुंबच नसलेलं हे कुटुंब विखुरलं जातं.

पोलीस ओसामूला विचारतात, ''या मुलांना चोरी करायला शिकवताना तुला लाज नाही वाटली?''

''मला जे येत होतं ते मी त्यांना शिकवलं,'' केविलवाणा ओसामू उत्तर देतो.

युरीच्या विरहाने व्याकूळ झालेली नोबुयो कुटुंब कल्याण खात्यातल्या बाईला विचारते, ''केवळ जन्म दिल्याने आई-बाप बनता येतं का?''

हे नवरा-बायको गुन्हेगार तर आहेतच, पण म्हणून युरीचे खरे आई-वडील निर्दोष आहेत का?

आणि युरीसाठी पोलिसांचं लक्ष स्वत:कडे वेधणारा शोता एकाच वेळी निरागसही आहे आणि सराईत उचल्याही.

कुटुंब नसलेल्या या कुटुंबामधलं हे गुंतागुंतीचं नातं, त्यांचं एकमेकांवरचं प्रेम, त्यांचा पैसे कमावण्याचा हव्यास, त्यांची हतबलता, त्यांच्या आयुष्यातले छोटे-छोटे आनंदाचे क्षण, त्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी अशा वेगवेगळ्या स्तरांमधून 'शॉपलिफ्टर्स'चा प्रवास होतो आणि कोरिडा आपल्याला त्यांच्या ठेवणीतला आणखी एक मास्टरपीस पाहिल्याचं समाधान देतात. त्याबरोबरच सुन्नही करतात.

कोरिडांच्या 'नोबडी नोज'मध्ये आई सोडून गेल्यानंतर अकीरा आपला धाकटा भाऊ आणि दोन लहान बहिणींना घेऊन कसा तग धरतो, हे आपण पाहतो. 'स्टिल वॉकिंग' ही एका कुटुंबाची गोष्ट आहे. खऱ्याखुऱ्या कुटुंबाची. पंधरा वर्षांपूर्वी पाण्यात अपघाताने वाहून गेलेल्या घरातल्या मोठ्या मुलाच्या वार्षिक श्राद्धाच्या निमित्ताने वर्षातून एकदाच एकत्र येणाऱ्या योकोयामा कुटुंबाची.

'लाईक फादर लाईक सन'मध्ये त्यांनी मुलांची अदलाबदल झाल्यानंतर आपला पोटचा मुलगा आपला, की आपण इतकी वर्षं ज्याला जीव लावला तो आपला अशा कोंडीत सापडलेल्या बापाची कहाणी आहे. आणि 'अवर लिटल सिस्टर' ही तीन बहिणींनी वडिलांच्या निधनानंतर सावत्र बहिणीचं पालकत्व स्वीकारल्याची गोष्ट. 'आफ्टर द स्टार्म' बायकोपासून वेगळ्या झालेल्या. फारशी कमाई नसलेल्या आणि मुलापासून आपली ही परिस्थिती लपवणाऱ्या बापाची घालमेल दाखवते.

कोरिडांचे हे अलीकडच्या काळातले काही सिनेमे. (त्यांचा 'द थर्ड मर्डर' हा वेगळ्या पठडीतला सिनेमा होता. मला स्वत:ला तो खूप आवडला असला, तरी कोरिडांच्या सिनेमांच्या मानाने त्याला फारसा चांगला प्रतिसाद मिळालेला नाही.) या सगळ्या सिनेमांचा 'शॉपलिफ्टर्स' हा कळस आहे का?

हा प्रश्न विचारल्यावर कोरिडांनी उत्तर देताना म्हटलंय, ''माझा तसा हेतू तरी निश्चित नव्हता. माझ्या कारकिर्दीमध्ये मी अनेक वेळा त्याच त्या थीम्सचा उपयोग केलेला आहे आणि त्या सगळ्या थीम्सना एकत्र आणावं, असा निर्णय मी जाणीवपूर्वक निश्चितच घेतलेला नव्हता. पण आता सिनेमा पूर्ण झाल्यानंतर हे असं घडल्याचं माझ्या लक्षात आलंय.''

कोरिडा असंही म्हणतात की, मूल जन्माला घातलं म्हणजे तुम्ही पालक बनत नाही, हे सत्य मला खूप लवकर लक्षात आलं होतं. कुटुंब म्हणजे काय, या प्रश्नाचं उत्तर शोधण्याची माझी

धडपड माझ्या सिनेमांमधून व्यक्त होते. 'शॉपलिफ्टर्स'मधलं कुटुंब एकत्र आहे ते काही त्यांचं रक्ताचं नातं आहे म्हणून नाही किंवा ते जो वेळ एकमेकांबरोबर घालवतात त्यामुळेही नाही. जपानमध्ये २०११ मध्ये झालेल्या भूकंपानंतर कुटुंबाला बॉण्ड फार महत्त्वाचा आहे, असा एक सूर जपानमध्ये ऐकू येऊ लागला होता. मी ते ऐकून अस्वस्थ होत होतो. त्यातूनच गुन्हेगारीच्या माध्यमातून जोडल्या गेलेल्या कुटुंबाविषयी काही तरी भाष्य करावं, असं माझ्या मनात आलं. जपानमध्ये पारंपरिक कुटुंबव्यवस्था आता अस्तित्वातच नाही. अर्थात, आदर्श कुटुंब कसं असावं यावरचा मी काही तज्ज्ञ नाही, पण त्याबाबतचे प्रश्न मात्र मी नक्कीच उपस्थित करू शकतो. 'शॉपलिफ्टर्स' मध्ये मी एका घरात राहणाऱ्या तीन पिढ्यांना तपासून पाहत होतो. पारंपरिक जपानी घरांमध्ये अशी कुटुंबं आपल्याला पाहायला मिळतात. मात्र, आजच्या न्यूक्लिअर कुटुंबाचं चित्र वेगळं आहे आणि तेही झपाट्याने बदलतंय. २००२ मध्ये 'नोबडी नोज' साठी मी लहान मुलांच्या ऑडिशन्स घेत होतो. ही बहुतेक मुलं तेव्हा आपल्या आजीबरोबर किंवा आजोबांबरोबर किंवा दोघांबरोबर राहत असल्याचं माझ्या लक्षात आलं. त्यांच्या बोलण्यातून, ते वापरत असलेल्या शब्दांमधून ते जाणवायचं. पण गेल्या पंधराएक वर्षांत - विशेषत: टोकयोसारख्या शहरांमधून - हे दृश्य दिसत नाही. बहुतांश वयस्क माणसं आता एकटी राहत असल्याचं लक्षात येतं. मुलांचं आपल्या आजी-आजोबांबरोबर खास नातं आहे, असं वाटत नाही. हे चांगलं की वाईट यात मला पडायचं नाही; पण ते घडलंय आणि मला त्याविषयी जे वाटतं, ते मी माझ्या सिनेमांमधून मांडू पाहतोय.

कोरिडा आता एका नव्या सिनेमाच्या तयारीला लागले आहेत. जवळपास पंधरा वर्षांपूर्वी त्यांनी लिहिलेल्या नाटकावर हा सिनेमा बेतलेला आहे. त्याचं नाव सध्या तरी त्यांनी 'ट्रुथ' असं ठेवलंय. मुख्य म्हणजे, हा सिनेमा जपानी भाषेत नाही, तो फ्रेंच भाषेत आहे. त्याचं शूटिंग पॅरिसमध्ये होणार आहे. आणि इथन हॉक व ज्युलिएट बिनोश त्यात काम करणार आहेत. बिनोशची आई एक नावाजलेली अभिनेत्री असते. तिची वादग्रस्त आत्मकथा प्रकाशित होते, ज्यामुळे इथन आणि बिनोश हे नवरा-बायको पॅरिसला परत येतात. हाही फॅमिली ड्रामाच आहे; पण एका वेगळ्या, कोरिडांसाठी अनोळखी अशा भोवतालामध्ये घडणारा.

आपल्या या नव्या साहसाविषयी कोरिडा म्हणतात, ''माझं करिअर मी तीन टप्प्यांमध्ये विभागतो. १९९१ मध्ये मी सुरुवात केली तेव्हापासून ते २०११ मध्ये 'आय विश' या सिनेमापर्यंतचा एक टप्पा. ''लाईक फादर लाईक सन'' पासून दुसरा टप्पा सुरू झाला. या सिनेमाने मला आंतरराष्ट्रीय स्तरावर एका वेगळ्याच स्थानावर नेऊन ठेवलं. हे माझं करिअर आहे, यावर माझाच विश्वास बसत नव्हता, अशा पातळीवर. तिथपासून ते 'शॉपलिफ्टर्स' पर्यंतचा हा प्रवास म्हणजे माझ्या कारकिर्दीतला दुसरा टप्पा. आणि आता या फ्रेंच सिनेमामधून मी नव्या प्रवासाला सुरुवात करतोय, असं मला वाटतं.''

तेव्हा पुढच्या वर्षी कोरिडांचा हा नवा कोरा सिनेमा इफ्फीसारख्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये पाहायला मिळेल, अशी अपेक्षा करायला काहीच हरकत नाही.

''शॉपलिफ्टर्स''चं ट्रेलर https://www.youtube.com/wathch?v=ZdiqxV0B13Q इथे बघा.

**- मीना कर्णिक, मुंबई**

meenakarnik@gmail.com Mob.-9819767518

(२० ते ३० नोव्हेंबर या काळात दरवर्षी पणजी, गोवा येथे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव होत असतो, त्या महोत्सवाला मीना कर्णिक गेली अनेक वर्षे उपस्थित राहतात. या वर्षीच्या महोत्सवातील त्यांना विशेष भावलेल्या चित्रपटांविषयी त्या पाच लेख साधनात लिहिणार आहेत, त्यातील हा तिसरा लेख.)

**(साप्ताहिक साधना - २९ डिसेंबर २०१८ मधून साभार...)**

❐

# गांधीजींचे विचार

- देवाला कोणताच धर्म नसतो.
- अहिंसा हे बलवांनाचे शस्त्र आहे.
- रोजच्या प्रार्थनेत शब्द नसतील तरीही चालेल, पण हृदय हवे. हृदयाशिवाय आलेले शब्द मात्र नको.

# माहुलचा लढा माणूस म्हणून जगण्यासाठी

■ **मेधा पाटकर**

*कारखाने, तेलशुद्धीकरणं कंपन्यांमुळे माहुल परिसरातील हवा आणि पाणी प्रदूषित झालं आहे. हा परिसर राहण्यायोग्य नसल्याने आमचे अन्यत्र पुनर्वसन करावे, या मागणीसाठी तानसा जलवाहिनी प्रकल्पग्रस्तांनी आंदोलन सुरू केले आहे. सरकारने आश्वासन देऊनही ते पाळले नाही तसेच न्यायालयातही खोटी माहिती दिली जाते असे या आंदोलकांचे म्हणणे आहे. अशीच काहीशी उपेक्षा राज्यातील अनेक प्रकल्पग्रस्तांची होत आहे. 'जीवन बचाओ' आंदोलनाच्या निमित्ताने या प्रश्नाचे भेदक वास्तव मांडणारा लेख...*

रस्त्यावर चालता चालता मिळालेल्या आपल्या संपूर्ण ताकदीनिशी ती घोषणा देत होती - 'प्रकाश मेहता, होश में आओ! प्रकाश मेहता, शुद्धीवर या!' बघता बघता मीडियाने तिला घेरलं आणि विचारलं, 'कुणाच्या नावाने घोषणा देते आहेस?' ती पटकन म्हणाली, 'सगळ्यांच्या, ज्यांनी आम्हाला सर्वांना खाऊन टाकलंय! माझे वडील मेले, माझी मोठी बहीण टी. बी. ने आजारी आहे आणि मलाही लकवा झाला होता पण बचावले.' मी बघितलं, एका मीडियाकर्मीला ती बनवलेली खोटी गोष्ट वाटली. तो थोडं हेटाळणीसारखं हसला, तर बाजूला उभी असलेली दुसरी महिला कार्यकर्ती रागाने पुढे आली, 'तुम्ही हसता आहात!? का, खोटं वाटतंय? आमची मरणं चेष्टा वाटते का?' तो गप्प झाला...

घराघरात आजारीपण बघत मरणं अनुभवणारे जेव्हा रस्त्यावर उतरतात तेव्हा त्यांना आपल्या एकत्रित शक्तीने भान येते आणि शासनकर्ते त्यांच्यासमोर थोडे झुकतातही. त्या दिवशीही ३ किलोमीटर लांब पसरलेली मानवी शृंखला शेवटी प्रकाश मेहतांच्या घरी पोहचलीच! पोलिसांनी यांचा इरादा आणि ताकद ओळखून आपली ढिलाई सोडली आणि मंत्री महोदयांच्या घराला वेढा देऊन सुरक्षित केले. त्या ठिकाणी गर्दी जमताच प्रथम नजरेत भरली ती दिवाळीसाठी केलेली दिव्यांची चमचमती रोषणाई! तो झगमगाट काळी दिवाळी करून आलेल्या या सर्वांची मने चिरीत गेला. त्यांच्या तोंडून उत्स्फूर्तपणे गाणे निघाले, **'धनवानोंके राजमहल ये, गरीबके है फांसी घर! चलो बसाये नया नगर, हम चले बसाये नया नगर!'**

मुंबईची ५२% जनता जी गरीब वस्त्यांत राहते, त्यांच्या मनातील गोष्टच जणू या गाण्यात झळकली आहे. घराचा ठिकाणा नाही की सुरक्षित आशियाना नाही, अशा स्थितीत जगणारे हे लोक का म्हणून संघर्षासाठी रस्त्यावर येतात, त्यांना आपली शांतता सोडून, दिवसाची मजुरी सोडून, का म्हणून शासनाच्या समोर येऊन खडे सवाल करावे लागतात? यामध्ये स्त्रिया आणि मुलेही पुढाकार का घेतात? याचं एकच कारण आहे की उजाडणारे घर आणि चिरडला जाणारा जगण्याचा अधिकार! जागे जागेवरून उखडून वाऱ्यावर टाकलेली ही कुटुंब संघर्षाशिवाय परत वसण्यासाठी घरं नाही मिळवू शकत. शासन यांचं का ऐकत नाही? अशा गरिबांच्या, असाहाय्यांच्या विस्थापनांना 'विकास' मानणाऱ्या लोकांना माहीत असायला हवे की जेव्हा यांचे प्रश्न सशक्त रूपात समोर येतात तेव्हाच शासन आपले तोंड उघडते, त्यांचे प्रश्न ऐकते.

१२ नोव्हेंबरला, मानवी शृंखलेच्या दुसऱ्याच दिवशी, गृहनिर्माण मंत्री प्रकाश मेहता यांनी मंत्रालयामध्ये, इतर अधिकाऱ्यांच्या गराड्यात

माहुलचे प्रतिनिधी आणि आम्ही कार्यकर्ते यांच्याशी चर्चा केली आणि स्वत: घोषित केले की, एअरपोर्ट योजनेमधील प्रभावितांसाठी जी घरे बांधली होती, ती अजूनही वापरली गेली नाहीत आणि रिकामी आहेत, ती या ५५०० कुटुंबांना देण्यात येतील. विरोधी पक्षाच्या नसीम खान यांनीही ना हरकत पत्र देऊन आपली भूमिका स्पष्ट केली. सत्तेमध्ये राहूनही संघर्षशील असणाऱ्या शिवसेनेने प्रथम उत्साह दाखवला. आमदार मंगेश कुडाळकरांबरोबर जोडलेले माहुलचे कार्यकर्ते प्रभावित झाले. म्हाडाचे अध्यक्ष उदय सामंत यांनी ३०० घरं देण्याचे आश्वासनही दिले. यात राजकारणही सुरू आहेच! कारण अंतिम मंजुरी मुख्यमंत्री देणार आणि ती टाळलीच जाते आहे!

२८ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळीच घरादारातून निघून माहुलच्या पुनर्वसाहतीतून शेकडोंच्या संख्येने स्त्री-पुरुष तानसा पाइपलाइनच्या क्षेत्रात पोहोचले. त्यांनी विद्याविहारमध्ये कुणाच्याही वाटेत न येता, कुठलेही काम न रोखता तिथे **'जीवन बचाओ आंदोलन'** सुरू केले. या सर्वांना जिवंत व निरोगी राहण्यासाठी, आपल्या कुटुंबीयांना वाचवण्यासाठी सुमारे १०० हून अधिक मृत्यू झाल्यानंतर, रोजच्या रोज आजार भोगत, अखेरीस नाइलाजानेच हा निर्णय घ्यावा लागला आहे. त्यांच्या किमान ३० ते ५० वर्षे जुन्या घरा-वस्तीतून उठवून, उखडून काही वर्षांपूर्वी त्यांना माहुल येथे आणून टाकणारे शासन, तिथले प्रदूषण, प्रदूषण नियंत्रण मंडळाची लापरवाही, आजार व मृत्यू, नुकताच झालेला भारत पेट्रोलियम प्रकल्पामधील स्फोट याकडे पूर्णत: दुर्लक्ष करीत असल्याने या हजारो कुटुंबांवर हा जगण्या-मरण्याचा संघर्ष उभा करण्याची वेळ आली आहे. राज्य सरकार, सर्व राजकीय पक्षांचे लोकप्रतिनिधीवर समाजातील संवेदनशील नागरिक, संस्था, संघटनांची आज परीक्षाच आहे!

मुंबईला शेकडो वर्षांपासून पाणीपुरवठा करणाऱ्या पाइपलाइनला, पाइपलाइन ५ मीटर्स खोल भूमिगत असताना, त्याच्या आजूबाजूला राहणाऱ्यांपासून धोका आहे, तिथे राहणारी गरीब, कष्टकरी व मध्यमवर्गीय माणसेही जणू आतकंवादी आहेत, असा दावा करत एक याचिका त्या क्षेत्रातील काही उच्चवर्गीयांनी दाखल केली. मुंबई हायकोर्टात यावर सुनावणी होऊन खरोखर धोका किती, कुणाचा आहे का, यावर फारशी चर्चाही न होता निर्णय झाला. या भागातील हजारो कुटुंबांना विस्थापित केले तर वसवणार कुठे, याचा निर्णय अखेरीस उच्च न्यायालयाने दिला. त्यात दिंडोशी क्षेत्राचा उल्लेख होता, माहुलचा नव्हता. माहुल हे क्षेत्र तर आमच्या चेंबूरमध्ये गेलेल्या बालपणापासून गॅस चेंबर म्हणूनच ओळखले जात होते. तिथल्या शिजवलेल्या भाताचा रंग काही वेळातच पिवळा होतो, याची उघड चर्चा होत होती. नंतर माहुलच्या गावकऱ्यांनी राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणापुढे आपले गाऱ्हाणे न्यायिक प्रकरण म्हणून लढवणे सुरूच होते... असे असतानाही पाइपलाइन क्षेत्रातील सुमारे ५५०० कुटुंबांना माहुलमध्ये पुनर्वसित करण्यात आले! माहुलमध्ये का व कसे, उच्च न्यायालयाचा निर्णय डावलला तो का व कसा, याचे उत्तर देशाच्या महालेखापरीक्षकांच्या मार्च २०१७ पर्यंतच्या सहाव्या क्रमांकाच्या महाराष्ट्राबाबतच्या रिपोर्टमध्ये सापडते. **''विकासकाला असमर्थनीय फायदा व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची चुकीची मंजुरी''** या मथळ्याखाली अहवालातून स्पष्ट चित्र पुढे येते. केंद्र शासनाच्या धोक्याच्या सूचनाही डावलून झोपु प्राधिकरणाने प्रकल्पग्रस्तांच्या पुनवर्सनाच्या नावे खासगी विकास १४ ऑक्टोबर २००९च्या उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आधार घेऊन, मुंबईच्या पिण्याच्या पाण्याच्या सुरक्षिततेचा मुद्दा दाखवून तेथील ७५०० कुटुंबांना हलवण्याचे नव्हे तर विकासकांच्या प्रस्तावांची तपासणी 'मुंबई विकासाचे नियम' (डीसीआर) च्याच चौकटीत करण्याचे काम केले. त्यात विकासकांना अर्थातच गृहनिर्माणाच्या बिल्डरवादी धोरणांनुसार 'टीडीआर-विकासहक्कांचे स्थानांतरण'च्या माध्यमातून अवाच्या सवा लाभ, गरिबांसाठी/प्रकल्पग्रस्तांसाठी घरबांधणीच्या बदल्यात अन्यत्र खासगी व्यापारी घरे बांधण्याच्या मंजुरीच्या रूपाने मिळाला. अहवाल स्पष्ट म्हणतो की, एका खासगी विकासकाची (जो डीबी रिॲल्टीज होता) जमीन ही माहुल येथे ८५८२ प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी म्हणून स्थलांतरित केली गेली. या एकूण प्रकल्पासाठी एकूण ५९ इमारती (७० मीटर उंचीच्या) बांधण्यासाठी सोयी-सुविधांसाठी मिळून १,५६,६४१ चौ. मीटर्स भूखंडाची आवश्यकता असताना त्यातील २८,४१८.७८ चौ. मी. जमीन ही भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर (बीएआरसी)च्यात ताब्यात १९६३ पासून होती. सुरक्षिततेसाठी बफर झोन म्हणून ती राखीव होती. बीएआरसीने राष्ट्रीय सुरक्षेपोटी हरकत घेतली आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. (एचपीसीएल) ही घातक उद्योगात गणली जाते म्हणून त्यापासून ५२ मी. चे अंतर सोडण्याची मंजुरी औद्योगिक क्षेत्र निवासी क्षेत्रात परिवर्तित करत, मुंबई महानगरपालिकने दिली!

प्रत्यक्षात हे सर्व हरकती व अटी धाब्यावर बसवून त्या विकासकाला ५९ इमारती बांधण्याची परवानगीच नव्हे तर नियमानुसार कार्य पूर्ण करत, एकेका टप्प्यात लाभ देण्याऐवजी त्याआधीच, अनियमित लाभ दिले गेले! या भ्रष्टाचारापोटी ज्यात महानगरपालिका, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, नगरविकास मंत्रालय, अधिकारी व राजकीय होते. विकासकासह संगनमत करून सामील असल्याविना हे होणे

शक्य नव्हतेच! या साऱ्याबाबत कॅग अहवालावरही आजपर्यंत कारवाई झालेली नाही, हेही लक्षणीयच नाही का?

या सर्वांची फळे हजारो कुटुंबीयांना, मुला-बाळांना, आया-बहिणींना भोगावी लागत आहेत. माहुलमध्ये जबरदस्ती स्थलांतर केले गेले. तेही गेल्या २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत. आजच्या मुख्यमंत्र्यांनी (व्हिडीओ रेकॉर्डवर असलेले) "भाजपला मते दिलीत तर माहुलमध्ये स्थलांतरित करणार नाही" असे भरघोस दिलेले आश्वासनही मोडीत काढून! अनेक वर्षांपासून इथे आणून पुनर्वसित केलेल्या कुटुंबांच्या उपजीविकेचा, मुला-बाळांच्या शाळा मूळ जागीच राहिल्या. अनेकांच्या नोकऱ्या व छोटे उद्योग वा कामेही तिथेच याचा व माहुलवरून जाण्यायेण्यासाठी वाहन व्यवस्था किंवा नव्या, सुयोग्य शाळा, दवाखाने आदी सोयींचाही विचार केला गेला नाहीच! पण त्याहीपेक्षा प्रदूषणाचा विचार, आरोग्याचा काय जगण्याच्या घटनात्मक अधिकाराचा व शासनाच्या या बाबतच्या जबाबदारीचा विचारही केला गेला नाही. या प्रकरणास दडपण्यासाठी म्हणून तर एकीकडे राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे... पुढे माहुलच्या गावकऱ्यांची प्रदूषणाविरोधी केसची सुनावणी व त्याद्वारा अनेक आदेश, ज्यातून प्रदूषण नियंत्रण मंडळाचे कारनामे (की बेकारनामे?) बाहेर पडत असतानाही, मुंबई उच्च न्यायालयाचा २००९ चाच आदेश दाखवून पुनर्वसनाच्या चाव्या लोकांच्या हाती देत गेले शासनकर्ते! दुसरीकडे आज कुणाच्या मुलाने मान टाकली, कुणाला लकवा झाला, कुणी देवाघरी गेले, अनेकांना डोळ्यांचा, श्वासोच्छ्वासाचा त्रास हे सर्व भोगत राहिले!

याबाबत पाइपलाइन्समुळे उठवल्या जाणाऱ्या असंख्य कुटुंबीयांची याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल असताना मुद्दे उठले, स्वतंत्र अर्ज याचिका दाखल झाली तरी महानगरपालिका व शासन कोर्टासही भ्रमित करण्यासाठी की काय, माहुलमध्ये 'इन्फ्रास्ट्रक्चर' म्हणजेच सोयी उभ्या करण्याचेच मुद्दे व आश्वासन मांडत राहिले! हायकोर्टाने आयआयटी, मुंबई यांना याबाबत शोध घेण्यासाठी कंत्राट दिले. १६ लाख रु. त्यांना दिलेही गेले. त्यांच्या अंतरिम अहवालात २०१३ पासून केल्या गेलेल्या सर्वेक्षणातून आलेल्या जलप्रदूषणासारख्या तथ्यांबरोबरच त्यांनी बहुविध दोष संकटांच्या दृष्टीने 'जगण्यासाठी हा परिसर योग्य आहे अथवा नाही' याचा अभ्यास सुरू करण्याचे ठरवून कोर्टास कळवलेले आहे. या साऱ्यासाठी वेळ निघून जात असतानाच मृत्यू व आजारास बळी पडतच आहेत मुले-बाळे, माणसे! यामुळेच तर 'जीवन बचाओ आंदोलन' हा अहिंसक पण सत्याग्रही मार्ग त्यांनी स्वीकारला.

या प्रकरणात विशेष पुढे आलेली बाब म्हणजे शासनकर्त्यांचा धडधडीत खोटारडेपणा! कोर्टातसुद्धा चुकीची (खोटी!) आकडेवारी देणारे शासक मंत्रालयातील चर्चाही भ्रमित करतात, मुख्य मुद्दे डावलतात, आश्वासने देऊन पायदळी तुडवतात याचा अनुभव अनेक प्रकरणांत आला. विशेषत: विकासकांच्या संबंधातील, गोळीबार (खार) येथील सत्यासाठीच लढणाऱ्या १०० वर्षे जुन्या वसाहतीतील लोकांच्या संदर्भात व अनेक ठिकाणी आलाच!

तरीही लोकशाहीवर विश्वास ठेवून ज्या वेळी मुद्दे चर्चेत व कोर्टात उठले तेव्हा माहुलच्या ५५०० कुटुंबांना, निदान याचिकाकर्त्यांना (८०० कुटुंबे) स्थलांतरित करण्यासाठी घरेच उपलब्ध नसल्याने धडधडीत खोटे शपथपत्र सादर केले गेले. माहितीच्या अधिकाराखाली तसेच अन्य उपलब्ध आकडेवारीनुसार हजारो घरे बांधून तयार आहेत, तरीही न्यायपालिकेतील संघर्षाच्याही मर्यादा आहेत. शासनाच्याच विविध संस्थांपैकी एसआरए, एमएमआरडीए इ. उपलब्ध घरांचा एकत्रित विचार करता येऊ शकतो, हे मुख्यमंत्र्यांच्या वतीने चर्चेस बसलेल्या शिक्षणमंत्र्यांनी महानगरपालिका आयुक्तांसमोर २०० च घरे उपलब्ध आहेत, असा खोटा दावा आंदोलनकर्त्यांनी खोडून काढल्यावर मान्य केले होते. मात्र मुख्यमंत्री आजकाल मोदी मॉडेल स्वीकारल्यागत, 'अळीमिळी गुपचिळी' चा आधार घेतात हेच दिसले!

माहुलचे मूळ गावकरी लढताना राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने, सीलॉर्डसारख्या प्रदूषणकारी कंपन्या, नियंत्रण इ. वर आदेशांचे पालन केले नाही म्हणून १ कोटींचा दंड नुकताच जाहीर केला. त्यामागेही प्रदूषण नियंत्रण मंडळाची खोटी शपथपत्रे व अहवाल कारणीभूत ठरते. यावरूनही हे प्रकरण किती खरे व गंभीर आहे, याचाच निर्वाळा मिळाला आहे.

एवढ्या स्पष्ट झालेल्या परिस्थितीत न्याय-अन्यायच नव्हे तर जीवन-मरणाच्या सीमारेषेवरील या रहिवाशांनी - त्यात कुणी प्राध्यापक, सरकारी कर्मचारी, छोटे व्यापारी, विद्यार्थी, मोलकरणी, कामगार इ. नी जीवन बचाओ आंदोलनाचा आधार घेतला नसता तरच नवल! या व अशा जगण्याच्या हक्कासाठीच्या संघर्षास मात्र पोलिसी कारवाईने नव्हे तर न्यायपूर्णतेने निर्णय देणारे राज्यकर्ते या देशात आहेत का, याचेच उत्तर त्यांना हवे आहे.

माहुलच्या निर्वासितांचा हा संघर्ष टोकापर्यंत नेण्याशिवाय या हजारो लोकांसमोर काही दुसरा पर्याय नाही. सत्ताधाऱ्यांना धडा शिकवण्यासाठी निवडणुकांचे घोडे मैदानही फार दूर नाही!

(दै. लोकसत्ता वरून साभार)

medha.narmda@gmail.com

(आंदोलन-शाश्वत विकासासाठी साभार...)

❐

# संतांनी समतेचा विचार मांडून धार्मिक दहशतवादाला व असहिष्णुतेला विरोध केला

■ **ह.भ.प. शामसुंदर सोन्नर महाराज**

ह.भ.प. शासुंदर सोन्नर महाराज यांनी आपल्या भाषणाची सुरुवात एका सुंदर - सुश्राव्य श्लोकाने केली. संत ज्ञानेश्वरांच्या अभंग पंक्तीही यांनी उद्‌धृत केल्या. **''जे अविवेकाची काजळी। फेडोनी विवेकदीप उजळी। ते योगिया पाही दिवाळी निरंतर।।''**

धार्मिक दहशतवाद आणि असहिष्णुतेविरोधी परिषद घेण्याचे कारण नमूद करताना त्यांनी वारकरी संप्रदायाच्या स्थापनेचा संदर्भ दिला. ज्या-ज्यावेळी समाजात असे असहिष्णु वातावरण तयार झाले किंवा होत असते, त्या-त्या वेळी समाजातील विचारवंत एकत्र येऊन अशा विरोधी वातावरणाचा बीमोड करण्यासाठी समाजजागृतीचे प्रयत्न करतात. वारकरी संप्रदायाची स्थापनाही अशाच एका परिस्थितीत झाली. सध्याचे सामाजिक वातावरण असहिष्णू होण्याची कारणेही त्यांनी नमूद केली. कुणीतरी घरात मांस ठेवलं, कुणीतरी आमच्या विरोधात बोलतं म्हणून अशा लोकांना संपवण्याची भाषा बोलली जाते. त्यांना संपवून टाकण्याचा प्रयत्न केला जातो. केवळ अफवा पसरवूनही असहिष्णुतामय वातावरण समाजात निर्माण करण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात होत आहे.

असाच कार्यक्रम सातशे वर्षांपूर्वीही होत होता. विठ्ठलपंतांची मुले म्हणजे संन्याशाची मुले म्हणून छळ नाही केला, तर गीतेतील तत्त्वज्ञान विठ्ठलपंतांचा मुलगा मराठीतून सांगतो. म्हणून त्यांचा छळ केला गेला. त्यांच्या मुलांना पोरकं केलं गेलं. केवळ संन्याशाची मुले म्हणून ही मुले जन्मत:च मारून टाकली असती; पण तसे न करता, संत ज्ञानेश्वरांनी मराठीत गीता-तत्त्वज्ञान सांगितले म्हणून त्यांचा छळ केला गेला. ही मोठी असहिष्णुता त्यावेळीही होती.

पंढरपूरच्या वाळवंटात २९ किलोमीटर अंतरावर संत चोखोबांचे गाव आहे. चोखोबा पंढरपुरात जात. मंदिराच्या बाहेरून त्यांनी फेरी मारली म्हणून त्यांना मार-मार मारले. ही पराकोटीची असहिष्णुता होती.

पंढरपुरात ज्यावेळी विठ्ठल मंदिरातून बडवे हटविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यावेळी चॅनेलसमोर बोलताना बडव्यांचे प्रतिनिधी वा. ना. उपाध्ये यांनी असे सांगितले की, आम्ही कोणत्याही वारकऱ्याला कधीही विरोध केला नाही. कुणालाही कोणत्याही प्रकारे त्रास दिला नाही. हजार वर्षांत असं कधी घडलं नाही.

तेव्हा स्वत: सोन्नर महाराजांनी त्यांना वस्तुनिष्ठ उत्तर दिले. सातशे वर्षांपूर्वीचा लेखी पुरावा त्यांनी चॅनेलपुढे कथन केला. जेव्हा संत चोखोबाला असहिष्णू मंडळींनी जीवघेणा त्रास दिला, तेव्हा चोखोबांनी आपले गाऱ्हाणे, आपली वेदना खुद्द विठ्ठलालाच प्रश्नातून विचारली -

**''धाव घाल विठू आता, चालू नको मंद,**
**बडवे मज मारिती, असा काय माझा अपराध?''**

तरीही बडवे चोखोबाला हीन-दीन ठरवितात, ते विचारतात -

**विठोबाचा हार तुझ्या कंठी कसा आला?**
**का रे म्हणसी महारा, देव बाटविला?**

अशा प्रकारचे असहिष्णू वातावरण त्यावेळी होते. असे सोन्नर महाराजांनी उपाध्येंना सांगितले. तेव्हा उपाध्ये निरुत्तर झाले. पुढे सोन्नर महाराजांनी हे कथन केल्याचे सांगितले की, पंढरपुरात वारकरी एकमेकांना भेटतात, एकमेकांच्या पाया पडतात, परस्परांना हात

उंचावून, वर करून आशीर्वाद देतात; पण अशा प्रकारची कृती बडव्यांनी कधीही केल्याचे दिसून येत नाही. कोणत्याही बडव्याने शूद्राच्या पाया पडल्याचे दिसले नाही. शूद्राने बडव्याला पाया पडून नमस्कार केला, तरीही बडव्याने आशीर्वाद देण्यासाठी हात वर केला नाही.

खरे वारकरी नेहमीच म्हणत आले, **'वर्ण, अभिमान विसरली याती।'** आणि त्यापुढील प्रक्रिया म्हणजे **'एकमेका घालू लोटांगण।'**

संत नामदेवांनी सहिष्णुतेचा झेंडा पंजाबपर्यंत नेला. जेव्हा ते आपल्या मूळ गावी आले, तेव्हा तेथे जवळच असलेल्या औंढा नागनाथ मंदिरात कीर्तनाचा कार्यक्रम घेण्याचे ठरविले. कीर्तन सुरू केले; पण थोड्याच वेळात तेथे काही विशिष्ट वस्त्र धारण केलेले लोक तेथे आले आणि म्हणाले,**''आमच्या देवाला नैवेद्य दाखविण्याची वेळ आली आहे. आम्ही सोवळ्यात आहोत. तुमचा स्पर्श झाला, तर आम्हाला बाट लागेल. तुमचे कीर्तन थांबवा आणि निघा.''**

संत नामदेवांचा नाईलाज झाला; पण आपल्या टाळकरी–वादक मंडळींना घेऊन संत नामदेवांनी तेथेच मंदिराच्या मागील बाजूस कीर्तन सुरू केले. पंजाबात राहून आल्याने हिंदी भाषेचा प्रभाव होता. त्यांनी अभंगातून पुढीलप्रमाणे हिंदीतून विठ्ठलाला प्रश्न विचारला -

**''हीन-दीन जात मोरी, पंढरी के राया।**
**ऐसा नामा दर्जी, तुजे काहें को बनाया? ''**

स्त्री-समतेचा आणि समानतेचा कृतिशील विचार महाअंनिसने नेहमीच मांडला. नामदेवांच्या अनेक स्त्री-शिष्या होत्या. त्यातील एक होत्या संत सोयराबाई. त्यांना नामदेवांनी वाचन, लेखन शिकविले. सोयराबाईंनी गीता वाचायला सुरुवात केली. **'मी चराचरांत भरलेलो आहे,'** असे सोयराबाईंनी गीतेत वाचले. हा भगवंत जर चराचरांत आहे, तर आम्हा स्त्रियांना एवढा त्रास का? हा त्रास भगवंत पाहतोच कसा? वाचनातून आत्मभान जागृत झालेल्या सोयराबाईंनी भेदभाव केल्याबद्दल केवळ प्रश्नच नाही भगवंताला विचारला, तर पुढील अभंगओळींतून त्याची लाज काढली.

**''आमुची केली हीन याती। तुज ना कळे श्रीपती।**
**जन्म गेला उष्टे खाता । लाज न ये तुझ्या चिता।।''**

भारतीय संविधानानेही हाच विचार स्त्री-समतेचा विचार स्वातंत्र्याचा, समानतेचा हक्क दिलेला आहे, जो संतांनी सातशे वर्षांपासून समाजात रुजविण्याचा प्रयत्न केलेला आहे. अंनिसच्या माध्यमातून हाच विचार पुढे नेल्याचा प्रयत्न असा परिषदांतून आपण सर्व कार्यकर्ते करीत आहात, याचे सोन्नर महाराजांनी कौतुक केले, अभिनंदन केले.

समतेचा मंत्र समाजात रुजवणे अत्यंत आवश्यक आहे, असे जेव्हा निश्चित झाले, तेव्हा संत नामदेवांनी पुढाकार घेतला. त्यांनी त्यावेळच्या सर्व संतांना पंढरीत येण्याचा सांगावा दिला,

**या रे या रे लहानथोर, याति भलते नारीनर।**

हाच आजच्या आपल्या संविधानाचा मंत्र आहे. जो सातशे वर्षांपूर्वी संतपरंपरेने दिला आणि रुजविण्याचा प्रयत्न कीर्तन-प्रवचनांतून केला.

नारदीय कीर्तन परंपरेत डाव्या बाजूला पेटीवाला, उजव्या बाजूला तबलेवाला, मध्ये कीर्तनकार एकटाच असतो. तोच बोलत असतो. इतर सर्व फक्त ऐकत असतात. मध्येच कुणी प्रश्न विचारायला बंदी असते.

संत नामदेवांनी ही बंदी उठविली, प्रथा मोडीत काढली. त्यांच्या कीर्तनात, कीर्तनकारांच्या दोन्ही बाजूला दहा ते पंधरा टाळकरी, समोरच पखवाजवाले असतात, सर्वजण गातात, अभंगमधूनच कुणीही टाळकरी म्हणू शकतो. म्हणजे संत नामदेवांनी तेथे **'सकळांस आहे अधिकार'** प्रस्थापित केला. असहिष्णुतेविरोधी हे नामदेवांचे बंड होते, असे सोन्नर महाराजांनी नमूद केले.

भगवद्‌गीतेत भगवान श्रीकृष्णाने कौरवांच्या बाजूने जे लढतात, ते गुरू, आप्त, सगेसोयरे असले तरी त्यांचा संहार कर, मारून टाक, अशी आज्ञा अर्जुनाला दिली आहे. म्हणजे दुष्टपणाला कायमचे संपविण्याची ही भाषा आहे. माणूस म्हणूनसुद्धा जगण्याचा अधिकार त्याला नाही, असा ध्वनी येथे निर्मित होतो; मात्र संत ज्ञानेश्वरांचे स्वत:चे संतपण जागे झाले, ज्यावेळी ते ज्ञानेश्वरीच्या रूपात गीतेचे मराठी भाष्य अनुवादित करीत होते. दुष्टपणा ही प्रवृत्ती आहे, ती नष्ट करणे; मात्र माणूस कुणीही असला, तरी त्याच्यावर प्रेमच केले पाहिजे, प्राणिमात्रांवरही तेवढेच प्रेम असावे -

**'जे खळांचे व्यंकटी सांडो, तया सत्कर्मी रती वाढे'**
**भूता परस्परें जडो, मैत्र जीवांचे ।'**

असे समर्पक उदाहरणही सोन्नर महाराजांनी दिले. शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी जी करूणा जागविली, तोच विचार आपण पुढे नेत आहोत, हाच विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातून दिला, असे ते म्हणाले.

म्हणून संतविचारांचा सतत आदरच करावयास हवा. गाथा, ज्ञानेश्वरी, संत नामदेवांचे अभंग यांचा आपण जेवढा आदर करतो, तेवढाच आदर आपण भारतीय संविधानाचा केला पाहिजे, असे सोन्नर महाराजांनी अगदी तळमळीने नमूद केले.

मात्र या तत्त्वज्ञानाला मुरड घालण्याचे काम काही व्यक्ती त्या काळातही करत होत्या. अगदी अलीकडचे उदाहरणही सोन्नर महाराजांनी

दिले. ते म्हणाले, 'वारकरी संप्रदायात/दिंडीत काही व्यक्ती नंग्या तलवारी घेऊन, विशिष्ट घोषणा देत होत्या. पोलिसांनाही जुमानत नव्हत्या. त्यांच्यावरही दबाव टाकण्याचा प्रयत्न करीत होत्या; परंतु राजाभाऊ चोपदारांनी हा अनिष्ट प्रकार हाणून पाडला; मात्र या धर्मांधांनी पाच ते साडेपाच हजार तरुणांना धर्मांच्या नावाखाली हिंसक बनविले. त्यांची माथी भडकविण्याचा प्रयत्न केला. धर्माच्या नावाने झालेले हे संस्कार लगेच जाणार नाहीत. त्यासाठी संत विचाराचा प्रचार-प्रसार आपणास गावोगावी, खेडोपाडी करावा लागेल, तरंच हे आपणास बदलता येईल.'

मागील काही दिवसांत एका धर्मांध व्यक्तीने कथन केले की, संत तुकाराम, ज्ञानेश्वर यांच्यापेक्षा मनू दोन पावले पुढे होता. तो कोणकोणत्या बाबतीत पुढे होता, याबाबत वारकरी त्या व्यक्तीला विचारणा करीत नाहीत. कुणीही त्याबाबत बोलत नाहीत. वारकरी संप्रदायाच्या आसऱ्याने, धर्माच्या नावाने काही कीर्तनकार होतात, काही साधू होतात. समता, बंधुता, स्वातंत्र्य हा वारकरी संप्रदायाचा विचार बाजूला ठेवून धर्मातील अनिष्ट बाबींचा ते प्रचार, प्रसार करतात. काही दुष्टप्रवृत्तीच्या व्यक्ती मनूला पुढे करून, संतांना डावलण्याचा प्रयत्न करतात. त्याविरोधात तिथल्या तिथे विरोध व्हायला पाहिजे. वारकरी संप्रदायाची ही खरी कसोटी आहे. मला कुणीही त्याबाबत 'ब्र'शब्द काढत नाही. हे बघून, दिल्लीमध्ये जंतर-मंतर कॅमेऱ्यासमोर भारतीय घटना दहन करण्यापर्यंत या विध्वंसक शक्तींची मजल जाते; मात्र तरीही तातडीने त्यावर कडक कारवाई होत नाही.

समाज बिघडवणाऱ्या अशा प्रवृत्तींना सतत विरोध करायला लागेल आणि याचे वैचारिक साधन आहे. संत विचार! संतसाहित्यावर, संतविचारांवर आणि शब्दांवर महाराष्ट्राचा विश्वास आहे. 'इट का जबाब इट' आणि 'गोली का उत्तर गोली से' देण्याची भाषा आपणाला वापरता येणार नाही. त्याला उत्तर म्हणून संतांचे अभंग, संतविचारच जनसामान्यांपर्यंत नेणे इष्ट ठरेल, असे सोन्नर महाराजांचे प्रतिपादन होते.

सोन्नर महाराजांनी लिहिलेल्या **'उजळावया वाटा आलो'** या पुस्तकाचे नुकतेच प्रकाशन झाले. त्याचा संदर्भ देऊन, महाराज म्हणाले की, वारकरी संप्रदायानं समतेचा, स्वातंत्र्याचा, बंधुत्वाचा, स्त्री-सक्षमीकरणाचा, पर्यावरणाचा विचार या पुस्तकात मांडला आहे.

लोक विचारतात, 'तुम्ही हिंदू नाही का?' वारकरी संप्रदाय हा कोणत्याही जातीचा, पंथाचा, धर्माचा नाही, कोणत्याही राजकीय पक्षाचाही नाही. कारण सर्व संत हे विविध जाती - धर्माचे होते, ते सर्व संप्रदायात येत होते. त्यांच्यामुळेच संप्रदाय टिकून राहिला. जसे काही संत जन्माने हिंदू होते, तसे - काही संत जसे - कबीर, मोमीन, लतीफा हे मुस्लिम होते. वारकरी संप्रदायात त्यांचेही विचार सांगितले जातात, गायिले जातात. सर्वांना सोबत घेऊन वारकरी संप्रदाय पुढे पुढे जात राहिला.

**हिंदू नाही, ना मुसलमान**
**ना कुण्या जातीचा।**
**समतेसाठी लढतो मी**
**वारकरी निधड्या छातीचा।**
**शेतकऱ्याचा पुत्र असे मी**
**डावा, उजवा नाही,**
**भाळावरती टिळा लावितो**
**मायमराठी मातीचा।।**

हे त्याचे उत्तर असल्याचे सोन्नर महाराजांनी सांगितले.

सोन्नर महाराजांनी आपल्या विनम्र, लाघवी भाषेत करीत असलेल्या भाषणाचा समारोप, एका अतिशय समर्पक, कार्यकर्त्यांना प्रोत्साहित, प्रेरित करणाऱ्या चिऊताईच्या गोष्टीने केला. एका मोठ्या जंगलाला एका बाजूने आग लागली, तरी त्याची दखल जंगलातील प्राणिमात्रांनी घेतली नाही. ते आपापसांत भांडत राहिले. हल्ले करीत राहिले; मात्र जेव्हा जंगलाची आग अगदी त्यांच्या समीप आली, तेव्हा ती विझवण्यासाठी जो - तो आपापल्या परीने प्रयत्न करू लागला. हत्तीने सोंडेने पाणी वाहणे सुरू केले. वाघाने तोंडात पाणी भरून आणले आणि आगीवर शिंपडू लागला, तेव्हा एक चिमणीही आपल्या चोचीत पाणी घेऊन येत होती आणि आग विझवण्याचा प्रयत्न करीत होती. हत्तीच्या लक्षात ही बाब आली. तेव्हा त्याने हिणवत विचारले की, जंगलाला एवढी मोठी आग लागली आहे, तुझी चोच इवलुशी! तिच्यात कितीक पाणी मावते. जंगलाच्या आगीवर त्याने काय फरक पडणार? तेव्हा चिमणी मोठ्या आत्मविश्वासाने म्हणाली की, 'मला माहीत आहे, माझ्या चोचीतून आणलेल्या इवल्याशा पाण्याने आग विझणार नाही; पण मी प्रयत्न केलाच नाही, असे मला वाटणार नाही आणि जेव्हा-केव्हा या जंगलाला लागलेल्या या आगीचा इतिहास लिहिला जाईल, तेव्हा आग लावणाऱ्यांच्या नव्हे, तर आग विझवणाऱ्यांच्या यादीत माझे नाव असेल.' सोन्नर महाराजांच्या - या विचारसन्मुख आणि कृतिप्रवण करणाऱ्या गोष्टीला उपस्थितांनी उत्स्फूर्तपणे टाळ्यांनी भरभरून दाद दिली. धन्यवाद!

**परिसंवाद संकलन : राजीव देशपांडे, राहुल थोरात**

**(अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र - नोव्हेंबर-डिसेंबर २०१८ वरून साभार...)**

❐

# सरकारचे डोके...

■ **विद्या बाळ**

प्रिय वाचक,

लोकमान्य टिळकांनी ब्रिटिश राज्यकर्त्यांना तो परखड प्रश्न विचारणारा अग्रलेख लिहिला होता - ज्याचं शीर्षक होतं - '**सरकारचं डोकं ठिकाणावर आहे का?**' आज आपला भारत देश स्वतंत्र झाल्याला सत्तर वर्षं पूर्ण होत असतानाही, मनात हाच प्रश्न पुन्हा - पुन्हा खडा पहारा देत माझ्यासमोर उभा राहतो आहे...! आणि या प्रश्नाच्या जोडीनेच, सरकारला डोळे आहेत का, सरकारला कान आहेत का आणि सरकारला मेंदू आणि हृदय तरी आहे का - हेही प्रश्न मला विचारावेसे वाटताहेत....! मला पूर्ण जाणीव आहे की, कुठे लोकमान्य टिळक आणि कुठे मी...! तरीही हे 'आपलं' सरकारच, हे प्रश्न विचारणाऱ्या य:कश्चित मलाही हे प्रश्न विचारल्याबद्दल 'राष्ट्रदोही' ठरवणारच नाही, याची मला अजिबात खात्री नाही आणि  तरीही मी हे प्रश्न विचारणारच आहे.

मला माझ्यासकट सगळ्यांना हाच प्रश्न विचारायचा आहे. आपलं तरी डोकं ठिकाणावर आहे का...! आपण माणसाच्या जन्माला आलो आहोत म्हणून आपण माणूस आहोत. हे निर्विवाद; पण आपण माणसासारखे वागतो आणि जगतो आहोत का...? मानवेतर प्राणी, पक्षी शेकडो वर्षं एकाच प्रकारचं 'परंपरागत' जिणं जगताना दिसतात. त्यांचं सारं जगणं एका जीवशास्त्रीय चक्रानुसार सुरू होतं आणि संपतंही. त्यांच्यापेक्षा तुमच्या-माझ्यासारख्या माणसांचा मेंदू अधिक विकसित अवस्थेत आहे. म्हणून आपण विचार करू शकतो, बोलू शकतो, चर्चा, संवाद करू शकतो. आपण ज्या धर्मात, जातीत, परिसरात जन्मतो. तिथले संस्कार, परंपरा बहुधा आपल्या जन्मापासूच आपल्या जगण्या-वागण्यावर, बोलण्याखाण्यावर एक छत्र धरून, सावली आणि सावटही टाकत असतात; पण मग आपला मेंदू, तो काय करतो? किंवा आपण त्याचं काय करतो? त्याला प्रश्न विचारून काही चालना देतो? इतर प्राणी-पक्षी जशा जीवशास्त्रीय चक्राची 'परंपरा' पाळतात, तसेच आपणही 'परंपरा' पाळत जगत राहतो. आपल्याला कधीच वाटत नाही की, हे असं का? आणि ते तसं का नाही....?

माझा स्वानुभव मुद्दाम सांगते, मीही आयुष्यातला खूप काळ मानवेतर प्राण्यासारखी जगले! कसले प्रश्न नाहीत, कसल्या शंका नाहीत. उलट मध्यमवर्गीय, ब्राह्मणी पारंपरिक रूढी-रिवाज इत्यादी सगळ्यांत मी रमलेलीच होते! आता मात्र माझ्या मनाच्या अबोध पातळीवर तेव्हाही काही तरी घडत असावं, कुणी-कुणी ते जाणलं, जागं करण्याचा प्रयत्न केला, आणि आज मी बऱ्यापैकी जागी आहे, असं मला वाटतं. कारण माझ्या मनात अनेक प्रश्नांचं पीक भरभरून उगवतं आहे.

आजच्या मध्यमवर्गीय आणि माझ्या आर्थिक स्तरापेक्षा वरच्या पातळीवरच्या घराघरांत सत्यनारायण, अन्य पूजा, हे सारं खूपच अधिक थाटाचं, अधिक खर्चाचं, अधिक मॉडर्न स्वरूपात आणि

तरी संस्कृती जपल्याच्या आनंदात साजरं होताना मी बघते. मी मान्य करते की, जुन्या काळात, या साऱ्यामुळे माणसांना विशेषत: मुली, स्त्रिया यांना, हौसमौज करायला, इकडे-तिकडे जायला-यायला अवकाश मिळत होता. ज्याची त्या वातावरणात खूप गरज होती; पण आज या साऱ्याकडे आपण काही नव्या नजरेनं बघणार की नाही? जुन्या काळातली त्या सगळ्याची गरज, त्यातला आनंद मान्य करूनही, आज शिकल्या-सवरलेल्या, नोकरी करणाऱ्या स्त्रिया, त्यातच रमलेल्या बघितल्या की माझ्या मनाला त्रास होतो. मुलींसाठी पहिली शाळा काढताना जोतिबा फुले म्हणाले होते, 'स्त्रियांना माणसासारखं जगता यावं, यासाठी त्यांना शिक्षण मिळण्याची गरज आहे.' आज ज्या कुणी तुमच्या माझ्यासारख्या शिकल्या, मिळवत्या झाल्या, काही प्रमाणात हिंडत्या-फिरत्या झाल्या, त्यांच्यासाठी वाचनाच्या शक्यता खुल्या झाल्या. त्या आपण साऱ्याजणी यातून काही नव्यानं शिकतो आहोत? आपला विकास होतो आहे? म्हणजे पोशाख, वाहन चालवणं, खाणं-पिणं यात आपल्याला मिळालेली 'आधुनिकता' या साऱ्याच्या पल्याड, आतमध्ये विचार करण्याइतपत झिरपते आहे...?

माफ करा, आपणही कावळा-चिमणीसारखाच संसार करत जगतो, असं आपल्याला कधी वाटतं...? केवळ ऐहिक उपभोगाच्या, सोयी-सुविधांचा लाभ घेत जगण्यानं कावळा-चिमणीच्या जगण्यापेक्षा माणूस म्हणून आपण स्वत:च्या आणि समाजाच्या काही बदलाचा, परिवर्तनाचा विचार करतो आहोत....? जगभरात देशांच्या विकासाची संकल्पना आता बदलली आहे. केवळ दरडोई उत्पन्न आणि संपत्ती अधिक असणारा देश 'विकसित' या वर्गात मोडू शकत नाही. त्याच्या बरोबरीने त्या देशातला माणूस अधिक चांगला माणूस म्हणून विकसित होतो आहे की नाही, याची चिकित्सा ही विकासाची गुणवत्ता ठरवते.

अल्वा मिर्दाल आणि व्हायोला क्लेन यांचं विधान मी पुन्हा-पुन्हा देत आले आहे. सर्वसाधारणपणे प्रत्येक देशाच्या लोकसंख्येचा निम्मा हिस्सा स्त्रिया असतात. त्यांना व्यक्तिगत विकासाची संधी नाकारणाऱ्या पुरुषप्रधान व्यवस्थेपासून बाकीच्या घटकांपासून सोडवणं अत्यावश्यक आहे, तरच त्या केवळ आई, बायको, मुलगी यांसारख्या परंपरात भूमिकांपलीकडे एक व्यक्ती म्हणून जगतील, वाढतील. त्यांचा व्यक्तिगत विकास देशाच्या समृद्धीत, विकासात मोठं योगदान करू शकतो, यासाठी त्या दृष्टीनं विचार करणारी जिवंत मनं मात्र हवीत...!

आपण ज्या कुठल्या जाती- धर्मात जन्मलो, त्या जाती धर्मसंस्कृतीचं आपल्या आयुष्यात अनेक कारणांसाठी महत्त्वपूर्ण स्थान आहे, हे मी मनापासून मानते; पण धर्म, जाती, पथांमधली कर्मकांड करत राहणं म्हणजे या साऱ्यांचा सन्मान करणं नाही. म्हणजे नटूनथटून पूजा करायची, नामपठणाचे सप्ताह करायचे आणि पारायणं करायची, एवढाच धर्माचा, संस्कृतीचा अर्थ...? त्या सगळ्याचा आपल्या जगण्यात काही उजेड पडतो आहे का...? जाती-धर्मापलीकडच्या माणसाला माणूस म्हणायला, आपलं मानायला आपण कधी शिकणार...?

मी असं मानते की, आपण स्वत: आपलं कुटुंब, आपला परिवार हा क्रमाक्रमाने आपला जगण्यासंदर्भातला केंद्रबिंदू असतो, ते मी समजू शकते; पण त्या पलीकडे जे काही घडतं, त्याचा विचार आपण नाही तर कुणी करायचा? अगदी साधी काही उदाहरणं – शाळेत मुलांची ने-आण करणाऱ्या रिक्षा, बसेस त्यातली मुलांची संख्या, त्यांची सुरक्षितता. भले कदाचित आपल्या मुला-नातवंडांच्या पलीकडचा हा विषय असेल, तरीही त्याबाबत आपण गंभीरपणे बोलतो? मुलींच्या/स्त्रियांच्या असुरक्षिततेचा विषय निघाला की, टीकाकारांचा रोख, मुलींचे कपडे, त्यांची हिंडण्या-फिरण्याची वेळ यावर राहतो. कधी तरी येतं मनात - आता आम्हाला सांगणं थांबवा आणि त्या पुरुषांची वृत्ती आणि नजरा यांना वळण लावण्याबद्दल बोला आणि करा...! गुरुमितसिंग रामरहीम हे ताजं प्रकरण किंवा आसारामबापूंचं त्या आधीपासून भिजत पडलेलं प्रकरण...! आजही त्या सच्चा सौदा डेऱ्यातल्या लोकांना वाटतंय की, 'पिताजी' चमत्कार करून कारावासातून सुटून येणार. हे सारे विचार न करता, आपल्या जगण्याचा भार डेऱ्यावर टाकून निवांत राहणारे भक्त...!

आजही गणपती दूध प्यायला, देवी रडायला लागली, तापमान वाढलं, अंगाची काहिली व्हायला लागली म्हणून देवाच्या मूर्तीला चंदनाचा लेप लावला - यांसारख्या बातम्या येतात. एकविसाव्या शतकात, विज्ञानयुगात आणि घटनेत वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या अंगीकाराचा स्पष्ट उल्लेख असताना, आपण हा प्रश्न स्वत:ला विचारायला हवा. या बातम्यांना आपण कसा प्रतिसाद दिला? 'असेल हं तसं काही तरी' असं म्हटलं की, हे सारं 'तर्कदुष्ट' आणि अवैज्ञानिकच आहे, असं ठामपणे, जाहीरपणे म्हटलं?' त्यावर विश्वास ठेवणाऱ्यांशी संवाद करायचा प्रयत्न केला?

स्वत:ला हलवून जागं करत परखडपणे विचारलं पाहिजे की, आपण परंपरागत प्रथांची तपासणी न करता त्यांचं पालन करतो म्हणजे आपण त्या 'अंधभक्तांच्याच' पंक्तीत वावरतो आहोत का? तसं जर असेल तर मग आपल्याला लाभलेल्या माणसाच्या जन्माची गुणवत्ता काय? तुमच्या-माझ्यासारख्या किंवा उच्च मध्यमवर्गीयांच्या जगण्यात जर फक्त परंपरापालन आणि मौजमजाच असेल, तर ते समर्थनीय किंवा शोभादायक आहे...?

मग माझं माणूसपण जपण्यासाठीचं, माझ्या स्वत:शी आणि अवतीभवतीच्यांसाठी माझी जबाबदारी काय? माझं उत्तरदायित्व काय? यासाठीच अवतीभवती घडणाऱ्या घटना डोळसपणे बघत, त्यांच्यावर बोट ठेवत असताना, आपण स्वत:वर वेगवेगळ्या प्रसंगात तसेच तर वागत नाहीना, याचा विचार व्हायला हवा. मौजमजेच्या गेट-टुगेदर्सच्या पलीकडे महिन्याभरातून एकदा तरी यावर चर्चा घडवून आणायलाच हवी.

आपण तसं काही करणार नसू तर आपल्याला जे-जे 'दिसतं' त्याकडे विचारपूर्वक 'बघायला' आपण कधी शिकणार? कुणी एक खोलेबाई आणि कोणी एक निर्मला यादव बाई यांचा सोवळ्यातला स्वयंपाक, स्वयंपाक करणारी सुवासिनी आणि ज्यांच्याकडे श्राद्धाचा किंवा गौरीचा स्वयंपाक करायचा त्या दोघी अविवाहित खोले बहिणी - या सगळ्यावर शेरेमारी करून आपण सोडून देणार? हे मान्यच की कोणत्याही धर्माच्या व्यक्तीला धार्मिक उपासना, कर्मकांडं करण्याचं स्वातंत्र्य घटनेनच दिलं आहे. मात्र, त्याच घटनेने जातीनिर्मूलन आणि विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनाबाबत काही जबाबदारी आपल्यावर सोपवलेली आहे. स्त्री-पुरुषसमतेसारखं महत्त्वाचं मूल्य याच घटनेनं आपल्याला सांगितलं आहे. या सगळ्याचा तोल सांभाळण्यासाठी आपण काय-काय करू शकतो? एक तर श्राद्ध आणि गौरीपूजन करण्यामागचा हेतू/परंपरा तपासून घ्यायला हवी. स्त्रियांमध्ये विधवा, अविवाहित, सुवासिनी, निपुत्रिक, पुत्रवती यांसारखे भेदाभेद का आहेत, ते योग्य आहेत का? स्त्रीच्या आयुष्यात पती असणं - नसणं हा तिच्या प्रतिष्ठेचा निकष कसा काय असू शकतो? मग पूजा सांगणाऱ्या पुरुषालाही हे निकष लावायचे का? यासारखे अनेक प्रश्न आपल्याला पडायला हवेत. त्याची चर्चा करून मगच काय करायचं, काय करायचं नाही, हे ठरवता येईल. उदाहरणार्थ, कोणत्याही स्त्रीला हवी ती पूजा करण्याचं स्वातंत्र्य हवं आणि कोणत्याही स्त्रीला जातीधर्माच्या आधारानं स्वयंपाकासारखी कामं करण्याचं स्वातंत्र्य हवं. पारंपरिक कर्मकांडात होणाऱ्या या बदलांमुळे स्त्रीवरचे काही अन्याय / बंधनं दूर झाली आणि स्त्री-पुरुष समतेचा विचारही एक पाऊल पुढे सरकला तर यामुळे संस्कृतीला, कर्मकांडाला बट्टा लागला की, त्याची गुणवत्ता वाढली? (इथे कर्मकांडातल्या प्रथेला विज्ञानाचे निकष लावलेले नाहीतच!) ज्या व्यक्तीने विचारपूर्वक प्रश्न विचारत एखादी गोष्ट केली किंवा केली नाही तर ती आपल्या माणूसपणाला आणि माणुसकीला जागली, असं आपण नक्कीच म्हणू शकतो.

सुरुवातीला विचारलेला प्रश्न - सरकारचं डोकं ठिकाणावर आहे का, हा मला अधिकच अस्वस्थ करतो - जेव्हा प्रधानसेवक नरेंद्र मोदींचा वाढदिवस अतिशय धुमधडाक्यात साजरा करत, नर्मदा सरोवर धरणाचा लोकार्पण सोहळा पार पडतो! रोम जळताना फिडला वाजवणाऱ्या नीरोचीच ही प्रतिकृती...! सर्वोच्च न्यायालयाच्या 'आधी पुनर्वसन, मग धरणं' या आदेशाला पार धुडकावून लावलं या प्रधानसेवकाने. मेधा पाटकरांचं नाव न घेता, त्यांनाही हाणून घेतलं! मेधा पाटकरांनी अद्यापही पुनर्वसन न झालेल्या लाखो विस्थापितांचं वास्तव आकडेवारीसह सादर करत उपास केला, नर्मदेच्या पाण्यात उभं राहून जलसत्याग्रह केला. त्या आणि त्यांचे सहकारी - साऱ्यांच्या शरीराची हालत सडण्याच्या टप्प्यावर पोहोचली. नर्मदेचं पाणी वाढत गेलं... तरी महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरातचे मुख्यमंत्री या आंदोलकांना भेटायला फिरकलेही नाहीत...! 'एन.डी.टी.व्ही. इंडिया'सारख्या एक-दोन माध्यमांचे अपवाद वगळता - ना कुणी या अहिंसक, सनदशीर पद्धतीने, तळागाळातल्या लाखो विस्थापितांसाठी माध्यमात जागा दिली! वेळ आणि जागा राखीव आणि सार्वत्रिक होती केवळ 'नमो नम:' साठी...!

You get the govt. you deserve किंवा जशी प्रजा तसंच सरकार, याचं हे प्रत्यंतर आहे. नर्मदा आंदोलनासारखे अनेक ज्वलंत प्रश्न असेच दुर्लक्षून विझवण्याचा प्रयत्न केला जातो आहे. त्यांच्याकडे आपलंही लक्ष जात नसेल तर आपलंही डोकं खांद्यावर असलं तरी 'ठिकाणावर' आहे का, हा प्रश्न उभा राहतोच...!

दिवाळीच्या निमित्ताने आपल्या घरात, आपल्या घराबाहेर दिव्यांचा झगमगाट असेल. मला काळजी आहे ती, आपल्या सगळ्यांच्या मनाच्या आतला दिवा कधी लागणार, कसा तेवता राहणार याची...! त्यासाठी शुभेच्छा...!

**विद्या बाळ, १९ सप्टेंबर २०१७**

**(मिळून साऱ्याजणी ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१७(जोड अंक) वरून साभार...)**

❐

मासूम संस्थेचे क्षणचित्र



# सन्मानाने जगण्याचा हक्क प्रस्थापित करतांना.....

■ मनिषा गुप्ते

तीस वर्षांपूर्वी खेड्यात राहून आरोग्य शिक्षणाचं काम करताना लक्षात आलं होतं की भरमसाठ चक्रीव्याजावर घेतली जाणारी अनेक कर्जे वैद्यकीय कारणांसाठी होती. बिकटसमयी तारांबळ उडाल्यावर, गावातील प्राथमिक केंद्र निष्क्रीय असल्याकारणाने भाड्याची जीप करून रुग्णाला दूरवर उपचारासाठी घेऊन जावं लागायचं. कर्जाचे दुष्टचक्र वंचित घटकातील स्त्रियांच्या नेतृत्वाने मोडण्यासाठी १९९० साली ''स्त्रीधन विकास प्रकल्प'' सुरु केला. सधन लोकांनी व पुरुषांनी यामध्ये दखल देऊ नये म्हणून अगदी सुरूवातीला केवळ पाचशे रुपये कर्ज मर्यादा ठेवण्यात आली. पहिली तीन ते चार वर्षे स्त्रियांचं नेतृत्व निर्माण करण्यासाठीची होती.

पहिल्यांदा शंभरच्या पाच नोटा हातात आल्या की स्त्रिया त्या कुरवाळून पहायच्या, कारण शंभरची नोट कधी बाईच्या हातात आलीच नव्हती. एकदा, किराण्याचे चारशे रुपये देण्यासाठी मी माळशिरस गावातल्या दुकानात उभी होते. एका बाईने मला विचारलं, ''खरे आहेत का हे पैसे? शंभरच्या नोटेत पैसे ठेवतेस, मग खर्च काय करतेस?''. गावातल्या बाईकडचे पैसे चिल्लरस्वरुपात गाडग्या-मडक्यात असायचे पण मोठी नोट बघणे दुर्मिळचं. अशा प्रकारचं प्रचंड दारिद्र्य तिथे आम्ही पाहिलं होत. दोन भावंडांमध्ये एकच गणवेश असल्यामुळे दिवसाआड शाळेत जाणारी मुलं होती. एवढ्या गरीबीत असतांना पाचशे रुपये बाईच्या हातात शाश्वत पद्धतीने येणं खूपचं महत्वाचं होतं. आज स्त्रीधन प्रकल्प पाच ते सहा हजार महिलांपर्यंत पोहोचला आहे. मात्र कर्जाची मर्यादा पाच हजार रुपयांपेक्षा जास्त वाढवण्याअगोदर महिलांना सामाजिक जाणीव, आरोग्याचा हक्क व कायद्याचं ज्ञान घेणं, व त्यासाठीची सहा शिबिरं करावी लागतात. आज बायका केवळ सक्षम होऊन पंधरा-वीस हजार रुपये घरी घेऊन जात नाहीत, तर दीडशे-दोनशे महिला ग्रामसभेत जाऊन आपले प्रश्न मांडत आहेत. काही गावात तर पुरुष कमी आणि बायका जास्त असं चित्र ग्रामसभेत दिसतं. एवढं बळ आर्थिक हक्क प्रकल्पाने निर्माण केलं.

मासूमच्या प्रत्येक प्रकल्पामध्ये सबलीकरण हे मुख्य सूत्र असते. अनेकवेळा नवऱ्याला पाहिजे असलेल कर्ज बाईने ''मला नको'' म्हणून नाकारलं आहे. मुख्यत्वे गरीबांसाठी प्रकल्प असल्याकारणाने कर्जाच्या परतफेडीसाठी कोणत्याही शासकीय यंत्रणा, पोलीस, श्रीमंत व्यक्ती किंवा गावात वर्चस्व गाजवणाऱ्या गटाचा सहभाग घ्यायचा नाही हे आधीच ठरले होते. कर्जाची परतफेड करण्याची कुवत बाईमध्ये असूनसुद्धा बाई ते करत नसेल तर त्याबद्दल गटात चर्चा होते. तिला दोन-तीन वेळा प्रेमाने सांगून मग ''या दिवशी तुझा गट तुझ्या दारात येऊन बसणार आहे'' असे सांगितले जाते. गट बसला तरी महिला फक्त स्त्रीवादी गाणी म्हणतात, तिच्याच घरातील पाणी पितात. तिची मुले पण गटात बाहेर बसून सर्वांबरोबर गाणी म्हणतात. 'स्त्रीधन' मधून घेतलेले अतिशय कमी व्याजाचं कर्ज फेडण्यासाठी बाई इतर व्यक्तींकडून मोठ्या व्याजावर पैसे तर घेत नाही ना, याची दक्षता घेतली जाते.

ज्यावेळी स्त्रीधन प्रकल्पाची उलाढाल एक कोटीच्या वर झाली त्यावेळी इन्सुरन्स कंपन्या, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पतपेढ्या ''आम्ही आता पैसे देतो'' म्हणत आल्या. शाम्पू, साड्या विकणारे सुद्धा आले. ज्यावेळी बायका गरिबीत कर्जासाठी धडपडत असतात त्यावेळी

कोणी येत नाही, मात्र ज्याला दोन वेळच्या अन्नाची चणचण नसते त्याला गाडीसाठी, घरासाठी कर्ज मिळू शकतं, श्रीमंत भांडवलदाराला सवलतीत जमीन, पाणी, वीज मिळते. गरीब सहसा कर्ज बुडवत नसल्याकारणाने आपण इकडे पैसे गुंतवून भरघोस व्याज कमवू शकतो हे आंतरराष्ट्रीय पतपेढ्यांच्यासुद्धा आता लक्षात आलं आहे. इन्सुरन्स कंपन्यांनी ''तुमच्या गटातील बायकांचा इन्सुरन्स काढा'' असे सुचवल्यावर कार्यकर्त्यींनी विचारले, ''बायकोला मारून टाकणाऱ्या नवऱ्याला इन्सुरन्सचे पैसे बक्षिस म्हणून देणार का? तिला स्वत:ला त्याचा काय फायदा होणार आहे?''

स्वत:च्या शरीरावरील असलेलं समाजाचं, शासनाचं, धर्माचं, संस्कृतीचं, पितृसत्तेचं, वर्णव्यवस्थेचं व भांडवलशाहीचं नियंत्रण ओळखून, ''माझ्या शरीरावरती माझा हक्क आहे'' अशी मांडणी स्त्रीवादी चळवळींमध्ये झाली. मासूमच्या अंतर्गत स्त्रियांना आपल्या शरीराच्याबद्दल संकोच वाटू नये आणि शरीराची ओळख व्हावी म्हणुन १९९४ साली 'सदाफुली' प्रकल्प सुरू केला. बाईने स्पेक्युलम, आरसा आणि टॉर्च घेऊन स्वत:चा योनीमार्ग, गर्भाशयाचं मुख बघायला शिकणं, मासिकपाळी व अंगावरून लाल-पांढरं पाणी जाण्याबद्दल समजून घेणं, छातीची नियमित तपासणी करणं व केव्हा औषधोपचार करणं आवश्यक असतं या विषयांचे दीड वर्षीचे प्रशिक्षण स्त्रीवादी दृष्टिकोनातून गावातल्या स्त्रियांना देण्यात आलं. यामागचा उद्देश सरकारने केलेल्या कामाशी स्पर्धा किंवा पुनरावृत्ती करणं हा नसून, योग्यवेळी तपासणी झाली तर भविष्यात दुर्धर आजार किंवा कॅन्सर होऊ नये, कोणतीही स्त्री मरु नये हा होता. प्राथमिक उपचार (एलोपॅथिक आणि स्थानिक वनौषधींपासूनचे) गावपातळीवर केले जातात. मासूमच्या आरोग्यप्रकल्पामधून स्त्रियांना खाजगी दवाखान्यांमध्ये पाठवले जात नसून हक्काधारी दृष्टिकोनातून सरकारी रुग्णालयात पाठवलं जातं ही जमेची बाब आहे.

आरोग्यकार्यकर्त्यींशी जर आपण संवाद साधला, त्यांच्या अडचणी समजून घेतल्या व वेळप्रसंगी त्यांच्याबरोबर उभे राहिलो तर त्यांची कामं करण्याची उमेद, ऊर्जासुद्धा वाढते. मासूमतर्फे गर्भाशयाच्यामुखाच्या कॅन्सरची तपासणी करायला सरकारी 'आशां'ना आणि नर्सेसना शिकवलं गेल्यानंतर अजूनही प्रश्न विचारायला त्यांचे सकारात्मक फोन येत असतात. अर्थातच, लोकांची देखरेख असेल तर सरकारी आरोग्य सेवा अधिक सक्षम होतात, म्हणूनच मासूमतर्फे गावपातळीवरती ''जागृत समिती'' निर्माण झालेल्या आहेत, शेकडोंच्या पटीत, लोकांच्या जनसुनवाया घडवून आणल्या गेल्या, व राष्ट्रीय मानव अधिकार आयोगापुढे 'जन स्वास्थ अभियाना'मार्फत प्रश्न मांडण्यात आले. भारतामध्ये आरोग्याचा मूलभूत हक्क असावा यासाठीही मासूम कार्यरत आहे.

१९७० च्या दशकामध्ये भारतामधील स्त्रीवादी चळवळीत स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांचे प्रश्न देशभर हाती घेतले गेले त्या सर्व घडामोडीमध्ये सहभागी असल्यामुळे या विषयांवर मासूमने काम सुरू करणं स्वाभाविक होतं. बाईला असमान ठेवणाऱ्या पितृसत्ता, जातीव्यवस्था व वर्गव्यवस्था यांना एकत्रितरित्या भिडावं लागतं हेही स्पष्ट होतं. स्त्रीवादी दृष्टीकोनातून हिंसाचार ''सत्ता आणि नियंत्रण'' या चौकटीतून पाहिला जातो. दारुडा नवरा आपल्यापेक्षा उच्च असलेल्या पदाधिकाऱ्याला किंवा सरपंचाला मारत सुटत नाही. तो घरी येऊन नशेमध्येसुद्धा आपल्या बायकोलाच मारतो. ऐशी ते नव्वद टक्के बलात्कार, खून आणि मारहाण ही स्त्रीच्या नातलगांकडून किंवा ओळखीच्या लोकांकडून होत असतात. हिंसा सासरी व माहेरीसुद्धा होते. शिवाय, माहेरी तिला संपत्तीत वाटा न मिळणे हा तिच्यावरती झालेला सर्वींत मोठा आर्थिक व भावनिक हिंसाचार. तिचं स्वत:चं काहीच नसल्याकारणानं तिला सासरी बिकट परिस्थितीमध्ये ही राहावं लागतं.

समुपदेशन, पोलिसांची किंवा कायद्याची मदत घेणं महत्त्वाचं असतंच पण खरा बदल जमिनीवर होणं आवश्यक असल्यामुळे गावा-गावामध्ये 'आधार गट' निर्माण करणे खूप महत्त्वाचं ठरलं. मारहाण होताच संवेदनशील मंडळींनी हस्तक्षेप केला, तिला व तिच्या मुलांना रात्रीचा आसरा दिला, आणि तिला न्याय मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले तर हिंसाचार करणारा दोनदा विचार करतो.

एका स्त्रीबरोबर काम करत असताना दुसऱ्या स्त्रीवर, पुरूषावर किंवा एखाद्या वंचित समुहावर अन्याय होऊ नये याची आपल्याला जाणीव असावी लागते. एखाद्याबद्दल कितीही राग आला तरीही वॉरंटशिवाय पोलिसांना कुणालाही घरामध्ये घुसू देणं, ''एक रात्र बेदम मारून आणा'' असं पोलिसांना सांगणं, तोंडाला काळं फासणं, धिंड काढणं, उठाबशा काढायला लावणं, अशाप्रकारचा अपमान कोणत्याही व्यक्तीच्याबाबतीत करता कामा नये, तसेच कोणाच्याही मानवी हक्कांना धक्का लागू देता कामा नये हे गावातील आधारगटांना मनोमन पटलेले आहे. सर्व वंचित घटकांचं हित आणि मानवअधिकार केंद्रस्थानी ठेवलं तरंच खऱ्या अर्थाने आपण हिंसाचाराच्या विरोधात काम करू शकतो याचे भान असल्यामुळे मासूमचे कार्यकर्ते इतर स्त्रीसंघटनाच्या धरणे-मोर्च्यांना व बैठकांना येतात. आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांना प्रोत्साहन देतात. पुण्यामध्ये दरवर्षी ''गे प्राईड परेड'' होते तिला येतात. 'चांगली' आणि 'वाईट' असे पितृसत्तेने स्त्रियांचे केलेले विभाजन झुगारून आज स्थानिक कार्यकर्ते सर्वांचा हिंसाचार, भय व भेदभावमुक्त आयुष्य जगण्याचा अधिकार बळकट करत आहेत.

❐

# नात्यातील सुरेल संवादासाठी जोडीदाराची विवेकी निवड

■ **आरती महेंद्र नाईक**
राज्य कार्यवाह जोडीदाराची विवेकीनिवडमहा अनिस

लग्न हा प्रत्येकाच्या आयुष्यातला महत्त्वाचा भाग बनला आहे आणि जिकीरीचा पण. कदाचित म्हणूनच जोडीदार शोधण्याच्या प्रक्रियेला वरशोध किंवा वधूशोध न म्हणता वर वधू संशोधन म्हणतात. प्रचलित प्रवाहात हा प्रवास सुखाचा कमी आणि ताणाचा जास्त असतो आणि त्यातून योग्यच जोडीदार निवडला जाईलच याचाही खात्री कमी. त्यातही हल्ली तरुण तरुणी कोणत्या तरी सामाजिक संघटनेशी जर जोडलेले असतील तर आंतरजातीय आंतरधर्मीय विवाह पुरोगामी विचारांचा साथी रजिस्टर्ड विवाह असाही विचार केलेला असतो. थोडा वेगळा विचार मांडू पाहण्याचा मुलामुलीनी पत्रिका न पाहता विवाह करायचा म्हटला तरी त्यांना संशोधनात अडचणी येतात. स्वत:च्या विचारांचा जोडीदार मिळवणे फार काही सोपे नाही. असे एक निरीक्षण आणि स्वत:चा अनुभवही होता. याचवेळी एक असही चित्र पहायला मिळत होत की पुरोगामी असल्याने विवाह परिवर्तनवादी करूनही सहजीवन मात्र स्त्री पुरुष विषमतावादी दिसतं. सहजीवनातील समानतेचा विचार केलेला असतोच असं नाही हे दिसते.

२०१५ च्या शनिशिंगणापूरच्या आंदोलनानंतर परतत असताना प्रवासात मुंबईचा कार्यकर्ता सचिन थिटे आणि नवी मुंबईचा कार्यकर्ता तुषार शिंदे आणि वंदना शिंदे माई यांच्याशी याबाबत चर्चा सुरु असताना सोशलमिडीयाचा वापर करत विवाह इच्छुक तरुण तरुणींसाठी एक गृप सुरू करावा असं ठरलं. त्याप्रमाणे 'जोडीदाराची विवेकी निवड' या समितीच्या उपक्रमावर आधारित याच नावाने गृप सुरू करण्यात आला. जसे जसे संपर्क होत गेले तसे एकेकाला ॲड करण्यात आले. गृपचे स्वरूप 'वधूवर सूचक मंडळा'प्रमाणे राहणार नाही याची सुरूवातीपासूनच काळजी घेण्यात आली. म्हणजे समविचारी जोडीदार गृपवर मिळाला नाही तरी सहजीवनाविषयीच्या संकल्पना जोडीदाराविषयीच्या संकल्पना स्पष्ट होत जातील हे पाहणे महत्त्वाचे होते.

गृपवर रोज एक प्रश्न दिला जातो. त्याचे उत्तर प्रत्येकाने देणे अपेक्षित असते. उत्तर प्रामाणिकच हवे. कारण उत्तरातून स्वत:ला स्वत:च्या मताला प्रेझेंट करायच असतं. कुणी कुणाची मते खोडायची नसतात. चर्चा मात्र होते. खूप मतमतांतरे होतात पण विरोधी भुमिकेतून वाद नाही होत. त्यामुळे इतरांची मते त्यांना कळतात व त्यांची मते इतरांना कळतात. त्यातून कोणी आपल्या विचारांचे आहे तसेच कोणकोणत्या मुद्द्यांवर एकमत आहे याचाही विचार करता येतो. या चर्चेचा महत्त्वाचा फायदा जाणवला तो म्हणजे मतांमध्ये होणारे बदल, इतरांची मते चर्चा वाचून स्वत:ची मते तपासता येतात. 'जातीतलाच हवा' म्हणणारे नंतर 'आंतरजातीय चालेल' असे ठामपणे म्हणू लागले. तीच गोष्ट मंगळसुत्राबाबत सांगता येईल. 'मला मंगळसूत्र घालायला आवडेल' म्हणणारे 'मंगळसूत्र का घालायचे?' या प्रश्नापर्यंत आले. यात कुठेही विचार योग्य हे अयोग्य असे सांगितले जात नाही. होणारे बदल चर्चेतून होत असतात.

हे एक ऑनलाईन प्रशिक्षण आहे. यामध्ये सहजीवनाचा जरी विचार होत असला तरी ते सर्व मुद्दे जगण्याच्या धारणेशी निगडीत आहेत. म्हणजेच ही चांगली व्यक्ती घडण्याची प्रक्रिया आहे. स्वत:च्या मतांविषयी विश्वास आणि ती मांडण्याविषयी आत्मविश्वास

वाढल्याच जाणवत. १४ फेब्रुवारी २०१६ व्हॅलेंटाईन डे ला पनवेलला पहिली कार्यशाळा घेण्यात आली. त्यानंतर संवाद शाळांचा सिलसिला सुरूच राहिला. महाराष्ट्रातील जिल्ह्यातून ५० संवादशाळा तरुण व पालकांच्या जोडीने सुरू झाल्या. गृपपासून कार्यशाळेपर्यंत झालेल्या प्रवासात एक गोष्ट जाणवली ती मांडावीशी वाटते. सुरूवातीस गृपवर मुलांची संख्या जास्त आणि मुलींची कमी होती. त्यामुळे मुलांना निवडीला वाव नाही असं वाटत होतं. पण चर्चेची खोली वाढत गेली आणि हे प्रमाण उलटे झाले. कार्यशाळेला सुद्धा ७५ टक्के मुली होत्या तर २५टक्के मुले होती. बाहेर पडलेल्या किंवा ॲक्टीव्ह नसणाऱ्या मुलांना कारण विचारलं तेव्हा मुलांनी सांगीतलं की, "मुली स्पष्ट व ठाम मताच्या आहेत. त्यामुळे उत्तरे द्यायला ऑकवर्ड वाटतं"मुलींच्या स्पष्ट विचारांचे कौतुक आहेच पण मुलांचा हा न्युनगंड आणि प्रश्नांना पाठ दाखवण्याची वृत्ती धक्कादायक वाटली.

चळवळीचे अंतिम उद्दीष्ट हे विवेकी समाज निर्मितीचे आहे. विवेकी विचारांची खरी कसोटी ही विवाहासारख्या निर्णयांमध्ये लागते. सहजीवनाबाबतच्या विचारांचा पाया जर भक्कम झाला तर नक्कीच येणारा समाज अधिक विवेवी असेल. डॉक्टर दाभोलकर नेहमी म्हणायचे की, "आचार, विचार आणि उच्चार यांमध्ये एकवाक्यता हवी" ही एकवाक्यता आणण्यासाठी विचारांच ठामपणा, स्वत:च्या विचारांवर पूर्ण विश्वास आणि आदर तसेच इतरांच्या मतांचा आदर ठेवून स्वत:च्या विचारांवर पूर्ण विश्वास आणि आदर तसेच इतरांच्या मतांचा आदर ठेवून स्वत:चे निर्णय घेण्याची बंडखोरी आवश्यक वाटते. या समजातून ही प्रक्रिया घडते असं जाणवत आहे.

यावर्षी १२ जानेवारी राष्ट्रीय युवा दिन ते १४ फेब्रुवारी जागतिक प्रेम दिन या दिवसाचं औचित्य साधन ३४ दिवसाचं अभियान राबवीत आम्ही २५ जिल्ह्यातील ५००० तरुणांपर्यंत पोचलो आणि त्यांच्या कडून स्वेच्छेने जोडीदाराच्या विवेकी निवडीचा संकल्प करण्याविषयी मांडणी केली. यात हुंडा न घेता साध्या पद्धतीने लग्न व्यसन, कुंडली, यांना ठाम नकार पालकांशी संवाद प्रेम आणि आकर्षण यातील फरक समजून घेत आंतरजातीय आंतरधर्मीय विवाहाची शक्यता अजामावत असताना जात आणि धर्म विरहीत माणसाने निवड करावी हा विचार पटतोय का या आधारावर संकल्प देण्यात आले. यातही आमची निरीक्षणे सांगतात कि मुलां पेक्षा मुली, व्यसन, लग्नापूर्वी वैद्यकीय तपासणी आणि हुंड्या बाबत जास्त गंभीरपणे विचार करतात तर समतेच्या आधारे सहजीवन पत्रिकेला विरोध आणि जात धर्म विरहीत लग्न याबाबतीत मुले जास्त चांगला प्रतिसाद देत आहेत. दुसऱ्या बाजूला पालकांशी सुसंवाद मुले आणि मुली यांना अत्यावश्यक वाटतो आणि तो संवाद लग्नाचा विचार करण्यापूर्वी पासून सुरू व्हावा हि इच्छा तरुण व्यक्त करताना दिसतात. तरुणाई मग ती ग्रामीण असो कि शहरी लग्नबाबत फारशी गंभीर नाही अस जरी म्हटल जात असले तरी संवादाचे पूल सगळ्यांना हवे वाटतात जे सद्य स्थितीत नाहीत. पालकांचा प्रेमाला होणारा टोकाचा विरोध त्यातून खोट्या प्रतिष्ठे साठी स्वताच्या मुलांची त्यांच्या जोडीदारासह होणाऱ्या हिंसा आम्हाला आणी ज्या समाजाचा भाग आहोत त्याची अप्रतिष्ठा आणणाऱ्या आहेत असे वाटत. पालकांनी आपल्या मुलांना योग्य निर्णय घेण्यास सक्षम बनवावं आणि त्यांच्या निवडीच्या प्रक्रियेत सहभागी व्हाव हेच विवेकी पालकत्व नाही का, जोडीदाराची विवेकी निवड या उपक्रमाच्या निमित्ताने तरुणाईशी होणारा संवाद फार आशावादी चित्र उभे करणारा आहे. संवादाची माध्यमे नाहीत हाच काय तो अडसर आहे. या उपक्रमातून महा. अनिस विवेकी मूल्य परिवर्तनाचा कृतीशील संवाद करू इच्छित आहे आणि कुटुंब संस्थेतील अपरिहार्य लग्न व्यवस्थेमध्ये सुरक्षितता व सन्मानासह समतेवर आधारित सहजीवनाची संकल्पना रुजवू पाहत आहे. नात्यातील सुरेल संवाद हाच पाया असेल आणि यातून हि विवेकाचा आवाज बुलंद होईल हा आशावाद असेल.

❐

## गांधीजींचे विचार

- तुम्ही मला कैद करू शकता, माझा छळ करू शकता, माझे शरीर नष्ट करू शकता. पण माझ्या मनाला कैद करू शकणार नाहीत.
- 'डोळ्याच्या बदल्यात डोळा' या तत्त्वज्ञानाने जग तेवढे आंधळे होईल.

# अन्नपूर्णा परिवार वार्तापत्र

■ **अंजली पाटील**

डिसेंबर २०१८ ते फेब्रुवारी २०१९ ह्या ३ महिन्याचा आढावा घेत असताना खुप गोष्टी तुम्हां समोर मांडावयाच्या आहेत.

६ डिसेंबर १८ ला आपल्या विश्वस्त मंडळाची तिमाही मीटिंग झाली. सर्व विश्वस्त, आर्थिक सल्लागार उपस्थित होते. त्यात काही महत्त्वाच्या गोष्टीवर निर्णय घेतले गेले.

सभासदांना प्रोसेसिंग फी कमी भरावी लागणे, आरोग्य तपासणी विना शुल्क करायची सुविधा, अशा काही गोष्टी वर चर्चा होऊन निर्णय घेतले गेले.

१६ डिसेंबर २०१८ रोजी आपल्या अन्नपूर्णाच्या चांगल्या कामकाजाचा महाराष्ट्र राज्य सहकार डिपार्टमेंट कडून पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. २५०००रु. चा चेक, गौरव चिन्ह, अन्नपूर्णातर्फे उज्वला ताई आणि सुजाता ताई व सभासद प्रतिनिधी ह्यांनी स्वीकारले.

२५ जानेवारी २०१९ ला आपल्या परिवाराची वार्षिक सर्वसाधारण सभा पुण्यात पंडित फार्म इथे झाली. ६००० महिला सभासद उपस्थित होत्या.

ह्या सभेला प्रमुख पाहुण्या मासुम संस्थेच्या प्रमुख विश्वस्त मनीष ताई गुप्ते, IOB चे AGM थॉमस मिरीण्डा, SIDBI च्या चांद कुरील, कॉ. आनंद मेणसे उपस्थित होते.

अन्नपूर्णा च्या प्रमुख विश्वस्त मेधा ताई यांनी मागील आर्थिक वर्षा चा आढावा व पुढील वर्षीच्या योजना यावर भाषण केले. अन्नपूर्णा सभासदांकडून १२% डिव्हिडेंट वर मंजुरी घेतली. प्रोसेसिंग फी कमी करणे, व्याज दर अर्धा टक्का वाढवणे, RD, FD चा व्याज वाढवणे असे निर्णय सभासदांच्या संमतीने घेतले.

आजारपणाच्या विम्यासाठी ज्यांनी सलग ५ वेळा व त्या पेक्षा जास्त वेळा अन्नपूर्णातुन कर्ज घेतले त्यांना मोफत आरोग्य तपासणी ह्या योजनेची माहिती दिली.

मनीषा गुप्ते यांनी आपली राज्य घटना, संविधान वाचवणे आज का आवश्यक आहे हे अतिशय सोप्या भाषेत समजतील अशी दररोजच्या आयुष्यातील उदाहरणे घेऊन सांगितले. त्या म्हणाल्या, भारत हा कष्टकऱ्यांच्या घामातून तयार झालेला त्यांचा देश आहे. त्यांचे रक्त सांडता कामा नये. सर्व धर्मीय लोक इथे एकत्र नांदतात. त्यांचे अन्न पेहराव वेगळा असला तरी त्यांच्यात दुही नाही. पण आजचे सरकार राज्य घटनेची पायमल्ली करत आहे. ज्या राज्यघटनेने बोलण्याचे, लिहिण्याचे हक्क दिले, मी काय खावे, पेहराव काय करावा हे हक्क दिले, त्यावर आज सरकार गदा आणत आहे. स्त्रीयांना परत मनुस्मृती तील गुलाम बनवू पहात आहे. जाती धर्मावर आधारित समाज निर्माण करू पहात आहे. त्यावर समाजमन कलुषित करून, व्यक्ती मध्ये दरी निर्माण करून वाद, आणि दंगली निर्माण करत आहे.

खरे तर हे करण्यापेक्षा चांगले आरोग्य, चांगले स्वस्त शिक्षण ह्यावर लक्ष दिले पाहिजे. शिक्षण आणि आरोग्य ह्या गोष्टींचे खाजगीकरण करू नका, जाती पाती चे राजकारण करू नका,

शांतीचा भारत मला हवा आहे. दंगली मला नको आहेत. राज्य घटनेने मला धर्म निरपेक्ष राज्य दिले आहे. डॉ. आंबेडकरांनी, म. फुले, म. गांधी यांनी शांततेचा मार्ग दाखवला त्याचा आपण अवलंब केला पाहिजे. आपण महिला आहोत आपण मुलगा मुलगी यांना समान हक्क दिले पाहिजेत. जात धर्म यांना जास्त महत्त्व नाही दिले पाहिजे. आंतर जातीय विवाहाला विरोध न करता प्राधान्य दिले पाहिजे. ह्या सर्व गोष्टींचा विचार करून सरकारला आपल्या हक्कासाठी विरोध केला पाहिजे.

मनीषा ताईंचे विचार महिलांना खुप आवडले. कारण ते दररोजच्या व्यवहारात वापरले जाणारे होते. तेच राज्य घटनेने संविधानाने दिले आहेत हे त्यांना पटले होते.

२ फेब्रुवारी १९ ला मुंबई मध्ये वाशी च्या exhibition सेन्टर मध्ये सभा झाली तिथेही ५००० महिला उपस्थित होत्या. मेधा ताई नी पुण्यातील सभे प्रमाणेच भाषण हिंदी मध्ये केले. इथे जास्त महिला हिंदी भाषिक असतात त्यामुळे संपूर्ण सभा हिंदी मध्ये होते.

वाशी मध्ये प्रमुख पाहुण्या उल्का महाजन ह्या होत्या. त्या रायगड जिल्ह्या मध्ये आदिवासी लोकांसाठी, महिलांसाठी काम करतात. त्यांच्या मधील अंधश्रद्धा दूर करून सामान्य जीवन प्रवाहात त्यांना आणू पाहतात.

इथे ही उल्का ताईंनी संविधान वाचविण्याचा का प्रयत्न करत आहोत, त्याची आवश्यकता का आहे हे सोप्या भाषेत समजावून सांगितले डॉ. बाबासाहेबांनी ही घटना तयार होण्यापूर्वी खुप विचार करून, तळागाळामधील लोकांचा, स्त्रियांचा विचार करून, त्यांच्या स्वतंत्र अस्तित्वाचा विचार करून खुप कष्ट घेऊन, सर्व विचारवंतांनी दिलेले विचार घेऊनही ही घटना बनवली. ती आपली आहे, तिला कोणी तोड मोड करू पहात असेल तर त्याला विरोध केला पाहिजे. तिचा गैरवापर होत असेल तर रोखला पाहिजे. कष्ट करून मिळवलेले स्वातंत्र्य, समानता ह्यावर आजचे सरकार नांगर फिरवते आहे तर त्या सरकारला जाब नक्कीच विचारला पाहिजे. दलित आणि स्त्रीयांवर होणारे अत्याचार रोखले पाहिजेत. ह्यावर उल्काताई यांनी भर दिला.

आपल्याला देवी बनून देव्हाऱ्यात बसायचे की शक्ती ताकद दाखवून न्याय मिळवायचा हे तुम्ही ठरवले पाहिजे. संविधानाने दिलेली मतदानाचा हक्क नीट बजावला पाहिजे. तो पैशाने विकू नका. संविधानाला विकू देऊ नका तर त्याला वाचवा असे आवाहन त्यांनी सर्व महिलांना केलं.

वाशी मध्ये IOB चे DGM श्री. अनिलकुमार उपस्थित होते. अनिलकुमारांनी महिलांना बँक खाते उघडण्याचे महत्त्व सांगितले.

वाशी वार्षिक सभेसाठी आपले सल्लागार फ्रान्स चे FX Hey हे सुद्धा मुद्दाम फ्रान्स हुन आले होते. त्यांनी हिंदी मध्ये संभाषण करून सर्वांना चकित केले.

पुण्यामध्ये कॉ. आनंद मेणेसे आणि वाशी मध्ये कॉ. प्रसन्न उटगी यांनी सामाजिक बदल म्हणजे काय, त्याची आवश्यकता का असते ह्यावर सुंदर विवेचन केले. आपल्या सभासदा पैकी ज्यांनी काही सामाजिक बदल घडवून आणले, जसे की मूल दत्तक घेणे वाढवणे, मुलींना चांगले शिक्षण देऊन नंतर लग्न करून देणे, आंतर जातीय विवाहास प्रोत्साहन देणे इ. इ. अशया प्रातिनिधिक सभासदांना प्रशस्तीपत्रक देऊन त्यांचा सत्कार केला.

आपल्या १८ ऑगस्ट च्या कार्यक्रमात अन्नपूर्णातर्फे इंग्लिश मधील माधव दातार लिखित पुस्तक Future of Public sector of banks ह्या पुस्तकाचे प्रकाशन केले होते. ह्या पुस्तकाचे किर्ती मराठे ह्यांनी सुंदर मराठी भाषांतर केले आहे आणि **''भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे भवितव्य''** ह्या पुस्तकाचे प्रकाशन आपल्या अधिवेशनात आपण मनीषा ताई आणि उल्काताई ह्यांच्या हस्ते केले. कीर्ती ताईंना ही सन्मानित केले. मनीषाताई गुप्ते आणि उल्काताई महाजन या दोघीचा सत्कार आपले ज्येष्ठ विश्वस्त श्री. सुरेश धोपेश्वरकर याच्या हस्ते शाल आणि स्मृतीचिन्ह देऊन करण्यात आला.

दोन्ही वार्षिक सभेमध्ये अहवाल वाचन, अहवाल प्रकाशन झाले. संस्थेचे विश्वस्त श्री. पिसाळ यांनी आभारप्रदर्शनाचे भाषण केले.

ह्या वर्षी पासून अन्नपूर्णा सभासदांना आपण वार्षिक कॅलेंडर देतो आहोत. अन्नपूर्णा सभेत त्याचेही प्रकाशन झाले आणि वाटप ही झाले. ह्या कॅलेंडर मध्ये सभासदांना विविध प्रकल्पाची माहिती झालेले उपक्रम ह्याच चित्र, लेखी माहिती अशया प्रकारे मेंबर्स ना सक्षम करीत आहोत. हे कॅलेंडर अन्नपूर्णात तयार केले गेले. दरवर्षी हा उपक्रम राबविला जाणार आहे. वस्तीमध्ये ह्याची सविस्तर माहिती आपला कर्मचारी वर्ग देणार आहे. सभासद आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्य यांना ही माहिती मिळू शकेल आणि ते अन्नपूर्णात असलेल्या सवलतीचा लाभ घेऊ शकतील हा यातील प्रमुख उद्देश आहे. अन्नपूर्णाच्या कार्याची आणि योजनाची माहिती देणारी चित्रफित दोन्ही सभामध्ये दाखविण्यात आली.

अशया प्रकारे आपल्या परिवारातील कार्यक्रम संपन्न झाले.

❐

# अंमली पदार्थांचा वापर, तस्करी : देशाच्या विकासाला खीळ

■ **डॉ. अजित मगदूम**

कदाचित आपल्या लक्षातही येणार नाही ते म्हणजे अश्लील वाणी-चित्र-वाङ्मय आणि मादक द्रव्ये (Drugs) या बाबी जगातल्या सर्वात मोठ्या आर्थिक उलाढालीची क्षेत्रे मानली जात आहेत. मानवी मन, शरीर, बुद्धी यांचा सरळसोट नायनाट करणारी वस्तू म्हणजे मादक पदार्थ होय.

मादक पदार्थ आणि त्यांचं व्यसन :

मशेरी, तपकीरपासून ते सिगारेट, हुक्का, गुटख्यापर्यंत सर्व तंबाखूजन्य पदार्थ, सर्व प्रकारची मद्ये, तसेच अफू, गांजापासून ते एमडीसारख्या सिंथेटिक द्रव्यापर्यंत साऱ्यांचा समावेश मादक द्रव्यांच्या यादीत केला गेला आहे. यातल्या कोणत्याही पदार्थाचे सेवन/ वापर केल्यावर त्यातील नशा आणणारा घटक रक्ताद्वारे काही सेकंदात मेंदूत जातो. मेंदूतील ठरावीक पेशींचा मादक पदार्थांना विशिष्ट प्रतिसाद म्हणजेच काहींच्या दृष्टीने सुखावह, तरतरी आणणारा अनुभव यालाच सुखभ्रम म्हणतात. हा प्रतिसाद कसा असावा हे प्रामुख्याने ठरविले जाते ते त्या त्या व्यक्तीच्या गुणसूत्राद्वारे. हा प्रतिसाद देणाऱ्या मेंदूतल्या पेशींना Receptors असे म्हटले जाते. या Receptors ची संख्या साधारणपणे दरवेळी शंभराच्या पटीत वाढत जाते. त्यामुळे त्या पदार्थाची (सेवनाची) मागणी वाढत जाते. हळूहळू या Receptors ची संख्या एवढी वाढत जाते की ते आपला एक दरारा मेंदूत निर्माण करू लागतात. म्हणजेच मादक पदार्थांचं सेवन एवढं वाढलं आहे की ते धोकादायक स्थिती धारण करते. त्यालाच 'सब्स्टन्स ॲब्युज' म्हणतात. आता मादक पदार्थ वापरणाऱ्या व्यक्तीच्या मनाबरोबर शरीरावरही आपली पकड घट्ट बसवितात. त्यांच्या सेवनाने मेंदूकडे जाणाऱ्या संदेशांचा उचित अर्थ मेंदू लावू शकत नाही. त्यामुळे भीती, चिंता, दु:ख, क्रोध, आनंद, कामवासना इ,पैकी कोणतीही भावना बळावू शकते. पचेंद्रियांना जाणवणाऱ्या संवेदनांचा चुकीचा अर्थ लावला जातो म्हणजेच या धुंदीमध्ये सुखभ्रम होऊ लागतो. आधीसारखीच नशा यावी म्हणून शरीराला मादक पदार्थांचे प्रमाण वाढवणे आवश्यक ठरते. म्हणजेच त्याची त्या पदार्थाबाबतची सहजवृत्ती (Tolerance) वाढत जाते. मग ते ठराविक प्रमाणात मिळाले नाही तर शरीर बंड करते. म्हणजेच बेचैनी, अस्वस्थता, डोकेदुखी, थरथर इ. प्रकार सुरू होतात. यालाच वियोग लक्षणे (Withdrawal Symptoms) असे म्हणतात. अशाप्रकारे मादक पदार्थांचा ओळखीपासून सुरू झालेला प्रवास 'प्रयोग' 'मैत्री', 'प्रेम', 'आसक्ती' यामार्गे 'सक्ती' या शेवटच्या गंतव्यस्थानापर्यंत केव्हा येते ते कळतही नाही.

भारतात तरुणाई मोठ्या प्रमाणात व्यसनात अडकत असल्याचे चित्र आहे. भारत हा अमली पदार्थाच्या आंतरराष्ट्रीय वाहतुकीच्या मार्गावर येत असल्याने मोठा फटका बसत आहे. दक्षिणपूर्व सुवर्ण त्रिकोण (म्यानमार, थायलंड, लावोस) आणि दक्षिण पश्चिम सुवर्ण चंद्रकोर (इराण, अफगाणिस्तान, पाकिस्तान) या दोन्ही अमली पदार्थांच्या आंतरराष्ट्रीय वाहतुकीच्या मार्गांवर येत असल्याने भारताला अंमली पदार्थांच्या सर्व धोक्यांना सामोरे जावे लागत आहे. विशेषत: पंजाब, मणिपूर व मिझोराम या राज्यांना मोठा तडाखा बसला आहे.

पंजाबची स्थिती अतिशय वाईट झालेली असल्याचे 'उडता पंजाब' या चित्रपटातूनही दिसून आलेले आहे. पंजाबमध्ये ७० ते ७५ टक्के युवावर्ग व्यसनाधीन झाल्याचे निष्पन्न झाले आहे. पंजाबपाठोपाठ उत्तरांचल, हरियाणा, त्रिपुरा, मेघालय या राज्यांतही व्यसनाधीनतेने थैमान घातले आहे.

१९९० साली दारूची पहिल्यांदा चव घेणाऱ्यांचं सरासरी वय १९ वर्षे होते ते आता १० वर्षांवर आलं आहे ही धोक्याची घंटा आहे असं म्हटलं पाहिजे. नवी मुंबईतील इंदिरानगर झोपडपट्टीतील चौथी ते पाचवीच्या मुलांच्या खिशात 'बंटी', 'रितीक' नावाच्या सुपारीची पाकिटं आढळली आहेत. ही सुपारी म्हणजे व्यसनांचे प्रवेशद्वार मानले पाहिजे. सुपारीनंतर तंबाखू, दारू, अंमली पदार्थ असा प्रवास सुरू होतो. अशा वस्त्यांत हिंडल्यावर आढळून येते की एखादीही व्यक्ती व्यसनांपासून दूर असलेली सापडणं कठीण आहे. वस्तीपातळी असो, मध्यमवर्ग असो किंवा उच्चभ्रू- परिस्थिती थोड्याफार फरकाने तशीच आहे. कॅनडातील मॉन्ट्रिय विद्यापीठातील संशोधक सांगतात की १५ ते १७ या वयादरम्यान धुम्रपान सुरू केलेल्या मुलांमध्ये ड्रग्जकडे वळण्याचे प्रमाण ४४ टक्के इतके आहे. १५ पेक्षा कमी वयांत धुम्रपान सुरू करणाऱ्यांमध्ये हे प्रमाण ६८ टक्के असल्याचे त्यांच्या अहवालात म्हटले आहे. आपल्या देशात किंबहुना यापेक्षा गंभीर परिस्थिती असल्याचे नाकारता येणार नाही. केवळ तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाने आपल्या देशात दहा लाख लोक मृत्युला कवटाळतात म्हणजेच दररोज २७७७ लोक मृत्युमुखी पडत आहेत. अमली पदार्थांच्या सेवनामुळे दररोज ७ ते १० जण आत्महत्या करून जीवन संपवत आहेत. दारूमुळे लिव्हर खराब होते एवढेच प्रचलित आहे. परंतु दारू पिणाऱ्यांच्यात स्ट्रोक, हार्ट ॲटॅक, पॅरॅलिसिस, आत्महत्येचे प्रमाण मोठे आहे. पण त्याचा संबंध दारू पिण्याशी लावला जात नाही. दारूमुळे ४२ टक्के अपघात व ४१ टक्के गुन्हेगारी होत असते याकडेही लक्ष वेधले पाहिजे.

भारतीय समाजगटावर नेत्यांचा खूप प्रभाव असतो. पण एकही नेता व्यसनाबद्दल आपली भूमिका मांडताना दिसत नाही. रशिया, युरोपियन युनियनने गेल्या काही दशकांत टप्प्याटप्प्याने दारू उत्पादन घटवत ३५ ते ७५ टक्क्यांपर्यंत ते कमी कमी करण्यात फ्रान्स, इटलीसारख्या देशांनाही यश आले आहे. त्यामुळे जागतिक दारूनिर्मिती करणाऱ्या कंपन्यांनी आपला मोर्चा भारतासारख्या विकसनशील देशाकडे वळविल्याचे दिसून येते. राजकारणी व माध्यमांचा वापर करून मद्यसंस्कृती रुजवायला या कंपन्या यशस्वी होत आहेत. चिल्लर पार्ट्या, रेव्ह पार्ट्या हे कशाचे निदर्शक आहे! किशोरवयीन, तरुणवर्ग, महिलावर्ग यांना सॉफ्ट टार्गेट करून मद्य व मादक पदार्थांचा सुळसुळाट झालेला दिसतो.

अंमली पदार्थांच्या बाबतीत NDPS कायदा आहे.परंतु आंतरराष्ट्रीय साखळी या कायद्यापलीकडच्या सर्व बाबी करण्यात सरावली आहे. याचे कारण आपल्या देशाच्या प्रशासन व्यवस्थेचे अनेक कच्चे दुवे. कमी श्रमात कमालीचं श्रीमंत होणारा एकमेव मार्ग म्हणून अमली पदार्थांच्या व्यापाराकडे पाहिले जाते ते खरे आहे.

या समस्येला प्राधान्यक्रमाने सोडवण्यासाठी शासनाची राजकीय इच्छाशक्ती, समाज, स्वयंसेवी संस्था, कार्यकर्ते, पोलीस यंत्रणा या साऱ्यांची मोट बांधून ठोस पावले वेळीच उचलणे गरजेचे आहे. अन्यथा पंजाबसारखी सबंध देशाची स्थिती झाल्यास फारसे नवल वाटणार नाही.

❐

अन्नपूर्णा परिवारातील कर्मचारी तसेच वस्ती पातळीवर काम करणाऱ्या प्रतिनिधींना नम्र विनंती आहे की या अंकात जे विविध लेख छापले आहेत त्या लेखावरील प्रतिक्रिया अवश्य कळवावी. तसेच 'संवाद'साठी साहित्य, सूचना वगैरे अवश्य पाठवाव्यात. वाचक आणि संपादक मंडळ याच्यात 'संवाद' जितका वाढेल तितका 'संवाद'चा अंक अधिक दर्जेदार काढणे, संपादक मंडळास शक्य होईल.

**संपादक मंडळ**
**संवाद**

# महिलांचे कैवारी

## ■ डॉ. बी. आर. आंबेडकर

■ दिक्षा गोरे

भारतात महिलांचे उद्धारक अनेक झाले परंतु कैवारी मात्र एकच डॉ. बाबासाहेब आंबेडकर दोन्ही हाती शस्त्र घेवून ते लढले. एका हाती कायद्याचे शस्त्र तर दुसऱ्या हाती व्यवस्थेने केलेल्या अन्याय अत्याचाराशी चीड व त्या शोषणाला बळी पडलल्याविषयी करुणा यातुन बाबासाहेबांनी या देशात सामाजिक क्रांती केली. हिंदु समाजातील सगळ्या प्रकाराच्या विषमतांपैकी एक म्हणजे स्त्री-पुरुष विषमता. तिच्यामुळे स्त्रियांवर होणारे अन्याय दुर करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वापरलेले महत्त्वाचे अस्त्र म्हणजे कायदा, स्वत:चे सारे श्रेय त्यांनी हिंन्दु कोड बिलासाठी पणाला लावले. स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी कायद्यांची संहिताआधी बदलली पाहिजे व स्त्री-केंद्री बनवली पाहिजे, हा त्यामागील हेतु होता.

हिंदु कोड बिलाच्या संबंधात आपले मत स्पष्ट करताना कायदेमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''समाजातील वर्गावर्गातील असमानता, स्त्री-पुरुष यांच्यातील असमानता तशीच अस्पर्शित राहु देवून आर्थिक समस्यांशी निगडीत कायदे अंमल करीत जाणे म्हणजे आमच्या संविधानाशी चेष्टा करणे होय.''

हिंदु कायद्याच्या विधेयकाला बाबासाहेबांच्या लेखी अनन्यासाधारण महत्त्व होते. कारण पुर्वी म्हटल्याप्रमाणे त्यायोगें स्त्रियांच्या बाबतीत केल्या जाणाऱ्या भेदभावाला आळा बसुन त्या अधिक सक्षम बनतील. हा त्यांना विश्‍वास होता. हा काळ होता १९४७ ते १९५० (राईटंग्स ॲण्ड स्पीचेस पार्ट वन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हिन्दु १७ नोव्हेंबर १९४७ टु १४ डिसेंबर १९५८)

हा तीन वर्षाचा काळ सर्वार्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील अत्यंत यशस्वी व कृतदनतेचा कालखंड म्हणावा लागेल. या कामगिरीचा आवाका प्रचंड होता. एवढ्यानेही बाबासाहेब अमर झाले असते परंतु संपुर्ण सम्यक क्रांतीच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग असल्याशिवाय ती यशस्वी होऊ शकणार नाही. हे जाणुन त्यांच्या प्रगतीची वाट मोकळी करण्यांसाठी, त्यांनी या काळात प्राधान्य दिले. ते स्त्रियांशी संबंधीत कायद्यामध्ये सुधारणा करायला हे एक प्रकार सुरक्षाकवच होते स्त्रियांसाठी या विधेयकाला प्रस्ताव मांडला असताना कायदेमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या भाषणात म्हणाले, ''महोदय हे विधेयक, भिन्न कायद्याचे संहितीकरण करू पाहते. सर्वप्रथम हे विधेयक अशा मृत हिंदु व्यक्तींच्या म्हणजे स्त्री-पुरुष दोघांच्याही मालमत्तेच्या हक्कांशी संबंधित नियमांचे संहितीकरण करू इच्छिते, जी व्यक्ती इच्छापत्र न करता मृत होते.''

दुसरे म्हणजे भिन्न भिन्न वारसदारांमध्ये वारशाच्या क्रमाच्या स्वरूपात काही बदल विहित करते. या विधेयकाद्वारे

हाताळले पुढील विषय म्हणजे पोटगी, विवाह, घटस्फोट, दत्तक विधान, अज्ञानत्व व पालकत्व यांचे कायदे हे आहेत.

त्यातील महत्त्वपुर्ण अशा प्रस्तावित तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.

बाबासाहेबांनी सर्वप्रथम वारसाबाबत प्रश्न घेतला. त्या संबंधात विधेयकातील महत्त्वाचा बदल म्हणजे मृत व्यक्तीशी विधवा, त्यांची मुलगी व पुर्वी मृत झालेल्या त्याच्या मुलाची विधवा यांना वारशाच्या बाबतीत मुलाच्या बरोबरीची श्रेणी देण्यात आली. त्यांच्या जोडीला मुलीलाही वडिलांच्या मालमत्तेत मुलाच्या अर्धा हिस्सा देण्यात आला. या विधेयकात मान्यता देण्यात आलेल्या स्त्री वारसदारांशी संख्या इतरांपेक्षा संख्येपेक्षा कितीतरी जास्त होती. तिसरा बदल म्हणजे जुन्या कायद्यात स्त्री वारसदारांमध्येच त्यांची आर्थिक परिस्थिती वैवाहिक दर्जा सहअपत्य विना अपत्य अशा कारणावरून भेदभाव केला जात असे. स्त्रिया स्त्रियांमध्ये भेदभाव करणारे वरील सर्व मुद्दे नव्या विधेयकात काढुन टाकण्यात आले. ती स्त्री एकदा वारसदार म्हणून घोषित झाली आहे. याव्यतिरिक्त दुसऱ्या कोणतीही गोष्ट विचारात घेण्याची गरज नाही. असे बाबासाहेब म्हणतात आणि चौथा बदल म्हणजे दायभाग पद्धतीत आईच्या तुलनेत वडील आधी उत्तराधिकारी ठरत. बाबासाहेबांनी आईला वडलांच्या आधी उत्तराधिकारी बनविले. या विधेयकांना स्त्री धनाचे अनेक प्रकार काढुन टाकुन सर्व स्त्रीधन एकच आहे व त्याला वारशाचा नियमही एकच लागतो. अशी तरतुद केली. स्त्री-धनाच्या बाबतीत मुलीच्या हिश्श्याच्या अर्धा हिस्सा वारशाने मुलालाही मिळावा हि तरतूद करून बाबासाहेबांनी वडलांच्या मालमत्तेत जसा मुलीला मुलांचा अर्धा हिस्सा मिळतो, तसा आईच्या मालमत्तेत मुलालाही अर्धा वाटा दिला. हे विधेयक मुलगा व मुलगी यांच्या सामाजिक दर्जामध्ये समानता राखण्याचा प्रयत्न करते. असे उद्गार त्यांनी याप्रसंगी काढले आहेत. याखेरीज धार्मिक संस्कारयुक्त विवाह व विवाह नोंदणी, घटस्फोट, दत्तकपत्र या संबंधीत स्त्रिला केंद्रस्थानी ठेवून बाबासाहेबांनी नव्या तरतुदी केल्या हुंड्याच्या बाबतीत विवाहाला मुलीने माहेरून हुंड्यांच्या रुपात आणलेली संपत्ती न्यास मालमत्ता मानली जाईल. तिचा उपयोग त्या स्त्रिच्या कामी येईल आणि १८ वर्षानंतर या मालमत्तेवरील हक्कास ती पात्र होईल. एक आणखी महत्त्वाचा बदल बाबासाहेबांनी केला तो म्हणजे स्त्रियांच्या मर्यादित इस्टेटीचे अबाधित इस्टेटीत रुपांतर याशिवाय विवाह व दत्तक विधानातुन जातीचे उच्चाटन एकपत्नीक तत्त्व आणि विवाहातुन बाहेर पडण्यासाठी घटस्फोटाचे तत्त्व यांची तरतुद विधेयकाला करून स्त्रियांना फार मोठा दिलासा दिला. हिंदु कोड बिल हे बाबासाहेबांच्या जीवनाचेच ध्येय झाले होते. १९४७ पासून सतत ४ वर्षे १ महिना २६ दिवस त्यांनी अधक परिश्रम घेतले. त्यांचे अंतिम उद्दिष्ट आम्हा स्त्रियांना कायद्याचे हक्क, दर्जा आणि प्रतिष्ठा  प्राप्त व्हावी, हेही होते. परंतु एवढ्या कष्टांनी स्त्री-स्वातंत्र्याचा जाहिरनामा असलेले हे हिंदु संहिता विधेयक, संविधान सभेत मंजुर होवू शकले नाही. त्यातली घटस्फोट द्विभार्या प्रतिबंध यासारखी कलमे विरोधकांकडून विवाद्य बनविण्यात आली. बिलाच्या विरोधकांना बाबासाहेबांनी २० सप्टेंबर १९५१ रोजी अत्यंत जोरदार मर्मिक उत्तर दिले. आज सुधारणाचा युगात स्त्रियांना समान हक्क द्यायला  तुम्ही विरोध का करता? स्त्रियांना ईस्टेटीतवाटा देण्यास मनुनेही नकार दिला नाही. मग तुम्ही का देता? असा सवाल त्यांनी सनातन्यांना केला एकटे बाबासाहेब लढत राहिले. पण सत्र संपले तेव्हा हिंदू कोंड बिलाची फक्त ४ कलमे मंजुर झाली. त्यामुळे अत्यंत दुःखी व निराश होऊन डॉ. बाबासाहेबांनी आपल्या कायदेमंत्रिपदाचा २७ सप्टेंबर १९५१ रोजी राजीनामा दिला. केवढा प्रचंड त्याग बाबासाहेबांनी आम्हा स्त्रियांच्या हक्कासाठी केला! पुढे १९५२ नंतर केंद्र सरकारने बाबासाहेबांना मसुद्यावरून ४ स्वतंत्र कायदे बनविले ते म्हणजे १) दि, हिंदु मॅरेज ॲक्ट १९५५, २) दि हिंदु सक्सेशन ॲक्ट, १९५६ (जुन) ३) दि हिंदु माय नॉरिटी ॲंड गार्डियनासिस ॲक्ट १९५६ (ऑगस्ट) ४) दि हिंदू ॲडॉप्शन ॲंड मेन्टेनन्स ॲक्ट, १९५६ (डिसेंबर)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच मोठ्या प्रमाणावर स्त्रिया चळवळीत सक्रिय झाल्या. १९२७ च्या महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहात स्त्रियांच्या सहभागाला सुरूवातीलच मुली फार मोठ्या प्रमाणावर झाली. १९३० च्या काळाराम मंदिर सत्याग्रहात पहिली अटक होणारी तुकडी स्त्रियांचीच होती. १९४८ च्या नागपुरात आयोजित अखिल भारतीय दलित वर्ग परिषदेत हा सहभाग इतका वाढला की महिलांचे स्वतंत्र अधिवेशन घेण्यात आले.

❐

# माझे मनोगत

■ **सारिका आनंद कांबळे**
**तुर्भे ब्रँच सीआर**

मी सारिका आनंद कांबळे अन्नपुर्णाची गेली ३ वर्षे झाली सभासद आहे. अन्नपुर्णाची मी खूप आभारी आहे. की त्यांनी आमच्या सारख्या सामान्य महिलांना स्वत:चे मनोगत मांडण्याची संधी दिली आहे.

आज २१ व्या शतकामध्ये इंटरनेटच्या या युगात ''स्त्री-पुरुष समानतेचा सगळीकडे नारा दिला जातो. पण हा फक्त नाराच आहे. स्त्रीला आजही बऱ्याच ठिकाणी तुच्छतेची, गुलामगिरीचीच वागणूक दिली जाते. अजूनही स्त्रीयांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला नाही, ''स्त्री म्हणजे पायातली चप्पल'' हीच भावना अजूनही ह्या आधुनिक जगात आहे. हे सर्व जे काही मी लिहिले आहे ते काही लोकांचे ऐकून नाही, तर मी स्वत: सर्व सहन केलेले आहे. मी माझ्या आई-वडिलांची एकलुती एक मुलगी आणि मला दोन भाऊ आहेत.

पण आता मी एक सिंगल पॅरेन्ट आहे. याच मला दु:ख नाही. मला एक मुलगी आहे आणि मी ठरवलय की तिला खूप शिकवून तिला खंबीर आणि सक्षम करायचे माझी सर्व पालकांना कळकळीची विनंती आहे. की मुला-मुलीत भेद करू नका. मुलीला दुय्यम लेखू नका. मुलींना शिकवा आणि सक्षम बनवा.

कारण सध्याच्या या जगात पैशाला खूप किंमत आहे आणि नात्यांची किंमत शून्य झाली आहे. स्पर्धेच्या या जगात माणूसकी मात्र हरवत चालली आहे. भारतात जिथे सर्व धर्म समभाव बोलले जाते. तिथेच शाळा-कॉलेज मध्ये ॲडमिशन घेताना आता ''जातीचा दाखला'' मागितला जातो.

म्हणूनच म्हणते, ''महिलांनो जागा आणि स्वत:च्या मुलीनांही जागृत करा. फक्त शिकवून लग्न लावून देऊ नका. पुढची परिस्थिती कशी येईल. हे त्यांना समजावून स्वत:साठी लढायला शिकवा. त्यांना स्वाभिमानी बनवा परावलंबी नको.'' ❐


# वाद आणि चर्चा

'वाद' आणि 'चर्चा' यात फरक काय
वादातून भांडणे होतात
चर्चेतून गोष्टी स्पष्ट होतात
वाद अहंकार आणि संकुचित मनातून होतो
तर चर्चा मोकळ्या मनातून होते
वाद ही 'रागाची अभिव्यक्ती' आहे
तर चर्चा ही 'तर्काची अभिव्यक्ती' आहे
वादातून कोण बरोबर... हे सिद्ध करण्याचा प्रयत्न होतो
तर चर्चेतून काय बरोबर हे सिद्ध करण्याचा प्रयत्न होतो
वाद निरर्थकच असतो.
वादापेक्षा चर्चेने आणि चर्चेपेक्षा संवादाने प्रश्न मार्गी लागतात.

**- अनुसया ओहोळ**
टुल्स एक्झिकेटीव्ह, मुंबई

❐

# विज्ञान परिषदेतील ‘छद्म’ विज्ञान




■ **अमोल दिघे**

गेल्या महिन्यातील जालंदरच्या १०६ व्या भारतीय विज्ञान परिषदेतील (Indian Science Congress) राष्ट्रीय किशोर वैज्ञानिक संमेलनात, न्यूटनला गुरुत्वाकर्षण कसे कळलेच नाही, पृथ्वी सूर्याभोवती फिरण्यासाठी तिला आकाशाने कसे चहूबाजूंनी दाबायला हवे, यावर एका वक्त्याने भाषण केले. एका भाषणात, कौरव हे टेस्ट ट्यूब बेबी कसे होते, त्यांचा जन्म ‘स्टेम-सेल’ संशोधनामधून कसा झाला, रावणाकडे २४ प्रकारची विमाने कशी होती, असे पूर्णपणे अशास्त्रीय दावे केले गेले. या भाषणाच्या वेळी जरी कोणी वक्त्यांना अडवले नाही. (किंवा अडचणीत आणणारे प्रश्न विचारले नाहीत), तरीही ही बातमी बाहेर आल्यावर अर्थातच देशभरच्या जागरुक शास्त्रज्ञांनी व शिक्षणक्षेत्रातील नामवंतांनी ताबडतोब निषेध व्यक्त केला. याची दखल घेऊन संयोजकांनी दिलगिरीही व्यक्त केली व वक्त्यांच्या निवडीची प्रक्रिया पुढील वर्षीपासून सुधारण्याचे आश्वासन दिले.

हे दावे हास्यास्पद आहेत, या वक्त्यांना विज्ञान फारसे कळत नाही किंवा वक्त्यांची निवड चुकीची होती, वगैरे म्हणून आपण ही घटना सोडून देऊ शकतो. मात्र एक तर शेकडो विद्यार्थ्यांसमोर अधिकारवाणीने विज्ञानमंचावरून धादांत चुकीची माहिती देणे व गैरसमज पसरवणे हे या विज्ञानजत्रेच्या उद्दिष्टांच्या विरोधी आहे. याशिवाय, किशोर विज्ञान संमेलनाची ही केवळ एकच घटना नाही. गेल्या काही वर्षांत कित्येक दिशांनी, कित्येक मंचांवरून अशी अशास्त्रीय विधाने व अवैज्ञानिक दावे केले गेलेले आहेत. बहुतेक वेळा शास्त्रज्ञांनी व विचारवंतांनी एकत्र येऊन अशा दाव्यांचा निषेध केलेला आहे व त्यांचा फोलपणा स्पष्ट करून दाखवला आहे. पण चुकीची विधाने ठणकावून सांगायला एकाचा क्षणभराचा आत्मविश्वास पुरतो; मात्र ते विधान व त्यामुळे पसरलेले गैरसमज खोडून काढायला बऱ्याच विचारी शास्त्रज्ञांना वेळ व वर्तमानपत्राची पाने खर्ची घालावी लागतात. त्यामुळे, विज्ञानात वापरल्या जाणाऱ्या शब्दांचा वापर करून, त्यांच्या योग्य अर्थांची उलटापालट करून पसरविल्या जाणाऱ्या या ‘छद्म’ विज्ञानाला जागरूक राहून वेळीच खीळ घालणे महत्त्वाचे आहे.

विज्ञानसंबंधी एखादी माहिती चुकीची असली तर बिघडले कुठे? परीक्षेत थोडेच पैकीच्या पैकी गुण मिळवायचे आहेत? आणि विज्ञानाला तरी सारे कुठे माहीत असते? असे म्हणता येऊ शकते. मात्र हे लक्षात घेतले पाहिजे की, शाळेच्या पेपरात चुकीचे उत्तर लिहिणे व छद्मविज्ञानाचा कळत-नकळत प्रसार करणे या भिन्न गोष्टी आहेत. असा प्रसार करणाऱ्या व्यक्तींना त्यांचे विचार मांडायला व्यासपीठ असते, त्या व्यासपीठाचा अधिकार त्यांच्यामागे असतो, ज्यामुळे त्यांचे निष्कर्ष व मते यांना वजन प्राप्त झालेले असते. म्हणूनच प्रामाणिकपणे व खऱ्या-खोट्याची शहानिशा करून बोलणए ही अशा वक्त्यांची विशेष जबाबदारी ठरते. हे केवळ विज्ञान-व्यासपीठालाच नाही तर रोजच्या व्यवहारालाही - अगदी व्हॉट्सॲप संदेशांनाही - लागू आहे. थोडे मुळात जायचे म्हटले, तर दडपून खोटी विधाने करण्याची (व शहानिशा न करता ‘फॉरवर्ड’ करण्याची) प्रवृत्ती हा आजच्या माहितीच्या युगातील एक मोठा धोका आहे. छद्मविज्ञानाचा प्रसार हे त्याचे केवळ एक लक्षण आहे. ‘म्हातारी गेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावतो’ या न्यायाप्रमाणे, योग्य वेळीच घातक वृत्तींना विरोध करणे आवश्यक असते.

छद्मविज्ञानाचा प्रसार करणाऱ्या व्यक्तीचा नेहमीच काही अंत:स्थ हेतू असतो, असे नाही. अशा व्यक्तींना शंकेचा फायदा (benefit of doubt) द्यायचा, तर यातील काही दावे हे विज्ञानाविषयीच्या गैरसमजातून किंवा अपुऱ्या माहितीतून आलेले असतात, कधी ऐकीव माहितीवर विश्वास ठेवल्याने चुकीचे निष्कर्ष निघालेले असतात, कधी आपलीच कल्पना कशी खरी आहे, हे इतरांना सांगण्याची घाई असते. 'सूर्याचे गुरुत्वाकर्षण पृथ्वीला आपल्याकडेच खेचत असताना ती सूर्यामध्ये पडण्याऐवजी त्याच्याभोवती प्रदक्षिणा का घालते?' अशा नैसर्गिकरित्या पडणाऱ्या प्रश्नांना विज्ञानाकडे समर्पक उत्तरे आहेत. ती समजून न घेता आपण आपल्याच सुचलेल्या एखाद्या कल्पनेच्या प्रेमात पडतो व मग तिच्या दोषांकडे कानाडोळा करतो. नव्या कल्पनांना जन्म देणे व जुन्या कल्पनांहून अधिक काही साध्य करून दाखवण्याचा प्रयत्न करणे, यात गैर काहीच नाही. प्रगती यातूनच साधते आणि वैज्ञानिक शोधांची पहिली पायरी हीच असते. पण कोणतीही नवी कल्पना, सत्य म्हणून स्वीकारण्यापूर्वी ती प्रयोगांच्या व निरीक्षणांच्या निकषावर तावून सुलाखून घेणे आवश्यक असते. न्यूटनचे गतीचे नियम घ्या, आइनस्टाइनचा सापेक्षतावादाचा सिद्धांत घ्या किंवा डार्विनचा उत्क्रांतीवाद... सारे जेव्हा शेकडो कसोट्या उत्तीर्ण झाले तेव्हाच ते स्वीकारले गेले. आजही प्रतिदिनी प्रयोगशाळांपासून ते दैनंदिन व्यवहारापर्यंत या सिद्धांतांना कित्येक परीक्षांना सतत सामोरे जावे लागते. इथे शब्दप्रामाण्य नाही, पुस्तकात लिहिलेले म्हणून खरे मानणे नाही. व्यक्तिप्रामाण्य (बाबा वाक्यम् प्रमाणम्) नाही, आइनस्टाइनला पुंजवाद (quantum mechanics) आवडला नाही, म्हणून तो खोटा ठरत नाही. इथे निकष केवळ, प्रयोगांना निसर्गाने दिलेल्या उत्तरांचा, निरीक्षणांचा असतो. या कसोट्यांना सामोरे जाण्याची तयारी प्रामाणिक विज्ञानाची असते; छद्मविज्ञानाची नसते!

छद्मविज्ञानाचा आजकाल अधिक प्रचलित झालेला एक प्रकार म्हणजे विज्ञानातील बहुतेक शोध पुरातन काळी भारतीयांना आधीच माहीत होते, असा दावा करणे. पाऱ्यांचा इंधनाप्रमाणे वापर करून उडणारे पुष्पक विमान, डोके धडावर लावणारी प्लास्टिक सर्जरी, शंभर कौरवांना जन्म देणारे 'टेस्ट ट्यूब' तंत्रज्ञान, युद्धात वापरण्यात येणारी आण्विक ब्रह्मास्त्रे, दूरच्या वार्ता देणारे इंटरनेट वगैरे गोष्टी आपल्याला पूर्वीच अवगत होत्या; मग या नव्या 'पाश्चिमात्य' विज्ञानात नवे ते काय? असा दाव्यांमधून 'भारतीय' किंवा 'वैदिक' विज्ञानाचा अभिमान प्रकट केला जातो (खरे तर विज्ञानात 'पाश्चिमात्य' व 'पौर्वात्य' वगैरे काही नसते. इलेक्ट्रॉनचा शोध थॉमसनने लावला, तरी आपल्या घरातील विजेमधून तेच इलेक्ट्रॉन खेळतात).

अर्थात, आपल्या पूर्वजांच्या कर्तबगारीचा आपल्याला सार्थ अभिमान असलाच पाहिजे. भारताने जगाला चार्वाक, बौद्ध, जैन, शाक्य-योग, न्याय-वैशेषिक मीमांसा अशी तत्त्वज्ञाने दिली आहेत. शून्याचा वापर करून दशमान पद्धतीत संख्या लिहिण्याची पद्धत इथेच उगम पावली आहे. केरळातील गणितज्ज्ञांची प्रमेये, प्रगत धातुशास्त्र, आरोग्यविषयक चरकसंहिता, सुश्रुताची शल्यचिकित्सा, कणादाने प्रतिपादलेला नऊ प्रकारच्या अणुंचा सिद्धांत (याचा आजच्या अणुसिद्धांताशी फार संबंध नसला तरी त्या कालानुरूप ती एक चांगली सुरूवात होती) यांना ऐतिहासिक आधार आहे आणि या निश्चितच अभिमानास्पद गोष्टी आहेत. आपला आक्षेप असला पाहिजे तो पुराव्याशिवाय केल्या जाणाऱ्या अवास्तव दाव्यांना. हे दावे हास्यास्पद तर असतातच; पण प्राचीन भारतातील (वर उल्लेखलेल्या) खऱ्याखुऱ्या उपलब्धींचे पण त्यांच्या संगतीने हसे होऊ शकते, त्यांच्यावर अविश्वास दाखवला जाऊ शकतो.

रामायण-महाभारतासारख्या महाकाव्यांमध्ये व्यक्तींची, घटनांची, युद्धांची, शौर्याची, त्यागाची, मनोभावनांची रंजक वर्णने आहेत. महानगायकांना पडलेले नैतिक प्रश्न, त्यावर त्यांनी शोधलेली उत्तरे, त्यांनी अडचणींशी केलेला सामना, प्रतिकूल परिस्थितीवर त्यांनी मिळवलेला विजय याचा तो उत्सव आहे. यात अतिशयोक्ती व कल्पनाविलास येणे साहजिकच आहे. मग ज्याचे वर्णन केले आहे, ते या कविश्रेष्ठांनी पाहिलेले असलेच पाहिजे, असे म्हणणे हे व्यास-वाल्मिकींच्या कल्पनाशक्तीचा व लेखनकर्तृत्वाचा अपमान करण्यासारखे आहे. जेव्हा या (किंवा पुरातनकालीन इतर) ग्रंथांतील वर्णनांची सत्यता आपल्याला पडताळून पाहायची असेल, तेव्हा आपण काही साध्या प्रश्नांवर विचार करू शकतो. विमानाला उडण्यासाठी लागणारे तंत्रज्ञान असेल तर उड्डयनशास्त्राची (aeronautics) माहिती असलेली काही कागदपत्रे आहेत का? इंटरनेट असेल तर त्यासाठी आवश्यक असलेल्या विजेच्या इतर उपकरणांचे (निदान दिव्यांचे तरी) काही पुरावे मिळतात का? अशा प्रश्नांना प्रामाणिकपणे सामोरे जाणे आवश्यक आहे. जोपर्यंत यासंबंधी काही ठोस पुरावे मिळत नाहीत, तोपर्यंत असे कोणतेही दावे करणे ही स्वत:ची व इतरांची फसवणूक आहे. अशा अवैज्ञानिक दाव्यांवर विश्वास न ठेवणे, शक्य झाल्यास ते खोडून काढणे, हे वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणाऱ्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

कोणताही नवा वैज्ञानिक दावा करायचा झाला तर तो खरा आहे, हे सिद्ध करण्याची जबाबदारी (burden of proof) दावा करणाऱ्यावर असते. ही मागणी कदाचित अवास्तव वाटू शकेल. पण ही मागणी स्वत:वर लादून घेतल्यानेच 'वि'ज्ञान हे 'विश्वसनीय' ज्ञान झालेले आहे. आपल्याला चांगले वाटले (feel-good) तेच सत्य हे गृहीत न धरता, पुरावा काय सांगतो, यावर आपला निर्णय आधारित ठेवण्याचा मनाचा मोकळेपणा बाळगायला विज्ञान शिकवते. हा मोकळेपणा व मानवाला जन्मजातच असलेली चिकित्सकबुद्धी (जी आपल्या सर्वांमध्ये आहे, आपण ती वापरायला बऱ्याचदा विसरतो) वापरून आपण छद्मविज्ञान ओळखू शकतो व त्यामागून डोकावणाऱ्या प्रवृत्तींपासून दूर राहू शकतो. शेवटी 'सत्यमेव जयते' व्हायला हवे ना?

**साभार...महाराष्ट्र टाईम्स**

❑


मुंबई विभाग








(मल्टि स्टेट को-ऑप.)
मुंबई विभाग
मुंबई विभाग
संचलित
वात्सल्यपूर्ण स्वयंरोजगार
मुंबई


(मल्टि स्टेट को-ऑप.)
मुंबई


पुणे विभाग
वात्सल्यपूर्ण स्वयंरोजगार
सेवा सहकारी संस्था, पुणे
मुंबई

















**अन्नपूर्णा परिवारातर्फे श्री सुरेश धोपेश्वरकर यांनी ''संवाद त्रैमासिक'' न्यू एज प्रिंटींग प्रेस,**
**८५ सयानी रोड, प्रभादेवी ४०००२५ येथे छापून घेतले.**